CMYK




सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह




सोलापूर | रविवार, १८ ऑक्टोबर २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक ३२० | पाने १२+८ | किंमत रु. ८/-
|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



चेतनेचे महत्त्व : संपूर्ण मानवजातीच्या इतिहासात, जर कोणती शक्ती अन्य सर्व शक्तींपेक्षा श्रेष्ठ सिद्ध ठरली असेल, तर ती म्हणजे स्वतःवर विश्वास ठेवण्याची विचार-शक्ती. आपल्याला श्रेष्ठ व्हायचे आहे, या चेतनेसह ज्यांनी जन्म घेतला, ते आपल्या चेतनेच्या सामर्थ्याने श्रेष्ठ ठरले.

**स्व. सुरेशराव केतकर**
रा. स्व. संघाचे पूर्व
सह सरकार्यवाह

# इंटरनेटचा वापर मूलभूत अधिकार

**सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वाचा निर्णय** | **मुलेही अधिकाराचे लाभार्थी** | **वापरकर्त्यांसाठी वयोमर्यादा निश्चित करता येणार नाही**

**नवी दिल्ली, १७ ऑक्टोबर**

**मुलांसह प्रत्येक व्यक्तीसाठी इंटरनेटचा वापर आणि उपलब्धता हा मूलभूत अधिकाराचा अविभाज्य भाग आहे. त्यासाठी वयोमर्यादेचे बंधन लादता येणार नाही. संविधानाच्या कलम २१ आणि कलम १९ (१)(अ) नुसार इंटरनेटचा वापर करण्याचा अधिकार हा प्रत्येक व्यक्तीचा अधिकार आहे. मुलांची सुरक्षा आणि त्यांचे स्वातंत्र्य या परस्परविरोधी गोष्टी नाहीत. त्यामुळे किशोरवयीन मुलांसाठी इंटरनेट वापरण्यावर बंदी घालणे निरर्थक असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देताना नमूद केले आहे.**

किशोरवयीन मुलांसाठी इंटरनेट आणि समाज माध्यमांवर वापरण्यावर बंदी घालण्याचा आदेश द्यावा, अशी मागणी करणाऱ्या याचिका दाखल करण्यात आल्या. त्यावर न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. के. विनोद चंद्रन यांच्या न्यायासनाने सुनावणी घेताना म्हटले की, मुलांना इंटरनेट वापरण्यापासून पूर्णपणे प्रतिबंधित करण्याऐवजी, त्यांची ऑनलाइन सुरक्षा मजबूत करण्यासाठी समाज माध्यम खात्यांसाठी 'चाइल्ड मोड' सारख्या




उपाययोजना अवलंबल्या पाहिजे, सरसकट इंटरनेट वापरण्यावर बंदी घालणे मूलभूत अधिकारांचे उल्लंघन ठरेल.

इंटरनेटचा वापर करणे, हे मूलभूत अधिकाराचा अविभाज्य भाग आहे. यात मुलांचाही अधिकार समाविष्ट आहे. वयाच्या आधारे इंटरनेटवर बंदी घालता येणार नाही. कायदा करून बंदी घातल्याने मुले इंटरनेटचा वापर करणे, बंद करणार नाहीत.

उलट ते आईवडिलांना कळू न देता इंटरनेट वापरायला लागतील. मग ते नियंत्रण नसलेले आणि असुरक्षित असलेल्या प्लॅटफॉर्मचा वापर करतात, जे जास्त धोकादायक ठरेल. ◂ (वृत्तसंस्था)

### उपाययोजना करण्याचा निर्देश

- सोशल मीडियाचा दुरुपयोग रोखण्यासाठी सुरक्षा उपाययोजना कराव्याच
- पालकांची संमती, मार्गदर्शन आणि देखरेखीवर अधिक भर द्यावा
- उपाययोजनांची अंमलबजावणी कशी करायची, ही सरकारची जबाबदारी
- तांत्रिक उपाययोजना आणि आक्षेपार्ह सामग्री काढून मुलांना सुरक्षित करता येणार नाही
- वैयक्तिक माहितीचे संरक्षण कसे करावे आणि समस्या आल्यास मदत कशी मागावी, हे मुलांना शिकवायला हवे
- ऑनलाइन गोपनीयता, लैंगिक शोषणाविरुद्ध तक्रार कशी करावी याबद्दल शिक्षित केले पाहिजे ■

### पीडितालाच समस्या मानण्यासारखे होईल

ऑनलाइन प्लॅटफॉर्म्स हानिकारक सामग्री शोधून ती काढून टाकण्यात अयशस्वी ठरत असल्याने, मुलांच्या वापरावर निर्बंध घालणे म्हणजे पीडितालाच समस्या मानण्यासारखे होईल. इंटरनेटचे महत्त्व केवळ ऑनलाइन उपलब्ध असलेल्या सामग्रीपुरते मर्यादित नाही, तर ते शिकणे, संवाद साधणे आणि माहिती मिळवण्याच्या संधी देखील उपलब्ध करून देते असे न्यायासनाने स्पष्ट केले. ■

### पूर्वीच्या निकालाचा दिला संदर्भ

न्यायासनाने अनुराधा भासिन विरुद्ध भारत सरकार या खटल्यातील निकालाचा संदर्भ देताना म्हटल की, भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य, आणि इंटरनेटद्वारे कोणताही व्यापार किंवा व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य, हे संविधानाच्या अनुच्छेद १९(१)(अ) आणि १९(१)(ग) अंतर्गत मूलभूत हक्क म्हणून घटनात्मकदृष्ट्या संरक्षित आहेत. यावेळी प्रज्ञा प्रसून आणि इतर विरुद्ध भारत सरकार या खटल्यातील निकालाचाही संदर्भ दिला. ■

### कारवाई मुलांवर नव्हे, हानी पोहोचवणाऱ्यांवर व्हावी

ऑनलाइन सुरक्षिततेची जबाबदारी मुलांवर टाकण्याच्या मुद्यावर न्यायासनाने म्हटले की, मुलांना इंटरनेटवरून काढून टाकण्याऐवजी, हानी पोहोचवणाऱ्या सामग्रीवर आणि त्यासाठी जबाबदार असलेल्यांवर कारवाई केली पाहिजे. मुलांना ऑनलाइन धोक्यांपासून वाचवण्यासाठी त्यांना सोशल मीडियापासून दूर ठेवणे पुरेसे नाही. ■



यज्ञातून प्रकटलेली मोहाडी(जि. भंडारा) येथील चौंडेश्वरी देवी विदर्भच नव्हे तर शेजारच्या राज्यातील भक्तांचे श्रद्धास्थान आहे. नवरात्र महोत्सवात देवीच्या दरबारात भक्तांची गर्दी जमते. ६०० वर्षांचा इतिहास असलेले हे मंदिर गायमुख नदीच्या तीरावर आहे.

## आंदोलनाच्या आडून लोकशाहीला विरोध: मुख्यमंत्री

**मुंबई, १७ ऑक्टोबर**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनामा आणि एसआयआर प्रक्रिया रद्द करण्यासाठी काँग्रेससह सर्वच विरोधी पक्षांचे राजधानी दिल्लीत आंदोलन सुरू आहे. दरम्यान, या आंदोलनावरुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर हल्लाबोल केला. एसआयआरला विरोध हे एक निमित्त आहे, खरा विरोध लोकशाहीला आहे. विरोधकांना आराजकता माजवून सत्ता मिळवायची आहे, असे ते म्हणाले.

लोकशाही मार्गाने पात्र मतदारांच्या मताच्या माध्यमातून निवडून येण्याची शक्यता दूरदूरपर्यंत दिसत नसल्याने त्यांच्या तोंडून ते 'सत्य' बाहेर आले. देशात अराजकता माजवून सत्ता मिळवण्याचा त्यांचा डाव अखेर उघड झाला आहे. त्यांना एसआयआर का नको? कारण त्यांना 'रेजीम' बदलायची आहे. निवडणुकीच्या माध्यमातून सत्तेवर येण्याची शक्यता नसल्यामुळेच 'रेजीम' बदलण्याची भाषा करतात. त्यांना सत्ता उलथून टाकायची आहे. ◂ (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### सीमेवर दोन दहशतवादी ठार

**श्रीनगर** : जम्मू आणि काश्मीरमध्ये भारत-पाकिस्तान नियंत्रण रेषेजवळ कुपवाडा येथील केरन सेक्टरच्या जुमागंड परिसरात शनिवारी पहाटे ३:३० च्या सुमारास सुरक्षा दलासोबत झालेल्या चकमकीत दोन दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आले. दहशतवादी कोणत्या संघटनेचे होते, याची माहिती समोर आलेली नाही. जंगलात लपलेल्या इतर दहशतवाद्यांच्या शोधासाठी मोहीम सुरू आहे. दहशतवादी घुसखोरीच्या प्रयत्नात असल्याची प्राथमिक माहिती भारतीय लष्कराच्या एका अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला सांगितले. उत्तर काश्मीर जिल्ह्यातील केरन सेक्टरच्या जुमागंड भागात नियंत्रण रेषेजवळ जवानांना काही संशयास्पद हालचाली लक्षात आल्या. त्यानंतर त्यांनी दहशतवाद्यांना आव्हान देऊन रोखले. त्याचवेळी त्यांनी सुरक्षा दलाच्या दिशेने गोळीबार सुरू केला, त्याला जोरदार प्रत्युत्तर देण्यात आले. यात दोन दहशतवादी ठार झाले, तर इतरांचा शोध सुरू आहे.

### सौदी अरेबियात पाच जणांना फाशी

**दुबई** : सौदी अरेबियाने आपल्याचे पाच नागरिकांना फाशी दिली आहे. या पाच जणांना दहशतवादाशी संबंधित आरोपांखाली दोषी ठरवण्यात आले होते. त्यांच्यावर विदेशी संघटनेत सामील होणे, सुरक्षा दलांवर हल्ला करणे आणि सौदी अरेबियाच्या अंतर्गत हल्ल्यांना पाठिंबा दिल्याचा आरोप होता. या पाच नागरिकांविषयी आणि त्यांच्या कथित दहशतवादी गुन्ह्यांविषयी अधिक माहिती अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही.

### अबू धाबीमधून तस्कराचे प्रत्यार्पण

**तिरुवनंतपुरम** : उत्पादन शुल्क विभागाच्या इतिहासात प्रथमच एखाद्या आरोपीचे विदेशातून प्रत्यार्पण करून भारतात परत आणण्यात आले आहे. हा आरोपी तिरुवनंतपुरममध्ये २०२३ मध्ये नोंदवलेल्या एमडीएमए जप्ती प्रकरणात सहभागी होता. आरोपी शॉन सुनील ब्रेटचा विदेशात शोध घेत अबू धाबीहून आंध्र प्रदेशात परत आणण्यात आले आहे. हे प्रकरण पुलीमठजवळील अमली पदार्थ जप्तीशी संबंधित आहे. त्यावेळी त्याच्याकडून सुमारे १५५ किलोग्रॅम गांजा आणि ७० ग्रॅम एमडीएमए जप्त केले होते. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, ते नंतर उत्पादन शुल्क गुन्हे शाखेकडे सोपवण्यात आले. तपासादरम्यान, इतर आरोपींना अटक करण्यात आली, तर ब्रेट तो देशाबाहेर पळून गेला. त्याच्याविरुद्ध इंटरपोलची रेड नोटीस जारी करण्यात आली होती. उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांनी सांगितले की, गत आठवड्यात अंमली पदार्थ विरोधी संस्थेने भारतीय अधिकाऱ्यांना कळवले की, इंटरपोलच्या नोटीसच्या आधारे ब्रेटला ताब्यात घेण्यात आले आहे. त्यानंतर राज्य सरकारने परराष्ट्र मंत्रालयाशी संपर्क साधून प्रत्यार्पणाची प्रक्रिया पूर्ण केली. ■

# शंभर टक्के टॅरिफचे अरिष्ट टळले!

**ट्रम्प यांची कायद्याला तूर्तास स्थगिती** | **रशियावरील निर्बंध घेतले मागे**



**वॉशिंग्टन, १७ ऑक्टोबर**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाशी संबंधित कठोर आर्थिक निर्बंध आणि सीमाशुल्क हटवण्याची घोषणा केली. या निर्णयामुळे रशियाकडून मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल आयात करणाऱ्या भारताला दिलासा मिळाला असून चीनलाही याचा फायदा होणार आहे. निर्बंध हटवण्याची घोषणा करताना ट्रम्प यांनी रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या भारतासह पाच देशांवर शंभर टक्के आयात शुल्क (टॅरिफ) आकारण्याची तरतूद असलेल्या कायद्याला तुर्तास स्थगिती दिली आहे.

ट्रम्प यांनी शनिवार एक विशेष कार्यकारी आदेश जारी करत 'लिंडसे ओ. ग्रॅहम सँक्शनिंग रशिया अँड इराण ॲक्ट ऑफ २०२६' अंतर्गत रशिया आणि रशियन ऊर्जा खरेदी करणाऱ्या देशांवर लादलेले अनेक नवीन निर्बंध, संबंधित नियम आणि शुल्कांमधून सूट जाहीर केली. त्यांनी रशियाकडून तेल, वायू खरेदी करणाऱ्या देशांवर शुल्क लागू करण्याची तरतूद असलेल्या कायद्याची अंमलबजावणी करण्यास स्थगिती दिली आहे.

हा निर्णय अमेरिकेच्या राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने घेतल्याचे त्यांनी नमूद केले. संबंधित कायद्यांतर्गत रशियाकडून तेल आणि वायू खरेदी करणाऱ्या देशांवर १०० टक्क्यांपर्यंत शुल्क लादले जाऊ शकले असते. यामध्ये चीन, भारत, स्लोव्हाकिया, हंगेरी आणि अझरबैजान यांसारख्या देशांचा समावेश होता. मात्र ट्रम्प यांच्या निर्णयामुळे शुल्क आकारण्यात येणार नाही. ◂ (वृत्तसंस्था)

### युक्रेनच्या अडचणी वाढणार : झेलेन्स्की

ट्रम्प यांच्या निर्णयामुळे आणि रशियन आक्रमकतेच्या पार्श्वभूमीवर युक्रेनला अडचणींचा सामना करावा लागू शकतो, अशी चिंता झेलेन्स्की यांनी व्यक्त केली. अमेरिकेने लिंडसे ग्रॅहम कायद्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करणे चुकीचे आहे. हा कायदा अजूनही खूप उपयुक्त ठरू शकतो, परंतु त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी आवश्यक आहे. ■

**केतन अग्रवाल हत्या**

### उज्ज्वल निकम विशेष सरकारी वकील

**पुणे** : देशभरात चर्चेत आलेल्या केतन अग्रवाल खून प्रकरणात ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. केतनचे वडील विशाल अग्रवाल यांनी निकम यांची नियुक्ती करण्याची मागणी केली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही मागणी मान्य करून विधी व न्याय विभागाच्या सचिवांना आवश्यक निर्देश दिले होते. त्यानुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. व्यावसायिक केतन अग्रवाल याचा १८ जून २०२६ रोजी लोहगड किल्ल्यावरील हत्ती तलावाजवळील दरीत ढकलून खून करण्यात आला. सुरुवातीला हा अपघात असल्याचे भासविण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. ■

# खाजगी रुग्णालयांना दरपत्रक बंधनकारक

### उपचारांचा खर्च आधीच कळणार

**मुंबई, १७ ऑक्टोबर**

खाजगी रुग्णालयांमध्ये उपचारासाठी जाणाऱ्या रुग्णांना आता विविध वैद्यकीय सेवा, तपासण्या आणि उपलब्ध सुविधांचे दर आधीच समजू शकणार आहेत. राज्यातील सर्व खाजगी रुग्णालये आणि अन्य वैद्यकीय आस्थापनांना सेवा-सुविधांचे दरपत्रक ठळकपणे आणि सहज नजरेस पडेल अशा ठिकाणी लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने शनिवारी हे निर्देश दिले आहेत.

दरपत्रक मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये लावावे लागणार असल्याने रुग्णांना उपचारांच्या




संभाव्य खर्चाची पूर्वकल्पना मिळेल आणि आर्थिक नियोजन करणे सोपे होईल. केंद्र सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने १२ ऑक्टोबर २०२६ रोजी दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने हे निर्देश जारी केले आहेत. मुंबई शुश्रूषागृह नोंदणी अधिनियम, १९४९ अंतर्गत नोंदणीकृत खासगी रुग्णालये आणि अन्य वैद्यकीय आस्थापनांना महाराष्ट्र परिचर्या गृह नियमावली, २०२१ मधील अनुसूची तीनमध्ये नमूद केलेल्या सेवा व सुविधांचे दर प्रदर्शित करावे लागणार आहेत. वैद्यकीय आणि रुग्णालयीन सेवांचे दर दर्शनी भागात लावणे नियमानुसार बंधनकारक आहे. रुग्णालयाच्या आवारातील महत्त्वाच्या, सहज दिसणाऱ्या आणि सहज पोहोचता येणाऱ्या ठिकाणी हे दरपत्रक लावावे लागेल. दरांमध्ये कोणताही बदल झाल्यास संबंधित रुग्णालयाला दरपत्रक तातडीने अद्ययावत करावे लागणार आहे. परिणामी, उपचारानंतरच्या देयकांवरून उद्भवणाऱ्या तक्रारी कमी होण्यास मदत होईल. ◂ (वृत्तसंस्था)

### नियम मोडणाऱ्या रुग्णालयांवर कायदेशीर कारवाई

दरपत्रक प्रदर्शित करण्याच्या नियमांचे पालन होत आहे की नाही, याची रुग्णालयांची नोंदणी, नियमन आणि देखरेख करणाऱ्या सक्षम प्राधिकरणांनी वेळोवेळी तपासणी करावी. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रुग्णालये आणि वैद्यकीय आस्थापनांवर आवश्यक प्रशासकीय तसेच कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या निर्देशांची माहिती देऊन त्यांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करावी, असे शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे. ■



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या बाल व शिशू श्री विजयादशमी उत्सवात बाल स्वयंसेवकांनी प्रात्याक्षिके सादर करून उपस्थितांची मने जिंकून घेतली. नागपुरात शनिवारी एकूण ११ भागांत उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते

# पथ संचलन रोखण्याचा अधिकार कोणी दिला?

### तामिळनाडू पोलिसांना हायकोर्टाने फटकारले

**चेन्नई, १७ ऑक्टोबर**

वाहतूक कोंडी आणि सुरक्षेचे कारण देत २५ ऑक्टोबर आणि १ नोव्हेंबरला १२८ ठिकाणी नियोजित राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संचलनास परवानगी नाकारणाऱ्या तामिळनाडू पोलिसांना फटकारत मद्रास उच्च न्यायालयाने संचलनास कुठल्याही अटींशिवाय परवानगी देण्याचा आदेश दिला. पथ संचलन रोखण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला? असा प्रश्नही यावेळी न्यायालयाने पोलिसांना केला.

तामिळनाडू पोलिसांना अनेकदा निवेदन देऊनही त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पथ संचलनास परवानगी देण्यास नकार दिला होता. याविरोधात मद्रास उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. त्यावर न्या. डब्ल्यू. लक्ष्मी नारायणन यांच्या एकल खंडपीठाने सुनावणी घेतली. पोलिसांची खरडपट्टी काढताना न्यायालयाने १२८ ठिकाणी पथसंचलनाला परवानगी देण्याचा आदेश दिला. तसेच, संबंधित मार्गावरील रस्ते वाहतुकीसाठी खुले करण्यास बजावले. तामिळनाडू पोलिसांनी परवानगी नाकारण्यासाठी दिलेली तीन कारणे न्यायालयाने फेटाळून लावताना मार्ग आणि सार्वजनिक कार्यक्रमांची माहिती गोळा करण्यासाठी, तसेच वेळ आणि ठिकाण निश्चित करण्यासाठी १९ ऑक्टोबरपर्यंत आयोजकांसोबत काम करण्याचा निर्देश दिला. संघाच्या कार्यकर्त्यांना कोणत्याही कायदेशीर निर्बंधांशिवाय पथसंचलन आणि पदयात्रा काढण्याचा अधिकार आणि तो कोणीही हिरावून घेऊ शकत नाही असेही न्यायालयाने बजावले.

#### जबाबदारीतून पळ काढू नका

मार्गावर मशीद असणे, लाऊडस्पीकरचा आवाज, वाहतूक कोंडी आदी कारणे देत पथसंचलनाची परवानगी नाकारणे स्वतःची जबाबदारी झटकण्यासारखे आहे. सुरक्षेसाठी उपाययोजना करणे तुमची जबाबदारी आहे आणि त्यातून पळ काढण्याची प्रयत्न करू नका. पोलिस प्रशासनाने अर्ज फेटाळण्याच्या कारणांची चौकशी करण्याऐवजी अर्ज मंजूर करण्याच्या प्रक्रियेवर लक्ष केंद्रित केले पाहिजे, अशा शब्दात न्यायमूर्तींनी ताशेरे ओढले. ■

**सूचनांचे पालन करण्याची तयारी**

सरकारची बाजू मांडताना महाधिवक्ता विजय नारायण म्हणाले की, राज्य सरकार २५ ऑक्टोबर आणि १ नोव्हेंबर रोजी पथसंचलनासाठी परवानगी देण्यास तयार आहे, परंतु आयोजकांना स्थानिक पोलिस प्रशासनाने सूचवलेल्या बदलांचे पालन करावे लागेल. ◂ (वृत्तसंस्था)

# मंदिरांच्या मालमत्ता ताब्यात घेणे बेकायदेशीर

## सर्वोच्च न्यायालयाचे निरीक्षण, जमीन दान करण्याचा सरकारला अधिकार नाही



**नवी दिल्ली, १७ ऑक्टोबर**

राज्य सरकारवर मंदिरांच्या मालमत्तेचे रक्षण करण्याची कायदेशीर जबाबदारी आहे. याचा अर्थ राज्य सरकार स्वतःच सार्वजनिक हित किंवा प्रशासकीय सोयीच्या नावाखाली दानपत्राद्वारे (गिफ्ट डीड) अशा मालमत्ता आपल्या ताब्यात घेऊ शकत नाही, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाचे न्या. पी. एस. नरसिंहा आणि न्या. आलोक आराधे यांच्या न्यायासनाने नोंदवले.

तामिळनाडूच्या इरोड जिल्ह्यातील नागापालयम मरियम्मन-पोन्नाचियम्मन मंदिराच्या मालकीची जमीन तालुका कार्यालय बांधण्यासाठी राज्य सरकारकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय बेकायदेशीर ठरवत प्रशासनाला एक लाखांचा दंड ठोठावण्यात आला.

न्यायासनाने तामिळनाडू सरकारला विश्वस्ताकडून मंदिराची जमीन दान म्हणून स्वीकारल्याबद्दल दोषी ठरवले. दानपत्र अवैध घोषित करत जमिनीचे भाडे दरमहा ३१,००० रुपये निश्चित केले. तामिळनाडू हिंदू धार्मिक आणि धर्मादाय अधिनियम, १९५९ च्या कलम ४१(१) अंतर्गत दानपत्र कायदेशीररित्या अप्रभावी आहे. धार्मिक संस्थांची मालमत्ता शतकानुशतके भक्तांच्या अर्पण आणि देणग्यांमधून जमा झालेली असते. अशी मालमत्ता देवतेची असते आणि विश्वस्त किंवा सरकार केवळ संरक्षक म्हणून तिचे व्यवस्थापन करू शकतात आणि ही मालमत्ता कुणालाही दान म्हणून देण्याचा त्यांना अधिकार नाही. याचिकाकर्त्याने मद्रास उच्च न्यायालयातही याचिका दाखल केली होती पण ती फेटाळली. ◂ (वृत्तसंस्था)

### मालमत्ता एकतर्फी बळकावता येणार नाही

दान म्हणजे मोबदल्याशिवाय केलेले हस्तांतरण होय. त्यामुळे दुसऱ्याच्या मालमत्तेचे व्यवस्थापन करताना, असा निर्णय सामान्य बुद्धिमत्तेच्या किंवा सुज्ञ व्यक्तीचा असू शकत नाही. संरक्षक म्हणून काम करणाऱ्या सरकारवर धार्मिक किंवा चॅरिटेबल संस्थांचे रक्षण करण्याची जबाबदारी आहे, त्यांची मालमत्ता एकतर्फी बळकावता येणार नाही किंवा तशी परवानगी कोणत्याही अधिकाऱ्याला देता येणार नाही असे न्यायासनाने स्पष्ट केले. ■

### काय आहे प्रकरण ?

हे प्रकरण तामिळनाडूच्या इरोड जिल्ह्यातील मंदिराच्या मालकीची एक एकर जमिनीचे व्यवस्थापन मंदिर ट्रस्ट करत होते. ३० ऑगस्ट २०१७ रोजी, तहसीलदारांनी जारी केलेल्या प्रमाणपत्रात मंदिराचे तात्पुरते विश्वस्त, एस. भूपती यांनी मंदिराची जमीन सरकारकडे हस्तांतरित केल्याचे नमूद होते. त्याच दिवशी दानपत्र तयार करण्यात आले आणि तहसीलदारांनी तामिळनाडू सरकारच्या वतीने स्वीकारले. त्या जमिनीवर तालुका कार्यालय बांधण्यात आले. याविरोधात भाविकांनी न्यायालयात याचिका दाखल केली होती. ■

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





# अल्बेनियात विद्यार्थी आंदोलनाचा उद्रेक

**महागड्या शिक्षणाविरोधात सरकारविरोधात रोष**

## पंतप्रधान कार्यालयावर ताबा, संघर्षात ३६ नागरिकांचा मृत्यू



**तिराना, १७ ऑक्टोबर**

अल्बानियाची राजधानी तिरानामध्ये महागडे शिक्षण आणि खराब सुविधांविरोधात विद्यार्थ्यांनी हैदोस घालत पंतप्रधान कार्यालय, शासकीय इमारतींची जाळपोळ केली. हजारोंच्या संख्येने विद्यार्थी रस्त्यावर उतरले आणि त्यांनी पंतप्रधान एदी रामा यांच्या राजीनाम्याची मागणी केली. आंदोलकांनी अनेक बँकांच्या शाखांना आग लावल्याने देशात अस्थिर परिस्थिती निर्माण झाली आहे. सुरक्षा दल आणि विद्यार्थ्यांमध्ये झालेल्या संघर्षात ३६ नागरिकांचा मृत्यू झाला असून शेकडो जखमी आहे.

जमावाला हटवण्यासाठी सुरक्षा दल आणि पोलिसांनी अश्रुधूर आणि पाण्याचा वापर केला. या घटनेत डझनभर पोलिस कर्मचारी आणि आंदोलक जखमी झाले. फ्रान्स, जर्मनीसह जगातील एकूण ११ देशांमध्ये विद्यार्थी आपल्या मागण्यांसाठी आंदोलन करत असताना अल्बानियामध्येही आंदोलन भडकले आहे. गेल्या महिन्यांपासून विद्यार्थ्यांचे विविध मागण्यांसाठी आंदोलन सुरू आहे, याकडे सरकारने दुर्लक्ष केल्याने शुक्रवारी आंदोलनाला हिंसक वळण लागले. शिक्षणाचा वाढता खर्च आणि पदवी घेतल्यानंतर नोकरी मिळत नसल्याचा आरोप करत हजारो विद्यार्थ्यांनी पोलिसांनी लावलेले कठडे हटवत पंतप्रधान कार्यालयाच्या दिशेने कूच करत ताबा मिळवला. दुसरीकडे शासकीय इमारती, बँका, महाविद्यालयांची तोडफोड आणि जाळपोळ केली. याशिवाय पोलिसांच्या अनेक वाहनांना आग लावल्याने परिस्थिती हाताबाहेर गेली. पर्यायाने पोलिस आणि सुरक्षा दलांना बळाचा वापर करावा लागला. यात ३६ हून अधिक लोकांचा मृत्यू झाला. यात पोलिस आणि विद्यार्थ्यांचा समावेश असल्याची माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली.

**समस्यांवर तोडगा काढण्यात अपयश**

सरकारने चर्चा करण्याऐवजी अनेकदा विद्यार्थ्यांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केला. लोकांचा संताप केवळ सरकारविरोधात नाही, तर सरकारी संस्थांमधील उत्तरदायित्वाचा अभाव आणि लोकांच्या तक्रारींवर कारवाई न होणे यामुळेही नाराजी वाढली आहे. समस्यांवर तोडगा न काढल्याने आंदोलन भडकले आहे. एदी रामा २०१३ पासून अल्बेनियाचे पंतप्रधान आहेत. गेल्या वर्षी मे महिन्यात ते चौथ्यांदा या पदावर निवडून आले होते.

### संतापामागे अमेरिकेचा हात

सरकारविरोधी निदर्शने काही महिन्यांपूर्वीच सुरू झाली होती. यामागील एक कारण म्हणजे देशाच्या दक्षिण किनाऱ्यावर लक्झरी रिसॉर्ट उभारण्याची योजनाही आहे. हा प्रकल्प अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांचे जावई जेरेड कुशनर यांच्याशी संबंधित आहेत. दरम्यान वृत्तसंस्थेशी बोलताना पंतप्रधाना रामा यांनी राजीनाम्याची मागणी फेटाळून लावली. त्यांनी सांगितले की, सरकारे लोकशाही निवडणुकांद्वारे बदलतात. गेल्या वर्षी देशात निवडणुका झाल्या होत्या आणि विद्यार्थ्यांचे आंदोलन म्हणजे क्रांती नाही. ■

मात्र, त्यानंतर त्यांच्या सरकारमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांवर लागलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे लोकांमध्ये नाराजी वाढली आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# ‘परिसीमन’साठी संसदेच्या विशेष अधिवेशनाची शक्यता

**दोन्ही सभागृहात दोन तृतीयांश बहुमताची गरज**



**नवी दिल्ली, १७ ऑक्टोबर**

देशातील लोकसभा तसेच विधानसभा मतदारसंघाच्या परिसिमनाबाबतचे विधेयक पारित करण्यासाठी सरकार संसदेचे विशेष सत्र बोलावणार असल्याची चर्चा पुन्हा एकदा सुरु झाली आहे.

संसदेचे पावसाळी अधिवेशन १३ ऑगस्टला संपले, पण या अधिवेशनाच्या सत्रावसनाची अधिसूचना अद्यापही जारी झाली नाही. त्यामुळे महिला आरक्षण तसेच मतदारसंघाच्या परिसीमनाबाबतचे विधेयक पारित करण्यासाठी सरकार या महिन्याच्या अखेरपर्यंत विशेष अधिवेशन बोलावण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे संसदेच्या हिवाळी अधिवेशनालाही आता महिनाभराचा कालावधी उरला आहे.

महिला आरक्षण आणि मतदारसंघाच्या परिसीमनाबाबतचे घटनादुरुस्ती विधेयक पारित करण्यासाठी सरकारने १६ आणि १७ एप्रिलला संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले होते. पण या अधिवेशनात पुरेशा बहुमताच्या अभावी ही विधेयके पारित होऊ सकली नव्हती.

एक आठवड्याच्या सूचनेने संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले जाऊ शकते. घटनादुरुस्ती विधेयक पारित करण्यासाठी दोन्ही सभागृहात दोन तृतियांश बहुमताची गरज असते. ही दोन्ही विधेयक पारित करण्यासाठी लोकसभेत सरकारला २० खासदारांची तर राज्यसभेत ९ खासदारांची गरज आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)

### लोकसभेत २०, राज्यसभेत ९ खासदारांची गरज

५४३ सदस्यांच्या लोकसभेत सध्या तीन जागा रिक्त आहे. ५४० सदस्याच्या लोकसभेत हे विधेयक पारित करण्यासाठी ३६० खासदारांची आवश्यकता आहे. रालोआजवळ ३१८ खासदार आहे, द्रमुकचे २२ खासदार पाठिंबा देण्याची शक्यता आहे. द्रमुकच्या खासदारांनी पाठिंबा दिला तरी सरकारला आणखी २० खासदारांची व्यवस्था करावी लागणार आहे. २४५ सदस्यांच्या राज्यसभेत ३ जागा रिकामच्या आहेत, २४२ सदस्याच्या राज्यसभेत ही विधेयके पारित करण्यासाठी सरकारला १६२ खासदारांची आवश्यकता आहे, आणि सरकारजवळ सध्या १५३ खासदार आहेत. राज्यसभेत सरकारला ९ खासदार कमी पडतात. ■

### खडगे यांची सर्वपक्षीय बैठकीची मागणी

परिसीमनाबाबतच्या घटनादुरुस्ती विधेयकावर सर्वपक्षीय बैठक बोलावण्याची मागणी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र पाठवून केली आहे. सरकारने हे विधेयक जबरदस्तीने संसदेत पारित करुन घेण्याचा प्रयत्न करु नये, तर विधेयक मांडण्याआधी सर्व विरोधी पक्षांशी चर्चा करावी, अशी मागणी खडगे यांनी केली आहे. ■

# हिमाचल, मध्य प्रदेशसह छत्तीसगडमध्ये भूकंपाचे धक्के

**नवी दिल्ली, १७ ऑक्टोबर**

देशात शनिवारी तीन राज्यांमध्ये भूकंपाची नोंद झाली. हिमाचल प्रदेशातील शिमला, मध्य प्रदेशात सिंगरौली आणि छत्तीसगडमधील अंबिकापूरपासून १४० किलोमीटर उत्तर-वायव्य दिशेला भूकंप झाला.

शिमला येथील भूकंपाची तीव्रता ४.१ तर सिंगरौली आणि अंबिकापूरमधील भूकंपाची तीव्रता ३.५ होती. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राने दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी पहाटे ४:३६:२७ वाजता हिमाचल प्रदेशातील शिमला येथे भूकंप झाला. रिश्टर स्केलवर त्याची तीव्रता ४.१ नोंदवली गेली. भूकंपाचा केंद्रबिंदू ३१.२९८ अंश उत्तर अक्षांश आणि ७७.५२९ अंश पूर्व रेखांश येथे होता. त्याची खोली जमिनीखाली १० किलोमीटर नोंदवली गेली. तर छत्तीसगडमधील अंबिकापूरपासून सुमारे १४० किलोमीटर उत्तर-वायव्य दिशेला भूकंपाची नोंद झाली. त्याची तीव्रता ३.५ मोजली गेली. या भूकंपाची वेळही पहाटे ४:३६:२७ वाजता नोंदवली गेली. शनिवारी दुपारी मध्य प्रदेशातील सिंगरौली येथे भूकंपाचे धक्के जाणवले. दुपारी २:१२:३५ वाजता भूकंप झाला. त्याची तीव्रता रिश्टर स्केलवर ३.५ इतकी मोजण्यात आली. या भूकंपाचा केंद्रबिंदू २४.२३९ अंश उत्तर अक्षांश आणि ८२.५०२ अंश पूर्व रेखांश येथे होता. त्याची खोली जमिनीखाली १० किलोमीटर नोंदवली गेली. ◂ (वृत्तसंस्था)

# होर्मुझमध्ये सुरुंगाला धडकले सुपरटँकर

**कच्चे तेल वाहून नेत असताना अपघात**

**तेहरान, १७ ऑक्टोबर**

होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये शनिवारी आणखी एक सुपरटँकर सुरुंगावर आदळल्याने मोठा स्फोट झाला आणि त्याला आग लागली. इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स नौदलाने सांगितले की, हे जहाज नियमांचे उल्लंघन करून अनधिकृत मार्गाने जाण्याचा प्रयत्न करत होते. इस्लामिक रिपब्लिक न्यूज एजन्सीने या घटनेचा तपशील 'एक्स' या सोशल माध्यमावरील एका पोस्टमध्ये दिला आहे.

आयआरएनएच्या पोस्टमध्ये म्हटले आहे, २० लाख बॅरलपेक्षा जास्त कच्चे तेल वाहून नेणारा एक सुपरटँकर शनिवारी होर्मुझच्या सामुद्रधुनीतून अनधिकृत मार्गाने जाण्याचा प्रयत्न करत असताना तो इराणने पेरलेल्या सुरुंगावर आदळला. त्यामुळे स्फोट झाला आणि जहाजाला आग लागली. सुपरटँकरने आपल्या सर्व स्थान ट्रॅकिंग आणि रडार प्रणाली बंद केल्या होत्या. जहाजाने गुप्तपणे सामुद्रधुनी ओलांडण्याचा प्रयत्न केला. त्याला अमेरिकी लष्कराचा पाठिंबा होता, असा आरोप आयआरजीसीने केला आहे. आयआरजीसीने यापूर्वी इशारा दिला आहे की, होर्मुझची सामुद्रधुनी बंद आहे. होर्मुझमधील इराणी नियमांचे उल्लंघन करणाऱ्या जहाजांवर कारवाई केली जाईल. तसेच जी जहाजे नेव्हिगेशन प्रणाली बंद करतील त्यांनाही कारवाईला समोरे जावे लागेल. ◂ (वृत्तसंस्था)

### ... तर अशी घटना टाळता आली असती

वृत्तानुसार, आयआरजीसीने एका निवेदनात म्हटले आहे की, जहाजाने आपली ट्रॅकिंग उपकरणे बंद केली आणि इराणी अधिकाऱ्यांशी समन्वय साधण्याऐवजी अमेरिकी लष्करी सुरक्षेवर अवलंबून राहिले. त्यामुळेच हा अपघात घडला. जर टँकरने स्थापित नियमांचे पालन केले असते आणि संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क ठेवला असता, तर अशी घटना टाळता आली असती, असेही आयआरजीसीने स्पष्ट केले. ■

## चित्रपट वार्ता



### ऋषिकेशमध्ये केले अक्षय कुमारने चित्रीकरण

**मुंबई :** बॉलिवूड अभिनेता अक्षय कुमार आणि अभिनेत्री राशी खन्ना योगनगरी हृषिकेशमधील सिंगटॉली पुलावर चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान दिसून आले. चित्रपटाचे युनिट डेहराडून आणि मसुरीमध्ये चित्रीकरण केल्यानंतर आता हृषिकेश परिसरातील विविध ठिकाणी दृश्यांचे चित्रीकरण करत आहे. ऋषिकेश आणि आसपासच्या भागात चित्रीकरण सुरू आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन बॉलिवूडचे प्रसिद्ध दिग्दर्शक अनीस बज्मी करत आहेत. यात अक्षय कुमार आणि राशी खन्नासोबत अभिनेत्री विद्या बालनही मुख्य भूमिकेत दिसणार आहे. मात्र, चित्रपटाच्या नावाबाबत निर्मात्यांकडून अद्याप अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. अक्षय कुमार मंगळवारी दिल्लीहून रस्तेमार्गे उत्तराखंडला पोहोचला होता. त्याला मसुरीमध्ये दोन दिवस शूटिंग करायचे होते. लायब्ररी चौकात शूटिंगदरम्यान त्याच्या पाठीला ताण आल्याने वेदना सुरू झाल्या, त्यानंतर काम थांबवावे लागले होते. ■

### झुकरबर्गवरील ‘द सोशल रेकनिंग’ प्रदर्शित




**वॉशिंग्टन :** नुकताच प्रदर्शित झालेला ‘द सोशल रेकनिंग’ हा चित्रपट मेटाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मार्क झुकरबर्ग यांची कथा आणि तंत्रज्ञान उद्योगाचा व्यापक सामाजिक प्रभाव यांचा वेध घेतो. चित्रपट निर्माते ॲलेक्स गिब्नी यांच्या ‘मस्क’ या माहितीपटात इलॉन मस्क यांचे जीवन आणि प्रभाव यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. या माहितीपटाचा प्रीमियर ८ सप्टेंबर रोजी व्हेनिस चित्रपट महोत्सवात झाला आणि ९ ऑक्टोबर रोजी अमेरिकेतील चित्रपटगृहांत तो प्रदर्शित करण्यात आला. आता, ‘ओपनएआय’चे मुख्य कार्यकारी अधिकारी सॅम ऑल्टमन यांच्यावर केंद्रित आणखी एक चित्रपट प्रदर्शित होण्याच्या मार्गावर आहे. ‘आर्टिफिशियल’ असे शीर्षक असलेला हा चित्रपट ‘ओपनएआय’च्या उदयाची तसेच ऑल्टमन यांना पदावरून हटवण्यात आले आणि त्यानंतर त्यांची पुन्हा मुख्य कार्यकारी अधिकारी या पदी झालेली नियुक्ती याभोवतीच्या गोंधळाची कहाणी मांडतो. ■

### जयपूरमध्ये ‘आश्रम-४’चे चित्रीकरण पूर्ण



**मुंबई :** बॉलिवूड अभिनेता बॉबी देओल शनिवारी जयपूरहून मुंबईसाठी रवाना झाले. ते मागील जवळपास महिनाभरापासून जयपूर आणि आसपासच्या विविध ठिकाणी वेब सीरिज ‘आश्रम ४’चे चित्रीकरण करत होते. या वेळापत्रकात त्यांच्या गाजलेल्या बाबा निराला या व्यक्तिरेखेशी संबंधित दृश्यांचे चित्रीकरण करण्यात आले. जयपूरसोबतच आमेर, कूकस, खोरा बीसल, बांसखोह आणि दौसा यांसह अनेक ठिकाणी चित्रीकरण झाले. या काळात बाबा निराला यांच्या वेशातील बॉबी देओल यांचे व्हिडीओही समाज माध्यमावर व्हायरल झाले, ज्यामुळे सीरिजच्या नव्या सीझनबाबत प्रेक्षकांची उत्सुकता वाढली आहे. जयपूर विमानतळावरून रवाना होताना बॉबी यांनी माध्यमे आणि चाहत्यांनी दिलेल्या प्रेमाबद्दल आभार मानले. जयपूरमधील चित्रीकरणाचा अनुभव चांगला असल्याचे त्यांनी सांगितले. राजस्थानमधील ऐतिहासिक वास्तू, ग्रामीण परिसर आणि शहराभोवतालच्या लोकेशन्समुळे हे चित्रीकरण खास झाले. ■

# २३ ऑक्टोबरला पंतप्रधान करणार ‘चिन्मय’च्या संमेलनाचे उद्घाटन

**२५ देशांतील प्रतिनिधींचा सहभाग**

**मुंबई, १७ ऑक्टोबर**



चिन्मय मिशनच्या स्थापनेला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित जागतिक अमृत महोत्सवी संमेलनाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २३ ऑक्टोबर रोजी नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे होणार आहे. २३ ते २५ ऑक्टोबरदरम्यान होणाऱ्या या तीन दिवसीय संमेलनात २५ देशांतील प्रतिनिधी सहभागी होणार असून, भारतीय वेदांतज्ञानाचा आधुनिक जीवनाशी संबंध जोडण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.

मुंबई प्रेस क्लब येथे आयोजित पत्रकार परिषदेत चिन्मय मिशनचे जागतिक प्रमुख स्वामी स्वरूपानंद यांनी संमेलनाची माहिती दिली. स्वामी चिन्मयानंद यांनी भारतीय संस्कृती, उपनिषदे, भगवद्गीता आणि वेदांताचे ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आयुष्य समर्पित केले. त्यांच्या विचारांचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे, हा महोत्सवाचा प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. चिन्मय मिशनच्या माध्यमातून बालविहार, युवकांसाठी मार्गदर्शन, मूल्याधारित शिक्षण, ग्रामीण विकास आणि महिला सक्षमीकरणाचे विविध उपक्रम राबविले जातात. भगवद्गीतेतील पाच श्लोकांच्या आधारे व्यक्तिमत्त्व विकास, सकारात्मक विचार आणि भावनिक स्थैर्य वाढविण्यासाठी ‘गीता पंचामृत’ उपक्रम राबविला जात असल्याची माहितीही त्यांनी दिली. आजच्या काळात मानसिक संतुलन आणि भावनांचे व्यवस्थापन महत्त्वाचे झाले आहे. त्यामुळे प्राचीन भारतीय तत्त्वज्ञान आणि आधुनिक मानसशास्त्र यांचा समन्वय साधण्याची गरज असल्याचे स्वामी स्वरूपानंद यांनी अधोरेखित केले. या जागतिक संमेलनात आध्यात्मिक प्रवचने, विचारमंथन, भजनसंध्या, नृत्य आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच पर्यावरण संवर्धनासाठी कार्य करणारे संगीतकार रिकी केज यांच्या विशेष सादरीकरणाचाही समावेश असेल. चिन्मय मिशनच्या ७५ वर्षांच्या कार्याचा आढावा घेणारे विशेष प्रदर्शनही भरविण्यात येणार आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# पुलावरून कोसळली ट्रॅव्हल्स; आठ जणांचा मृत्यू



**कोटा, १७ ऑक्टोबर**

राजस्थानच्या कोटा जिल्ह्यात शनिवारी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्गावर झालेल्या एका अपघातात आठ प्रवाशांचा मृत्यू झाला तर १५ हून अधिक जण जखमी झाले. अपघातग्रस्त बस मध्य प्रदेशहून जयपूरला जात होती. दरम्यान, बस अचानक नियंत्रणाबाहेर गेली आणि ती पुलाखाली सुमारे २० फूट खोल नाल्यात कोसळली. बसमधील सर्व प्रवाशी भोपाळ व बैतुलचे रहिवासी असल्याचे सांगण्यात येत आहे.

सिमलिया पोलिस ठाण्याचे अधिकारी नंद सिंग यांनी सांगितले की, प्रवासी बसने कराडिया टोल प्लाझा ओलांडल्यानंतर सुलतानपूरच्या दिशेने जात होती. दरम्यान, बसचालकाला अचानक झोप लागली. अति वेगामुळे गाडीवरील नियंत्रण पूर्णपणे सुटले. बस रस्ता दुभाजक तोडून थेट पुलातून नाल्यात कोसळली. यात बसचा पुढचा भाग पूर्णपणे चक्काचूर झाल्यामुळे आतील प्रवासी गंभीर जखमी झाले. या अपघातात आठ जणांचा मृत्यू झाला असून १५ हून अधिक प्रवासी जखमी झाले आहेत. त्यापैकी काहींची प्रकृती गंभीर आहे. कोटा येथील भीषण अपघातानंतर लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांनी कठोर भूमिका घेतली आहे. घटनेची माहिती मिळताच त्यांनी तात्काळ रुग्णालयात धाव घेत जखमींची भेट घेतली. तसेच त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करून त्यांचे सांत्वन केले. संपूर्ण घटना गांभीर्याने घेत लोकसभा अध्यक्षांनी तात्काळ चौकशीचे आदेश दिले आहेत. ◂ (वृत्तसंस्था)




# पृथ्वीपेक्षाही चांगले ग्रह अस्तित्वात ?

**शास्त्रज्ञांनी व्यक्त केले मत**

**वॉशिंग्टन, १६ ऑक्टोबर**

पृथ्वी हा जीवसृष्टीला आधार देणारा एकमेव ज्ञात ग्रह आहे, परंतु शास्त्रज्ञांच्या मते विश्वात असे इतर ग्रह असू शकतात जे सजीवांसाठी पृथ्वीपेक्षाही अधिक उत्तम परिस्थिती प्रदान करतात. ‘सुपरहॅबिटेबल वर्ल्ड्स’ (अति-निवासायोग्य जग) म्हणून ओळखले जाणारे हे ग्रह अधिक उबदार हवामान, अधिक पाणी आणि अशा वातावरणाने युक्त असू शकतात. जिथे जीवसृष्टी पृथ्वीच्या तुलनेत अब्जावधी वर्षे अधिक काळ टिकून राहू शकते आणि विकसित होऊ शकते, असे मत शास्त्रज्ञांनी व्यक्त केले आहे.

एका अहवालानुसार, संशोधक पृथ्वीपेक्षा किंचित मोठे ग्रह, विशेषतः विशिष्ट प्रकारच्या ताऱ्यांभोवती फिरणारे ग्रह, हे आपल्या पृथ्वीपेक्षाही जीवसृष्टीसाठी अधिक अनुकूल असू शकतात, अशा शक्यतेचा शोध घेत आहेत. वैज्ञानिकांच्या मते ‘सुपरहॅबिटेबल’ (अति-निवासयोग्य) ग्रह म्हणजे जीवनाच्या निर्मितीसाठी आणि भरभराटीसाठी पृथ्वीपेक्षाही अधिक उत्तम परिस्थिती प्रदान करू शकतात, अशा जगांना म्हणतात. असे ग्रह पृथ्वीच्या तुलनेत सुमारे २० ते ३० टक्के अधिक रुंद असू शकतात आणि त्यांचे वस्तुमान पृथ्वीच्या साधारण दुप्पट असू शकते. त्यांचे अधिक प्रबळ गुरुत्वाकर्षण त्यांना अधिक जाड वातावरण टिकवून ठेवण्यास मदत करू शकते. ज्यामुळे कदाचित अधिक उबदार आणि स्थिर हवामान निर्माण होऊ शकेल. तसेच, त्यांचा मोठा लोखंडी गाभा अधिक शक्तिशाली चुंबकीय क्षेत्र निर्माण करू शकतो, ज्यामुळे अवकाशातील घातक प्रारणांपासून अधिक उत्तम संरक्षण मिळू शकेल.

संशोधकांच्या मते, या ग्रहांवर विस्तीर्ण उथळ समुद्र, सरोवरे आणि बेटे असू शकतात, जी विविध प्रकारच्या जीवसृष्टीसाठी आदर्श परिस्थिती निर्माण करतात. पृथ्वीवर, उष्णकटिबंधीय बेटे आणि उथळ जलाशय काही अत्यंत समृद्ध परिसंस्थांना आधार देतात. ज्या ग्रहांवर अशा प्रकारचे वातावरण अधिक विस्तीर्ण क्षेत्रांत पसरलेले असते, तिथे कदाचित अधिक मोठी जैवविविधता असू शकते, असे मत शास्त्रज्ञांचे आहे. तथापि, या अटी केवळ सैद्धांतिक आहेत आणि अद्याप कोणत्याही अतिनिवासयोग्य ग्रहाची पुष्टी झालेली नाही. ◂ (वृत्तसंस्था)

### नारंगी तारे सूर्यापेक्षा अधिक चांगले

सर्वात मनोरंजक निष्कर्षांपैकी एक ‘के-ड्वार्फ’ नावाच्या ताऱ्याच्या प्रकाराशी संबंधित आहे. हे तारे आपल्या सूर्यापेक्षा लहान, थंड आणि अधिक नारंगी रंगाचे असतात. ते त्यांचे इंधन खूप हळू जाळतात, ज्यामुळे ते अब्जावधी वर्षे स्थिरपणे चमकू शकतात. यामुळे जवळच्या ग्रहांवरील जीवसृष्टीला विकसित होण्यासाठी आणि उत्क्रांत होण्यासाठी अधिक वेळ मिळू शकतो. ■

# बांगलादेशात रिसॉर्टला आग; १० ठार

**ढाका, १७ ऑक्टोबर**

बांगलादेशमध्ये कॉक्स बाजार जिल्ह्यातील एका समुद्रकिनारी असलेल्या रिसॉर्टला भीषण आग लागली. यात सुमारे १० जण ठार तर नऊ जण जखमी झाले. मरीन ड्राईव्हवरील पटुआरटेक बीचजवळ असलेल्या इनानी भागातील 'तुपतुप रेस्टो अँड रिसॉर्ट'मध्ये शनिवारी सकाळी सुमारे ६:३० वाजता ही घटना घडली. वृत्तानुसार, तीन मजली रिसॉर्ट प्रामुख्याने बांबू आणि लाकडापासून बनवलेले होते. आग लागल्यानंतर संपूर्ण इमारत जळून खाक झाली. कॉक्स बाजार अग्निशमन दलाचे उप-सहाय्यक संचालक सय्यद मुहम्मद मोर्शेद हुसेन यांनी सांगितले की, या आगीत संपूर्ण इमारत नष्ट झाली. हे रिसॉर्ट कोलाटोलीपासून सुमारे २९ किलोमीटर अंतरावर, समुद्रकिनारी असलेल्या शहराच्या प्रवेशद्वाराजवळ आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# हातमागाला पुन्हा वैभव मिळवून देणार

## नितीन गडकरी यांचे प्रतिपादन

**नागपूर, १७ ऑक्टोबर**

पूर्वी प्रत्येक हलबा आदिवासी समाजाच्या घरात हातमाग होता; मात्र आता ही परंपरा संपण्याच्या मार्गावर आहे. हातमागाला पुन्हा वैभव मिळवून देण्यासाठी आणि या विणकर समाजाला रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी धापेवाडा टेक्सटाईल प्रकल्प सुरू करण्यात आला, असे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले.

विदर्भातील पारंपरिक हातमाग उद्योगाला आधुनिक फॅशन, डिझाईन आणि व्यापक बाजारपेठेशी जोडण्याच्या दिशेने धापेवाडा टेक्सटाईल उद्योग प्रोड्यूसर कंपनी लिमिटेडच्या धापेवाडा (कळमेश्वर) येथे कंपनीच्या नूतन इमारतीचे लोकार्पण आणि हातमाग उद्योगाचा शुभारंभ शनिवारी सुप्रसिद्ध अभिनेत्री व खासदार हेमा मालिनी यांच्या हस्ते फित कापून करण्यात आला. केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक व राष्ट्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडला. यावेळी बोलताना नितीन गडकरी म्हणाले, २०२१ मध्ये या कामाची सुरुवात करून महिलांना प्रशिक्षण देण्यात आले. सुरुवातीला बाजारपेठेबाबत साशंकता होती; मात्र उत्पादनाचा दर्जा सुधारल्याने मागणी वाढली आहे. उत्पादन वाढविण्यासाठी गडचिरोली आणि वाशीम जिल्ह्यांत प्रकल्प सुरू करण्यात आले असून, भविष्यात खापा येथेही प्रकल्प सुरू करण्याची योजना आहे.



अभिनेत्री हेमामालिनींच्या हस्ते धापेवाडा टेक्सटाईलच्या नव्या इमारतीचे लोकार्पण करताना खा. हेमामालिनी

या कार्यक्रमाला केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरिराज सिंह, राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, आ. डॉ. राजीव पोतदार, आ. चरणसिंग ठाकूर, आ. आशिष देशमुख, आ. समीर मेघे, महापौर नीता ठाकरे, उपमहापौर लीला हाथीबेड यांची प्रमुख उपस्थिती होती. केंद्रीय मंत्री गिरिराज सिंह म्हणाले की, नितीन गडकरी हाती घेतलेले काम पूर्णत्वास नेतात. मग ते रस्ते असोत, कृषी क्षेत्र असो किंवा वस्त्रोद्योग. रोजगारनिर्मितीची मोठी क्षमता वस्त्रोद्योगात आहे. धापेवाडा प्रकल्प वस्त्रोद्योगातील महत्त्वाचा मैलाचा दगड ठरत आहे.

प्रास्ताविकातून सुधीर दिवे यांनी सांगितले की, कंपनीच्या ७०० हून अधिक महिला सभासद असून, १०० हातमाग कार्यरत आहेत. येथे तसर सिल्क, सिल्क-कॉटन आणि कॉटन साड्यांची निर्मिती केली जाते. स्थानिक महिलांना प्रशिक्षण देऊन रोजगार उपलब्ध करून देण्यावर या प्रकल्पाचा भर आहे. या कार्यक्रमाला कांचन गडकरी, धापेवाडा टेक्सटाईल उद्योग प्रोड्यूसर कंपनीचे सुधीर दिवे, राजश्री बापट, दिलीप धोटे, किरण खडगी, दिलीप डाखोळे, प्रभू महाराज पराते, गोविंद झोडे, गंगाधर नागपुरे, मिलिंद वेळेकर, ज्योती मानकर, सोना अंबोलीकर, सीमा साबळे आणि रुचिता पराते, रमेश मानकर, सुरेश चिचघरे, कॅडीएन्स अकादमीचे रुपेश कुमार यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. ◂ (तभा वृत्तसेवा)

### हेमामालिनी यांना धापेवाडाची साडी भेट

हेमामालिनी यांनी प्रकल्पाची पाहणी केली. त्यांनी प्रकल्पाचे कौतुक केले. यादरम्यान त्यांना आवडलेली साडी नितीन गडकरी यांच्या हस्ते भेट देण्यात आली. हेमामालिनी यांनी सर्वांना नवरात्रीच्या शुभेच्छा देत धापेवाडा टेक्सटाईल प्रकल्पाला भेट देऊन आनंद व्यक्त केला. नागपूरशी आपले जुने नाते असल्याचे सांगत त्यांनी नितीन गडकरी यांच्या नावीन्यपूर्ण उपक्रमांचे कौतुक केले. ■

### देशभरात मिळेल बाजारपेठ : संजय सावकारे

संजय सावकारे म्हणाले, नितीन गडकरी यांनी धापेवाड्याला नवी ओळख मिळवून दिली. फॅशन शोच्या माध्यमातून पारंपरिक कलेच्या मार्केटिंगला चालना मिळेल. नागपूर विमानतळावरही पारंपरिक वस्तूंच्या विक्रीची सुविधा उपलब्ध व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. ■

# जिल्हा बँकेवर कारभारी म्हणून यंदा नवीन चेहरे!

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही शेतकऱ्यांची बँक म्हणून ओळखली जात असली तरी याची दुसरी बाजू म्हणजे हा राजकीय अड्डा देखील मानले जाते. सोलापूर जिल्हा बँकेवर आजपर्यंत अनेक दिग्गजांनी वर्चस्व गाजवले पण बँकेवर राज्य करणाऱ्यांमध्ये सातत्याने घराणेशाहीच दिसून आली. पण आता सलग १० वर्षे संचालक राहिलेल्यांना विश्रांती या सहकारातील नवीन कायद्यामुळे अनेकांची गोची झाली आहे. सोलापूर जिल्हा बँकेतील आर्थिक अनियमिततेमुळेही अनेक दिग्गजांना निवडणुकीच्या रिंगणापासून लांब रहावे लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे या दिग्गजांनी पर्याय म्हणून आपल्या वारसदारांसाठी तयारी केल्याचे चर्चेत आहे. त्यामुळे या निवडणुकीनंतर जिल्हा बँकेवर कारभारी म्हणून नवीन चेहरे असण्याची दाट शक्यता व्यक्त होत आहे.

देश स्वातंत्र्य होण्यापूर्वी ब्रिटीश कार्यकाळात स्थापन झालेल्या सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा इतिहा खूप मोठा आहे. सन १९०४ मध्ये देशातील पहिला सहकार कायदा अस्तित्वात आला. १९१७ साली पंढरपूर येथे बैठक होवून जिल्हा बँक स्थापनेचा निर्णय घेण्यात आल्यानंतर ८ मार्च १९१८ रोजी सोलापूर जिल्हा बँकेची स्थापना झाली. २६ मार्च १९१८ ला बँकेचे पहिले संचालक मंडळ अस्तित्वात आले. बँकेचे पहिले अध्यक्ष म्हणून तत्कालीन ब्रिटिश जिल्हाधिकारी मि.सिमकॉक्स यांनी काम पाहिले तर इतर दोन संचालकांमध्ये जिल्हा न्यायाधीश व मानद संघटक यांचा समावेश होता. कालांतराने जिल्हा बँकेची धुरा जिल्ह्यातील नेते करमाळ्याचे नामदेवराव जगताप आणि त्यानंतर अकलूजचे शंकरराव मोहिते-पाटील यांच्याकडे आली. त्यांनी जवळपास ४० वर्षे धुरा सांभाळली. सांगोल्याचे गणपतराव देशमुख, पंढरपूरचे सुधाकर परिचारक, भाई एस.एम. पाटील, वि.गु. शिवदारे अण्णा, अनगरकर-पाटील, माढ्याचे शिंदे आदींनी बँकेसाठी योगदान दिले. बँकेच्या व्यवहारात काही अनियमितता आली. ३८ कोटींच्या आर्थिक नुकसानीस बँकेचे ३५ तत्कालीन संचालक व अधिकारी यांना थेट जबाबदार धरुन २०१८ साली बँकेचे संचालक मंडळ बरखास्त होवून बँकेवर प्रशासक आले असून ते आजतागायत कार्यरत आहे. बँकेचे संचालक मंडळ बरखास्त झाले तेंव्हा मोहोळचे राजन पाटील चेअरमन होते. १९७५ साली बँकेच्या ४६ शाखा होत्या. आज तब्बल २२० शाखा कार्यरत आहेत. मार्च २०२६ अखेर सोलापूर जिल्हा बँकेकडे ५ हजार ७५७ कोटींच्या ठेवी होत्या तर एकूण व्यवसाय १० हजार २३० कोटींचा होता.







जिल्हा बँक पुन्हा आर्थिक सुस्थितीत आल्यानंतर बँकेच्या सार्वत्रिक निवडणुकीची धामधूम सुरु झाली आहे. बँकेच्या संचालक मंडळाची संख्या १९ इतकी आहे. जिल्ह्यातील ११ तालुक्यांचे अकरा सोसायटी मतदारसंघ, महिला प्रतिनिधी २, अनुसूचित जाती/जमाती १, इतर मागासवर्ग १, भटक्या विमुक्त/विशेष मागास १, नागरी बँका/पतसंस्था १, दुग्ध संस्था व वैयक्तिक सभासद १ आणि कृषी, पणन संस्था, शेतमाल प्रक्रिया व साखर कारखाने १ असे एकूण १९ संचालक आहेत.

हरकती-सूचना आणि दावे-प्रतिदाव्यानंतर नुकतीच बँकेच्या मतदारांची अंतिम मतदार यादी प्रसिध्द झाली आहे. बँकेच्या एकूण १२९२ सोसायट्यांपैकी नोंदणी रद्द २ वगळता १२९० सोसायट्या मतदानासाठी पात्र असून यांपैकी थकबाकीमुळे ७०८ सोसायट्या अपात्र ठरल्याने फक्त ५८४ सोसायट्या संचालकपदासाठी पात्र आहेत. १४ मार्च रोजी प्रसिध्द मतदार यादीनुसार निवडणुकीसाठी जवळपास २ हजार ५४९ मतदार मतदानासाठी पात्र ठरले आहेत. यापैकी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायट्यांसाठी १ हजार २९० मतदार पात्र आहेत. ३२१ वैयक्तिक मतदार, दूध संस्था व वैयक्तिक सभासद मतदार संघ ४३३, पणन व शेतमाल प्रक्रिया संस्था १२२, नागरी बँका व पतसंस्था १ हजार ४२३ अशी मतदारांची वर्गवारी आहे. सोसायट्यांच्या मतदारांना त्यांच्या तालुक्यातच मतदान करता येते. मात्र उर्वरित इतर ८ जागांपैकी दुग्ध संस्था व वैयक्तिक सभासद मतदार संघ वगळता इतर जागांसाठी मतदान करता येते.

येत्या काही दिवसात जिल्हा बँक सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेचा बिगुल वाजण्याची शक्यता आहे. यंदा भाजपाकडून बँकेवर कब्जा मिळविण्यासाठीचे नियोजन सुरु आहे. बँकेचे अनेक माजी संचालक जे की पूर्वी कॉंग्रेस-राष्ट्रवादीत होते ते आता भाजपामध्ये आहेत. भाजपाकडे माजी सहकार मंत्री राहिलेले अनुभवी नेते असून तेदेखील या निवडणुकीच्या रिंगणात उतरल्याची चर्चा आहे. भाजपाचे पारडे जड वाटत असले तरी विरोधकांना दुबळे मानून चालणार नाही. कारण सहकारावर वर्चस्व असलेली अनेक विरोधक मंडळी निवडणुकीसाठी तैनात झालेली आहे. भाजपाचे वरिष्ठ नेते बँक निवडणूक बिनविरोध होण्यासाठी विरोधकांशी चर्चा करतात की, विधान परिषद निवडणुकीप्रमाणे जिल्हा बँकेचीही निवडणूक लागते हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## पिनराई विजयन यांना ईडीचे समन्स

**तिरुवनंतपुरम** : केरळमचे माजी मुख्यमंत्री पिनराई विजयन यांना शनिवारी अंमलबजावणी संचालनालयाने (ईडीन) समन्स बजावले. तिरुवनंतपुरम येथील भाड्याच्या घरावर समन्सची नोटीस चिकटवण्यात आली. ईडीने त्यांना २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता हजर राहून जबाब नोंदवण्यास आणि संबंधित कागदपत्रे सादर करण्यास सांगितले आहे. विजयन यांच्यावर दोन कंपन्या सीएमआरएल आणि एक्सालॉजिक यांच्यात झालेल्या पैशांच्या व्यवहारात अनियमितता केल्याचा आरोप आहे. यापैकी एक्सालॉजिक ही कंपनी त्यांच्या मुलीची आहे. विजयन यांच्यावर मनी लॉन्डरिंग आणि भ्रष्टाचाराचे आरोप आहेत. या प्रकरणात केरळम दक्षता आणि भ्रष्टाचारविरोधी विभागाने यापूर्वीच दोन एफआयआर दाखल केले आहेत.

# मुख्यमंत्री फडणवीस डी. लिट पदवीने सन्मानित

## अदानी समूहाचा पहिला दीक्षांत समारोह

**वर्धा, १७ ऑक्टोबर**

सावंगी मेघे येथील दत्ता मेघे अभिमत विद्यापीठाचा १७ वा दीक्षांत समारंभ शनिवार, १७ रोजी दत्ता मेघे सभागृह येथे आयोजित करण्यात आला होता. यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना डी. लिट. या मानद पदवीने कुलपती प्रीती अदानी यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. सावंगीच्या वैद्यकीय चळवळीचे प्रणेते दत्ता मेघे यांच्याशिवाय पहिल्यांदाच हा दीक्षांत समारंभ झाला. या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना डी. लिट. तर एनएमसीचे अध्यक्ष डॉ. अभिजित शेठ यांना डी. एससी. या मानद पदवीने सन्मानित करण्यात आले. यावेळी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या कुलपती डॉ. प्रिती अदानी होत्या. तर अदानी समूहाचे डॉ. मलय महादेवी, विश्वस्त सागर मेघे, प्र-कुलगुरू डॉ. ललीतभूषण वाघमारे, कुलसचिव डॉ. श्वेता काळे पिसुळकर आदींची उपस्थिती होती.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना डी. लिट. पदवीने सन्मानित करताना कुलपती प्रीती अदानी बाजूला डॉ. वाघमारे.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सध्या नवनवे आजार डोके वर काढत आहेत. काही ठिकाणे मधुमेहींची राजधानी म्हणून नावारुपास येत आहेत. यात कर्करोगाची देखील भर पडत आहे. या आजारांवर नियंत्रण मिळविण्याकरिता आरोग्य क्षेत्रात नव्या संशोधनांची गरज असल्याचे ते म्हणाले. पदकं मिळालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी गुणवत्ता यादीत मुलीच आघाडीवर असल्याचे म्हणत मुलांना 'फॉलो देम' असा सल्ला दिला.

कुलपती प्रीती अदानी यांनी अदानी समूह हेल्थकेअरच्या माध्यमातून स्थानिक गरजा लक्षात घेऊन काम करणार असल्याचे सांगून दत्ता मेघे यांच्या कार्याचा उल्लेख केला. वर्धेतील रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालय देशातीलच नव्हे तर जगातील अव्वल दर्जाचे होईल, असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला. ◂ (तभा वृत्तसेवा)

# आता 'एटीएम'मधून मिळणार रेशनचे धान्य

## महाराष्ट्र शासनाला युनोचे सहकार्य; नाशिकमध्ये प्रारंभ





**नाशिक, १७ ऑक्टोबर**

रास्तभाव दुकानांच्या वेळेची मर्यादा ओलांडून पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या सोयीच्या वेळी अन्नधान्य उपलब्ध व्हावे, या उद्देशाने राज्यातील पहिले अत्याधुनिक 'अन्नपूर्ती धान्य एटीएम' नाशिकमध्ये सुरू करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासन आणि संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक अन्न कार्यक्रमाच्या सहकार्याने सुरू झालेल्या या उपक्रमामुळे सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक पारदर्शक, गतिमान आणि लाभार्थीकेंद्रित होण्यास मदत होईल असा विश्वास राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी व्यक्त केला.

नाशिक रोड येथील विभागीय आयुक्त कार्यालयाजवळील डिस्टिलरी क्वार्टर, गोरेवाडी रोड येथे मंत्री भुजबळ यांच्या हस्ते या धान्य एटीएमचे उद्घाटन करण्यात आले.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील अडचणी दूर करून पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे अन्नधान्य सन्मानाने आणि वेळेत मिळावे, यासाठी शासन प्रयत्नशील आहे, असे मंत्री भुजबळ म्हणाले. ◂ (तभा वृत्तसेवा)

### नागपूर, ठाण्यालाही मिळणार ही सुविधा

जिल्हाधिकारी प्रसाद यांनी नाशिकमध्ये अन्नपूर्ती धान्य एटीएम सुरू केल्याबद्दल मंत्री भुजबळ यांचे आभार मानले. या अत्याधुनिक यंत्राच्या माध्यमातून पात्र लाभार्थ्यांना चोवीस तास धान्य वितरणाची सुविधा उपलब्ध होणार असून, नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. अन्नपूर्ती धान्य एटीएममुळे स्थलांतरित कामगारांसह सर्व पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या सोयीनुसार धान्य मिळविणे सुलभ होणार आहे, असे उपायुक्त काळे म्हणाले. महाराष्ट्रात प्रस्तावित तीन धान्य एटीएमपैकी पहिल्या एटीएमची सुरुवात नाशिक येथे झाली असून, पुढील एटीएम नागपूर आणि ठाणे येथे सुरू करण्याचे नियोजन आहे. यावेळी मंत्री भुजबळ यांच्या हस्ते धान्य एटीएमच्या माध्यमातून लाभार्थ्यांना धान्य वितरित करण्यात आले. ■

## प्रशांत किशोरविरुद्ध गुन्हा दाखल

**पाटणा** : बिहारचे मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांच्याबाबत वादग्रस्त वक्तव्य केल्याप्रकरणी जनसूराज पक्षाचे संस्थापक प्रशांत किशोर यांच्याविरोधात शनिवारी पाटणा सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. याप्रकरणात त्यांच्या विरोधात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. तक्रारीत म्हटले आहे की, आमदार प्रशांत किशोर यांचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर फिरत आहे. त्यात बिहारचे मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांच्यावर गोळी झाडण्याबद्दल वक्तव्य करण्यात आले आहे. या वक्तव्यामुळे राज्यात तणाव निर्माण होण्याची आणि कायदा व सुव्यवस्था बिघडण्याची शक्यता आहे. त्यामुळे, प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, निष्पक्ष चौकशी करून कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही तक्रारीत करण्यात आली आहे. ■

# पत्नीला भांडी धुण्यास सांगणे क्रूरता नव्हे!

## मुंबई उच्च न्यायालयाकडून गुन्हा रद्द

**मुंबई, १७ ऑक्टोबर**

पत्नीला घरातील कपडे किंवा भांडी धुण्यास सांगणे म्हणजे भारतीय दंड संहितेच्या (आयपीसी) कलम ४९८-अ अंतर्गत क्रूरता किंवा छळ ठरत नाही, असे स्पष्ट करत मुंबई उच्च न्यायालयाने पती आणि त्याच्या पाच नातेवाईकांविरोधात दाखल केलेला गुन्हा रद्द केला. अशा प्रकरणांमध्ये खटला चालवणे म्हणजे कायद्याचा गैरवापर असल्याचे ताशेरेही न्यायालयाने ओढले.

न्या. अभय जे. मंत्री यांच्या एकलपीठासमोर पती व त्याच्या नातेवाईकांनी एफआयआर रद्द करण्यासाठी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी पार पडली. न्यायालयाने आदेशात म्हटले की, तक्रारदार महिलेच्या आरोपांमध्ये कोणतेही ठोस तथ्य आढळत नाही. जरी महिलेला कपडे आणि भांडी घासण्यास सांगितले होते हे गृहीत धरले, तरीही अशी कृती भादंवि कलम ४९८-अ (पती किंवा नातेवाईकांकडून विवाहितेवर होणारी क्रूरता) अंतर्गत मोडत नाही. त्यामुळे या कृत्याला क्रूरता म्हणता येणार नाही. संबंधित महिलेने पती आणि त्याच्या नातेवाईकांविरोधात दाखल केलेल्या तक्रारीत मूल होत नसल्याने 'वांझ' म्हणून टोमणे मारणे आणि क्रूर वागणूक देण्याचा आरोप केला होता. २०२४ मध्ये पतीने एका नातेवाईकाच्या घरी नेऊन कपडे आणि भांडी धुण्यासारखी घरातील कामे करण्यास भाग पाडले. ◂ (वृत्तसंस्था)

# श्री तुळजाभवानी देवींची शेषशाही अलंकार महापूजा संपन्न

## शारदीय नवरात्र महोत्सवात सातव्या माळेनिमित्त धार्मिक विधी; देवीच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी

**तभा वृत्तसेवा, तुळजापूर, दि. १७ ऑक्टोबर -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई श्री तुळजाभवानी देवीच्या शारदीय नवरात्र महोत्सवात शनिवार, दि. १७ ऑक्टोबर रोजी सातव्या माळेनिमित्त श्री देवीजींची शेषशाही अलंकार महापूजा विधिवत मांडण्यात आली. या विशेष महापूजेमुळे तुळजाभवानी मंदिरातील धार्मिक वातावरण भक्तिमय झाले. नवरात्र महोत्सवाच्या निमित्ताने देवीच्या विविध अलंकार महापूजा आणि धार्मिक विधींना विशेष महत्त्व असून, प्रत्येक पूजेमागे असलेल्या धार्मिक आख्यायिका आणि परंपरांमधून देवीच्या सामर्थ्याचे दर्शन घडते.

धार्मिक आख्यायिकेनुसार, भगवान विष्णू क्षीरसागरात शेषशय्येवर विश्राम घेत असताना त्यांच्या नेत्रकमलात देवी विश्राम घेत होती. त्याच वेळी भगवान विष्णूंच्या कानातील मलापासून शुंभ आणि निशुंभ या दैत्यांची उत्पत्ती झाली. या दैत्यांनी भगवान विष्णूंवर आक्रमण करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी ब्रह्मदेवांनी देवीची स्तुती करून तिला जागृत केले.

देवी प्रकट झाल्यानंतर तिने शुंभ आणि निशुंभ या दैत्यांचा संहार करून भगवान विष्णूंचे रक्षण केले. देवीच्या या पराक्रमामुळे प्रसन्न झालेल्या भगवान विष्णूंनी आपली शेषशय्या देवीला अर्पण केली, अशी धार्मिक मान्यता आहे. या आख्यायिकेच्या स्मरणार्थ श्री तुळजाभवानी देवीची शेषशाही अलंकार महापूजा मांडण्याची परंपरा आहे. या पूजेतून देवीचे सामर्थ्य, दुष्ट शक्तींचा नाश करण्याची तिची शक्ती आणि भक्तांच्या रक्षणासाठी सदैव तत्पर असलेले तिचे स्वरूप अधोरेखित होते.

या वेळी तहसीलदार तथा विश्वस्त अरविंद बोळंगे, तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने, तहसीलदार मृणाल जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी मनोहर पाटील, पोलीस निरीक्षक बालाजी येवते, महंत तुकोजीबुवा, महंत वाकोजीबुवा यांच्यासह पुजारी, सेवेकरी आणि भाविक उपस्थित होते.

शारदीय नवरात्र महोत्सवातील सातव्या माळेनिमित्त पार पडलेल्या शेषशाही अलंकार महापूजेमुळे श्री तुळजाभवानी देवीच्या धार्मिक परंपरेचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले.

### सिंह वाहनावरून छबिना मिरवणूक

दरम्यान, शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर रोजी रात्री श्री तुळजाभवानी देवीजींची सिंह वाहनावरून छबिना मिरवणूक पार पडली. नवरात्र महोत्सवातील या पारंपरिक धार्मिक सोहळ्यात मंदिर प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी, महंत, पुजारी, सेवेकरी आणि भाविक उपस्थित होते. देवीच्या छबिना मिरवणुकीमुळे मंदिर परिसरात धार्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## रोखठोक

**दिनेश गुणे**

# लांडगा आला रे...

जगातील जवळपास प्रत्येक भाषेत लोककथांची परंपरा मोठी आहे. काही लोककथा तर जागतिक बोधकथा म्हणून सांगितल्या गेल्या आहेत. अशाच प्रसिद्ध लोककथांपैकी एक असलेली मेंढपाळाच्या खोडसाळ मुलाची गोष्ट ऐकत आपल्या अनेक पिढ्या मोठ्या झाल्या. या लोककथेचा संदेश सर्वांच्या मनावर कोरला गेला असला, तरी त्यानुसार वागण्याचे संस्कार मात्र पिढ्यान्पिढ्यांपासून समाजमनावर फारसे झालेले नाहीत. म्हणूनच, एखादे जीवघेणे संकट येणार, याचे संकेत मिळतात तेव्हा सारे सावध होतात; संकट सरताच पुन्हा जुन्या बेफिकिरीने जगरहाटी सुरू राहते. कोविड महामारीच्या काळातील अनुभव आणि त्यापासून बोध घेतल्याच्या आवेशात घेतल्या गेलेल्या आणाभाका आता प्रत्यक्ष आचरणात आल्या असत्या, तर खरे म्हणजे उभ्या जगात आज केवळ माणुसकीचे निर्मळ झरे वाहताना दिसले असते. माणसे माणसाशीच नव्हे, तर निसर्गातील प्रत्येक घटकाशी माणसासारखी वागत आहेत, कोणत्याही विकृतीला जगात कोठेही थारा राहिलेला नाही, भ्रष्टाचार, भांडणे, भूक, भय आदी माणसाच्या मुळावर आलेल्या वाईट गोष्टी पूर्णपणे इतिहासजमा झाल्या आहेत आणि संत ज्ञानेश्वरांच्या पसायदानाच्या प्रार्थनेस परमेश्वराने 'तथास्तु' म्हटल्यावर व्हावे एवढे सारे काही सुंदर झाले आहे, असे दृश्य जगभर दिसले असते. मात्र, कोविडचे ते जीवघेणे संकट सरल्यावर सुरू झालेल्या नव्या जगरहाटीने त्याआधी शिल्लक असलेल्या माणुसकीलाही आव्हान देण्याचा पवित्रा घेतला. युद्धखोरी, भय, भूक, भ्रष्टाचाराने जागतिक कळस गाठला की पुन्हा एखादे संकट आलेच, तर त्यानंतर हे सारे करता येईल किंवा नाही अशा भयाने त्याचा विक्रम करण्याची जणू स्पर्धा सुरू झाली. अशा काळातच एखादी आवई पुन्हा उठते. एखादे नवे संकट जगावर कोसळणार असे इशारे जारी होतात आणि माणसे जागी होतात. संकटास तोंड देण्याच्या सावधगिरीसाठी स्पर्धा सुरू होते. सर्वात आधी सुरक्षिततेची सारी साधने आपल्या हाती मिळावीत याकरिता प्रचंड चढाओढ सुरू होते. यामध्ये जो शिरजोर ठरतो, तो संकटकाळ निभावून नेतो आणि सुरक्षिततेच्या साधनांअभावी संकटास तोंड देणाऱ्यांना संकटासमोर निमूटपणे गुडघे टेकावे लागतात.

मेंढपाळाच्या खोडसाळ पोराच्या त्या गोष्टीतील संदेशाचा या मानवी स्वभावाशी फार जवळचा संबंध आहे. एखाद्या सुंदर माळरानावर हिरवाईची चादर पसरलेली असताना, मेंढपाळांची पोरे आपापल्या मांजरातील शेळ्या-मेंढ्या चरावयास घेऊन जातात, जनावरे निवांतपणे चरायला लागली की, पोरांचे गप्पांचा अड्डा रंगतो. कुणी मैदानी खेळ खेळू लागतात तर कुणी फडक्यात बांधून आणलेल्या कांदा-चटणी-भाकरीची न्याहारी करून गवताच्या गादीवर निर्धास्तपणे आडवे होतात. अशा निवांत क्षणी एका खोडसाळ पोराला गंमत करायची लहर येते; आणि तो ओरडतो, 'लांडगा आला रे, आला...' अचानक सावध होत सगळी पोरं मेंढरांच्या दिशेने धावतात. कुरणात चरणाऱ्या शेळ्या-मेंढ्यांभोवती संरक्षक कडे तयार करतात. काहीही करून आपल्या मेढरांना लांडग्याच्या कळपाची शिकार होऊ द्यायचे नाही यासाठी जिवाची बाजी लावून उभे राहतात. आवई उठविणारं ते खोडसाळ पोरगं मात्र बाजूच्या झाडावर बसून फांदीवरून फजिती झालेल्यांची गमत बघत फिदीफिदी हसत असतं. एकदा फसगत झाल्यावर ओशाळलेली मेंढपाळांची पोरं पुन्हा खेळात रमतात. आता त्यांना या खोडसाळ पोराची जिरवायची असते. पुढच्या एका दिवशी अशाच एका गाफिल क्षणी, ते पोरगं पुन्हा तीच मस्करी करतं, तेव्हा कुणीच त्याकडे लक्ष देत नाही. नंतर एका दिवशी पुन्हा तसेच घडते आणि खोडसाळ पोराचीच फजिती झाल्याच्या आनंदात आता बाकीची पोरं फिदीफिदी हसू लागतात. आता तो ओरडला तरी त्याकडे कुणीच लक्ष देणार नाही हे नक्की झालेलं असताना, एका दिवशी खरेच लांडग्यांची टोळी मेंढरांच्या कळपाच्या दिशेने येताना त्या खोडसाळ पोराला दिसते. तो जिवाच्या आकांताने ओरडतो, 'लांडगा आला रे आला...' पण यावेळी त्याच्याकडे कुणीच लक्ष देत नाही. सारेजण निर्धास्तपणे गप्पा मारत बसून राहतात आणि इकडे एक एक मेंढराची शिकार करत लांडगे निघून जातात.

सातत्याने उठणारी एखादी आवई किंवा सतत दिला जाणारा एखादा इशारा खरा ठरत नाही, असे लक्षात येऊन त्याबाबत बेफिकीर राहणाऱ्या समाजाला सतत सावध राहण्याचा संदेश देणाऱ्या या लोककथेपासून समाजाने बोध घेतला असता, तर अनेक संकटे टाळता आली असती, असे म्हणतात. पण एखादे संकट येणार एवढे सांगितल्यावरही पुरेशी सावधगिरी न बाळगल्याने त्याचे फटके सोसावे लागतात आणि शहाणे न झाल्याचा पश्चात्ताप व्यक्त करण्याची वेळ माणसावर येते. लांडगा येणार या आवईकडे दुर्लक्ष केल्यानंतर जेव्हा खरेच लांडगे हल्ला करतात, तेव्हाच्या बेफिकिरीशी ही सवय मिळतीजुळती असल्यामुळेच, गंभीर इशाऱ्यांची वेळीच दखल घ्यावयास हवी किंवा केवळ बेफिकिरीने त्याकडे दुर्लक्ष न करता गंभीरपणाने त्याकडे पाहावयास हवे. कोणताही इशारा वाऱ्यावर सोडू नये, ही बाब आता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. गेल्या काही दशकांतील संकटांचे इशारे आणि त्याबाबत माणसाच्या प्रतिक्रिया पाहता, 'लांडगा येणार' या आवईकडे सातत्याने होणाऱ्या दुर्लक्षानंतर खरोखरीच लांडग्यांचा हल्ला झाल्यावर जे काही होते, तशी वेळ येणार हे ध्यानात ठेवण्याची गरजही आता तीव्र होऊ लागली आहे. म्हणूनच, राजधानी दिल्लीतील शाळांमध्ये बॉम्ब ठेवल्याची अफवा पसरविणाऱ्या इशाऱ्यांकडे डोळेझाक करून चालणार नाही.

दिल्लीतील किमान सहा शाळांमध्ये बॉम्ब ठेवल्याची धमकी देणारे ई-मेल एकाच दिवशी मिळाले आणि सावधगिरीच्या उपाययोजना अमलात आणण्यासाठी यंत्रणांची अक्षरशः धावपळ सुरू झाली. तपासणीनंतर या धमक्या म्हणजे निव्वळ अफवा असल्याचे निष्पन्न झाले. गेल्या दोन वर्षांत अशा धमक्या देणारे शेकडो ई-मेल वेगवेगळ्या ठिकाणी गेले, पण त्यामागील व्यक्तींचा शोध घेण्यात तपास यंत्रणांना आलेले यश तसे मर्यादितच होते. जानेवारी २०२५ मध्ये एका अल्पवयीन विद्यार्थ्यावर अनेक धमकीच्या ई-मेल प्रकरणांतील संशयित म्हणून बोटे रोखली गेली होती. अशा धमक्या म्हणजे केवळ अफवा असतात, हे लक्षात आल्यावर पुन्हा सारे काही सुरळीत होते. शाळेच्या आवारात बॉम्ब ठेवल्याचा ई-मेल येतो. विद्यार्थ्यांना तातडीने सुरक्षित ठिकाणी हलवले जाते, पालकांची घबराट उडते, पोलिसांचे पथक दाखल होते, बॉम्बशोधक व नाशक पथक परिसराची तपासणी करते. काही तासांच्या तणावानंतर संशयास्पद काहीच आढळत नाही. धमकी खोटी ठरते आणि सगळे सुटकेचा निःश्वास टाकतात. शाळा पुन्हा सुरू होते. पालक मुलांना नेहमीप्रमाणे शाळेत पाठवू लागतात. काही दिवसांनी पुन्हा तीच घटना घडते. अशा धमक्या सातत्याने मिळू लागल्या आणि त्या निव्वळ अफवा असल्याचे स्पष्ट होऊ लागले की, समाजाच्या मनात नेमका तोच प्रश्न तयार होऊ लागतो. प्रत्येक धमकीला एवढे गांभीर्याने किती दिवस घेत राहायचे, अशी मानसिकता तयार होऊ लागते. त्यातून निर्माण होणाऱ्या बेफिकिरीमागे संकटाचा गंभीर धोका दबा धरून बसतो. कारण वारंवार खोट्या ठरणाऱ्या धमक्या आणि प्रत्यक्ष हल्ल्याची शक्यता यांच्यातील फरक ओळखण्याची क्षमता कमी होणे, ही सुरक्षा व्यवस्थेसमोरील मोठी गुन्हेगारी समस्या आहे. त्यामुळेच, दिल्लीतील शाळांना मिळणाऱ्या बॉम्बच्या धमक्यांच्या वाढत्या घटनांकडे केवळ खोडसाळपणा, अफवा किंवा कायदा-सुव्यवस्थेचा किरकोळ प्रश्न म्हणून पाहता येणार नाही. या घटनांमागे भीती निर्माण करणे, प्रशासकीय यंत्रणेची क्षमता खर्ची घालणे, सार्वजनिक संस्थांवरील विश्वास डळमळीत करणे आणि कधी कधी प्रत्यक्ष हल्ल्यासाठी अनुकूल मानसिक परिस्थिती निर्माण करणे अशा वेगवेगळ्या शक्यता असू शकतात, याकडे डोळेझाक करता येणार नाही. वारंवार खोट्या धमक्या दिल्या गेल्यामुळे पुढील खऱ्या हल्ल्यासाठी लोकांची दक्षता कमी होऊ शकते, ही एक रास्त चिंता आहे; मात्र प्रत्येक धमकीमागे प्रत्यक्ष स्फोट घडवण्याचा कट असतो किंवा खोट्या धमक्या देणारे गुन्हेगार जाणीवपूर्वक समाजात दुर्लक्षाची मानसिकता तयार करत असतात असेही नाही. तरीही, प्रत्यक्ष स्फोटके सापडले नाहीत म्हणून त्या घटनेचे गांभीर्य संपत नाही. कारण, धमकी देणारी व्यक्ती प्रत्यक्ष बॉम्ब न ठेवताही मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक यंत्रणा कामाला लावू शकते, शाळांचे कामकाज विस्कळीत करू शकते आणि हजारो कुटुंबांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण करू शकते.

डिसेंबर २०२४ मध्ये दिल्लीतील किमान ४० शाळांना धमकीचे ई-मेल पाठवून शिवाय पैशांची मागणीही करण्यात आली होती. त्या वेळीदेखील शाळांची काटेकोर तपासणी, मुलांना घरी नेण्यासाठी भयभीत पालकांची तारांबळ आणि सुरक्षा यंत्रणांची प्रचंड धावपळ झाली होती. वारंवार घडणाऱ्या अशा घटनांमुळे काही महत्त्वाचे प्रश्न अधोरेखित होतात. अशा धमकी देताना, खोडसाळपणा, वैयक्तिक सूड, खंडणी, प्रसिद्धी, परीक्षा टाळणे की व्यापक दहशत निर्माण करणे यापैकी नेमका कोणता हेतू असू शकतो. वारंवार दिल्या जाणाऱ्या अशा धमक्यांमुळे पोलिस, शाळा आणि पालकांच्या निर्णयक्षमतेवर काय परिणाम होतो किंवा एखादी धमकी प्रत्यक्ष धोक्याची असण्याची शक्यता असताना, आधीच्या खोट्या धमक्यांमुळे सुरक्षा यंत्रणा किंवा नागरिक कमी सावध होण्याचा धोका कसा टाळायचा, या प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतात. वारंवार खोट्या धमक्या मिळाल्यानंतर निर्माण होणाऱ्या मानसिक थकव्याला जगभरातील शाळांच्या सुरक्षा उपाययोजनांबाबतच्या अभ्यासात वेगळे महत्त्व दिले गेले आहे. मेंढपाळाच्या खोडसाळ मुलाच्या त्या गोष्टीप्रमाणे, वारंवार खोटा इशारा दिल्यानंतर खरा धोका समोर आला तरी लोक त्याकडे दुर्लक्ष करू शकतात आणि इशाऱ्याबाबतची संवेदना कमी होणे हीच बाब सुरक्षा व्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते.

अमेरिकेतील कोलोरॅडो राज्यातील कोलंबाईन हायस्कूलमध्ये १९९९ मधील एका दिवशी दोन विद्यार्थ्यांनी बेधुंद हल्ला केला. त्यामध्ये १३ जणांचा मृत्यू झाला; त्यानंतर दोन्ही हल्लेखोरांनी आत्महत्या केली. त्या हल्ल्यानंतर अमेरिकेतील शाळांना हिंसाचाराच्या धमक्या देण्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाल्याचे दिसून आले. त्या हल्ल्यानंतर पुढच्या ५० दिवसांत पेनसिल्व्हेनियातील शाळांमध्ये हिंसाचाराच्या ३५४ धमक्या नोंदविल्या गेल्या होत्या. म्हणजे, अशा प्रकारे घडणाऱ्या एखाद्या मोठ्या हिंसक घटनेनंतर त्याचीच पुनरावृत्ती करणाऱ्या घटना वाढू शकतात, असा निष्कर्ष त्या वेळी काढला गेला होता. अमेरिकेतील ११ सप्टेंबरच्या दहशतवादी हल्ल्यांनंतर विमानतळ, उंच इमारती, शाळा आणि महत्त्वाच्या सार्वजनिक ठिकाणी बॉम्बच्या धमक्या देण्याच्या अफवांचे तर पीक आले होते. एकट्या न्यू यॉर्क शहरातच तशा धमकीचे शेकडो दूरध्वनी आल्याने सुरक्षा यंत्रणांची तारांबळ उडाली होती. एखाद्या वास्तविक दहशतवादी घटनेनंतर समाजात आधीच भीती निर्माण झालेली असते. अशा वेळी खोटी धमकी देणाऱ्या व्यक्तीला प्रत्यक्ष हिंसाचार न करताही अधिक परिणाम घडवून आणता येतो. पोलिसांची धावपळ, वाहतूक किंवा संस्थांचे कामकाज विस्कळीत होणे, माध्यमांमध्ये प्रसिद्धी आणि लोकांमध्ये घबराट हेच अशा गुन्हेगारीचे उद्दिष्ट असू शकते, तरीही त्याकडे दुर्लक्ष करता येत नाही. म्हणूनच, दिल्लीतील घटनांच्या विश्लेषणातही हीच बाब महत्त्वाची आहे. दोन-तीन दिवसांपूर्वी दिल्लीतील शाळांना मिळालेल्या धमकीआधी, एप्रिल २०२४ मध्ये दिल्लीतील २५० हून अधिक शाळांना धमक्या देणारे ई-मेल पाठविले गेले होते आणि त्यामागे कोणा परदेशी व्यक्तीचा हात असल्याचा सुगावा सुरक्षा यंत्रणांना लागला होता. मात्र, या व्यक्तीचा माग काढण्यात फारसे यश आले नव्हते. जून २०२५ मध्ये गुजरात पोलिसांनी ११ राज्यांतील २१ हून अधिक बॉम्ब धमक्यांशी संबंधित एका संशयित महिलेला अटक केली होती.

बॉम्बची खोटी धमकी किंवा अफवा पसरविण्याच्या अशा घटना प्रत्यक्षात न आल्यामुळे निरुपद्रवी ठरत नाहीत. कारण अशा घटनांमुळे सार्वजनिक यंत्रणेचा वेळ वाया जातो, शैक्षणिक नुकसान होते, पालकांचे आर्थिक नुकसान होऊ शकते आणि विद्यार्थ्यांच्या मनात दीर्घकाळ भीती राहू शकते. त्यामुळे अशा घटनांना आळा घालण्यासाठी केवळ अटक आणि शिक्षा पुरेशी नाही. गुन्हा करण्यास सोपे वाटणारे वातावरण बदलणे, तपासातील तांत्रिक अडचणी कमी करणे आणि धमकीमुळे अपेक्षित होणारी प्रसिद्धी किंवा व्यत्यय मर्यादित ठेवणे हेही आवश्यक आहे. दिल्लीतील धमक्यांच्या इशाऱ्यानंतर धमकी देणाऱ्यांचा शोध, डिजिटल पुराव्यांचे विश्लेषण, विविध घटनांमधील संबंध शोधणे आणि शाळांमध्ये विश्वासार्ह सुरक्षा व्यवस्था निर्माण करणे आदींबाबत मोठे आव्हान उभे राहिले आहे. कारण शाळा ही भीतीचे केंद्र बनता कामा नये. मुलांनी शाळेत जाताना बॉम्बची भीती बाळगू नये आणि पालकांचा प्रत्येक दिवस अनिश्चिततेच्या भीतीखाली संपू नये. त्यासाठी केवळ अधिक पोलिस किंवा अधिक तपासण्या पुरेशा नाहीत. गुन्हेगाराला ओळखण्याची क्षमता, तातडीने योग्य निर्णय घेणारी यंत्रणा आणि नागरिकांचा विश्वास या तीन बाबींची खरी गरज आहे. ■

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### दुष्काळाचे आव्हान स्वीकारा

राज्य सरकारने २६ सप्टेंबर रोजी राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित केला. या पृष्ठभूमीवर पाण्याचे योग्य नियोजन, शेतकऱ्यांना आधार आणि पशुधनाचे संरक्षण या बाबींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. दुष्काळाचा परिणाम पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवर जाणवू शकतो. विहिरी, बोअरवेल, तलाव आणि इतर स्थानिक जलस्रोतांमधील पाण्याची पातळी कमी झाल्यास काही गावांमध्ये पाणीपुरवठ्याचे नियोजन अधिक कठीण होते. नागरिकांना पाण्याचा वापर मर्यादित करावा लागतो, तर काही ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची गरज निर्माण होते. पावसाच्या अनिश्चिततेचा थेट परिणाम शेतीवर होतो. पिकांना आवश्यक वेळी पाणी न मिळाल्यास त्यांची वाढ खुंटू शकते, उत्पादन घटू शकते. अशा वेळी पीक नुकसानाचे वेळेवर पंचनामे, पात्र शेतकऱ्यांना शासकीय मदत, पीकविमा योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि आवश्यक कृषी मार्गदर्शन यांना महत्त्व आहे. शेतकऱ्यांपर्यंत योजनांची माहिती पोहोचवणे आणि त्यांना योग्य वेळी मदत मिळवून देणे ही सामूहिक जबाबदारी आहे.

अनेकदा कमी चर्चिला जाणारा पैलू म्हणजे जनावरांसाठी निर्माण होणारी चारा आणि पाण्याची टंचाई. पावसाअभावी गवताची वाढ कमी होते. चारा पिकांचे उत्पादन घटू शकते आणि शेतातील कडबा, भुसा यांसारख्या चाऱ्याची उपलब्धताही मर्यादित होऊ शकते. अशा परिस्थितीत गायी, म्हशी, शेळ्या आणि मेंढ्यांना पुरेसा चारा व स्वच्छ पाणी उपलब्ध करून देणे पशुपालकांसाठी मोठे आव्हान ठरते. पशुधन हे अनेक कुटुंबांसाठी उत्पन्नाचे साधन आणि आर्थिक सुरक्षिततेचा आधार असल्याने त्याचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी गावपातळीवर चारा नियोजन, चारा साठवणूक, मुरघास निर्मिती आणि चारा पिकांच्या नियोजनाला प्रोत्साहन द्यावे. गरजेनुसार चारा छावण्या, पशुवैद्यकीय सेवा आणि जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था उपलब्ध करून देण्यावर भर द्यावा. शासन, ग्रामपंचायती, सहकारी संस्था आणि पशुपालक यांनी समन्वयाने काम केल्यास या संकटाची तीव्रता कमी करण्यास मदत होऊ शकते. तसेच बदलते हवामान, वाढती उष्णता आणि अनियमित पर्जन्यमान यांमुळे जलव्यवस्थापनाचे आव्हान अधिक गुंतागुंतीचे होत आहे. तापमान वाढल्याने बाष्पीभवन वाढू शकते आणि जमिनीतील ओलावा कमी होऊ शकतो. याचा परिणाम पिके, वृक्षसंपदा आणि नैसर्गिक जलस्रोतांवर होतो. त्यामुळे जलस्रोतांचे संवर्धन, वृक्षांचे संगोपन आणि स्थानिक पर्यावरणाचे संरक्षण या गोष्टींकडे दीर्घकालीन दृष्टिकोनातून पाहणे गरजेचे आहे.

दुष्काळावर मात करण्याची सुरुवात प्रत्येक घरापासून करावी. त्यासाठी नळ उघडा ठेवू नये आणि पाण्याची गळती त्वरित दुरुस्त करावी. दात घासताना, आंघोळ करताना आणि भांडी धुताना आवश्यक तेवढेच पाणी वापरावे. गाड्या धुण्यासाठी पिण्याच्या पाण्याचा अनावश्यक वापर टाळावा. पावसाचे पाणी साठवण्यासाठी घरांमध्ये आणि सोसायट्यांमध्ये व्यवस्था करावी. प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा योग्य पद्धतीने पुनर्वापर करावा. पिण्याचे पाणी स्वच्छ भांड्यात साठवून त्याचा अपव्यय टाळावा.

उष्णतेच्या काळात स्वतःची, ज्येष्ठ नागरिकांची, लहान मुलांची आणि बाहेर काम करणाऱ्या कामगारांची काळजी घ्यावी. पशुपक्ष्यांसाठी शक्य असेल तेथे स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी. पाणी बचत ही केवळ दुष्काळाच्या काळापुरती मर्यादित न राहता आपल्या जीवनशैलीचा कायमस्वरूपी भाग बनली पाहिजे.

**जयदीप सुधीर हिरवे**/पुणे । ९०९६२७६४८३

■■■

### देशविरोधी घटकांना कायद्याचा हिसका दाखविलाच पाहिजे

गेल्या काही महिन्यांपासून राहुल गांधी, अरविंद केजरीवाल, अभिजित दीपके, वामपंथी, काही स्वयंघोषित बुद्धिजीवी आणि ल्युटियन्स मीडियाने भारताची राजधानी असलेले दिल्ली शहर वेठीस धरले आहे. प्रशांत भूषण, योगेंद्र यादव, अभिजित दीपके, अरविंद केजरीवाल आणि राहुल गांधींनी देशात अराजकता, हिंसाचार करून सत्तापरिवर्तन करण्याची जाहीर धमकी दिली आहे. काही स्वयंघोषित निष्पक्ष मराठी वर्तमानपत्रे (तरुण भारत नाही) अशा देशविरोधी वक्तव्यांचे उघडपणे, आश्चर्यकारक समर्थन करीत आहेत. सर्वोच्च न्यायालयात मोर्चा नेऊन राहुल गांधींनी आपल्या राजकीय अपरिपक्वतेचे आणि बुद्धीच्या दिवाळखोरीचे जाहीर प्रदर्शन केले आहे.

भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होण्याच्या उंबरठ्यावर उभा असताना देशात अराजकता माजवून भारतीय प्रगती रोखण्यासाठी काही नतद्रष्ट विरोधी पक्ष आटोकाट प्रयत्न करीत आहेत. भारत स्वयंपूर्ण होणे काही पाश्चात्त्य देशांना सहन होणार नाही. अशा देशांचे समर्थन करून विरोध पक्ष भारताला कमजोर करण्यासाठी हिंसक आंदोलने करीत आहेत. सॅम पित्रोदा, एलॉन मस्क, डोनाल्ड ट्रम्प जाहीरपणे भारतीय लोकशाहीचा अपमान करत आहेत. भारत सर्वच क्षेत्रात आश्चर्यकारक प्रगती करत असल्याने पाश्चात्त्य देशात अस्वस्थता आहे. विद्यार्थी आंदोलनाच्या नावाखाली आंदोलने करणारा कॉक्रोच जनता पक्ष आता मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्यासाठी आंदोलने करत आहे. अशा परिस्थितीत केंद्र सरकारने कठोर कारवाई करून हिंसाचार करण्याच्या जाहीर धमक्या देणाऱ्यांवर देशद्रोही असल्याचा ठपका ठेवून त्यांना तुरुंगात डांबले पाहिजे. एकीकडे भारत चौफेर प्रगती करत असताना आणि नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली आत्मनिर्भर होत असतांना अशी आंदोलने भारताला परवडणारी नाहीत. वास्तविक अभिजित दीपके आणि त्यांच्या पक्षाला आंदोलनासाठी पैसा कोण पुरवत आहे याचा धांडोळा घेतला पाहिजे. विमानाच्या बिझिनेस क्लासमधून प्रवास, पंचतारांकित हॉटेलमधील वास्तव्य, आलिशान गाड्यांचा ताफा यासाठी पैसा येतो कुठून हे शोधण्याची जबाबदारी सरकारची आहे. केंद्र सरकारने देशविरोधी घटकांना हिंसक आंदोलन करण्यासाठी देशात मोकळे रान न देता, देशवासीयांना धमक्या देणाऱ्यांना कायद्याचा हिसका दाखविलाच पाहिजे. त्याशिवाय हे अर्बन नक्षलवादी ताळ्यावर येणार नाहीत.

**शिवराम वैद्य**/पुणे । ९८५०५१८०१८

■■■

### शेतकऱ्यांची दिवाळी गोड करा

दसरा तोंडावर अन् दिवाळी जवळ आली, तरी शेतकऱ्यांच्या घरात चिंतेचा अंधार कायम आहे. अतिवृष्टीने पिकांचे नुकसान झाले. शेतातील उभे पीक उद्ध्वस्त झाले आणि शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले. अशा परिस्थितीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिवाळीपूर्वी मदतीबाबत केलेल्या घोषणांकडे शेतकरी आशेने पाहत आहेत. आता प्रश्न एकच आहे, घोषणा झाली, पुढे काय? शेतकऱ्यांच्या खात्यात मदत जमा कधी होणार? शेतकऱ्याला



भाषणातील आश्वासनांवर दिवाळी साजरी करता येत नाही. त्याला खतांची उधारी फेडायची आहे, मजुरांचे पैसे द्यायचे आहेत, मुलांना कपडे घ्यायचे आहेत आणि घरात दिवाळीचा किराणा भरायचा आहे. हातात पैसा नसेल तर सणांचा आनंद तरी कसा साजरा करायचा? सरकारने मदतीची घोषणा केली असेल तर ती वेळेत देण्याची जबाबदारीही सरकारने पार पाडली पाहिजे. शेतकऱ्यांना आश्वासनांचे गोडधोड नको, त्यांच्या खात्यात मदतीचा पैसा हवा. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे वेळेत पूर्ण झाले पाहिजेत. पात्र शेतकऱ्यांना मदत मिळाली पाहिजे आणि प्रशासकीय दिरंगाईमुळे कोणताही शेतकरी वंचित राहता कामा नये. पाच हजार रुपयांची मदत मिळाली तरी मोठ्या नुकसानीची भरपाई होणार नाही, हेही सरकारने लक्षात घेतले पाहिजे. शेतीचा वाढता खर्च, कर्जाचा बोजा आणि बाजारभावाची अनिश्चितता यामुळे शेतकरी आधीच अडचणीत आहे. त्यामुळे मदतीची रक्कम आणि तिच्या वाटपाबाबत सरकारने स्पष्टता ठेवणे गरजेचे आहे. सणासुदीच्या काळात नेत्यांच्या घरात दिवे लागतील, बाजारपेठा उजळतील; पण शेतकऱ्याच्या घरात चूल पेटवण्यासाठी पैशांची चणचण असेल, तर विकासाच्या घोषणांचा उपयोग काय? शेतकऱ्यांच्या वेदना समजून घेण्यासाठी भाषण नको तर जमिनीवर उतरलेली कृती हवी! सरकारने दिलेला शब्द पाळावा, मदत वेळेत पोहोचवावी आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना न्याय द्यावा. कारण शेतकऱ्यांची दिवाळी गोड करणे ही केवळ घोषणा करण्याची बाब नाही, तर ती सरकारच्या जबाबदारीची कसोटी आहे. शेतकऱ्यांची दिवाळी गोड करा; घोषणांचे फटाके फोडून त्यांच्या आशांशी खेळू नका!

**सचिन नागरे**/९६०४३२१४३२

■■■

### शक्तीची पूजा

नवरात्र हे शक्तिदेवतेचे रूप आहे. घरचं रूप कितीही सजलेलं असलं तरी त्याचं अंतरंग हे स्त्री शक्तीतूनच खुलत असतं. कारण घरच्या केंद्रस्थानी स्त्री ही अनेक शक्तिरुपाची दर्शनं नित्य घडवित असते. ती घरात महत्त्वाची भूमिका निभावत असते. आज घराघरात एकाच वेळी अनेक आघाड्यांवर ती कार्यरत असते. एकीकडे स्वयंपाक करता करता फोन घेणे, कामवाल्या बाईंची चौकशी करणे, आल्यागेल्याचे चहापाणी करणे, किराणा, दळण, नवीन प्रोडक्ट काय आले याची चौकशी करणे, नवीन गॅजेट्सशी हातमिळवणी करणे, एखादा महत्त्वाचा ई-मेल पाठवणे एकाच वेळी करू शकते, जणू अष्टभुजाच होऊन वावरत असते. कधी मुलांना चांगल्या सवयी लागाव्या म्हणून दुर्गावती होते, कधी अभ्यास घेताना सरस्वती होते. घरातल्या सगळ्यांवर प्रेम करून संतुष्ट करणारे संतोषी माता होते. अशा प्रकारे सर्वत्र चैतन्य पसरवते. ज्यांच्याकडे नवरात्र बसते म्हणजेच घट बसविले जातात, त्यांच्याकडे लगबग सुरू होते; ती थेट नवमीला पारणे झाल्यावर पूर्ण होते. रोजची माळ, पूजा, उपासना, नैवेद्य, दोन वेळेला आरती, भजन, कुमारिका पूजन इत्यादींची मनातल्या मनात मांडणी सुरू होते. सगळं निर्विघ्नपणे पार पडू दे म्हणून मनोमन प्रार्थना गृहिणी करत असते. कुणी भजनी मंडळात जातात तिथे नऊ दिवसांचे नऊ वार कुणाकुणाकडे भजन ठरले असते. तिथे जायचे म्हणजे घरच्यांची पोटोबाची व्यवस्था याचे नियोजन तिला करावे लागते. रोज वेगवेगळ्या घरी गेल्यामुळे त्या भागाचे दर्शन, जाण्यायेण्याचा काळ, मैत्रिणींसोबत होत असलेले हास्यविनोद याने मन आनंदी राहते. इतरांच्या वस्त्रांचा वेगवेगळ्या रंग मन मोहून घेते. सगळीकडे सकारात्मकता जाणवते. कुठे भजन, स्पर्धेत भाग घेते. शाळा, कॉलेज, ऑफिस आणि इतर कामाच्या ठिकाणीही महिला रंगांचे दिवस पाळतात त्यामुळे वातावरण रंगीबेरंगी होते. या दिवसात कुमारिकांचे पूजन केले जाते. त्यांचा थाट काही औरच असतो. एकाच दिवशी दोन-तीन घरी जावे लागते. भेटवस्तूंची रेलचेल असते. कुमारिका मोहक दिसतात. अष्टमीला घागरी फुंकून महालक्ष्मीची आराधना करतात. आजही स्त्री सगळ्या शक्तिदेवतेच्या उत्सवात सहभागी होत असते तेही घराचे घरपण सांभाळून. या उत्सवात नतमस्तक होत असताना तिला दहा हत्तींचं बळ प्राप्त होतं तोच शक्तिदेवतेचा प्रसाद असावा.

दसऱ्याला नवीन वस्तूंची खरेदी केली जाते. नव्या-जुन्या वाहनांची पूजा, निर्जीव शस्त्रांची पूजा या दिवशी केली जाते. सजीव निर्जीवात देवत्व शोधणाऱ्या आपल्या संस्कृतीचं विलोभनीय दर्शन दिसू लागतं. अशा घरातल्या आणि आसपास वावरणाऱ्या अनेक शक्तींचं दर्शन या दिवसात होत असतं. पुढे येणाऱ्या आसणी, दिवाळीसाठीही ती सज्ज असते. या अखंड चैतन्याचा स्रोत तिच्यात असतो. तो असाच वाहत राहो.

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

■■■

### नवरात्रीच्या खरेदीवर आंदोलनाचे सावट

नवरात्रीपासून देशभरात सणासुदीची आणि खरेदीची धूम सुरू होते. व्यापारी वर्ग याच काळात होणाऱ्या खरेदीवर अवलंबून असतो. मात्र, याच मोसमात कॉक्रोच जनता पार्टी आणि राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील विरोधकांकडून दिल्लीतील जंतर-मंतरसह इतर ठिकाणी सुरू असलेल्या आंदोलनांमुळे बाजारपेठांवर आणि व्यापाऱ्यांवर विपरीत परिणाम होत आहे. पितृपक्षात ग्राहक सहसा नवीन वस्तूंची खरेदी किंवा शुभकार्यांची सुरुवात करत नाहीत. त्यामुळे नवरात्रीची सुरुवात होताच कापड, दागिने, इलेक्ट्रॉनिक्स, गाड्या आणि गृहोपयोगी वस्तूंच्या बाजारपेठेत तेजी येते. परंतु, एस.आर.आय. व इतर राजकीय मुद्यांवरून रस्ते अडवणे, पोलिसांचे बॅरिकेट्स आणि सुरक्षा व्यवस्थेमुळे वाहतूक ठप्प होणे यामुळे ग्राहकांना बाजारात पोहोचणे कठीण होत आहे. दिल्लीसह इतर अनेक भागांतील मुख्य बाजारपेठांमधील ग्राहकसंख्या घटल्याची तक्रार स्थानिक व्यापारी संघटना करीत आहेत.

'आम्ही महिनाभर सणासुदीची वाट पाहतो. सण सुरू होताच राजकीय पक्षांच्या आंदोलनांमुळे बाजार बंद ठेवावे लागणे किंवा ग्राहकांनी पाठ फिरवणे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. राजकीय पक्षांनी आपल्या मागण्या मांडताना लहान-मोठ्या दुकानदारांच्या आणि व्यापाऱ्यांच्या उपजीविकेचा विचार करायला हवा' अशी भावना स्थानिक दुकानदारांकडून व्यक्त केली जात आहे.लोकशाहीत आंदोलन करण्याचा अधिकार असला, तरी सणासुदीच्या या अत्यंत महत्त्वाच्या काळात होणाऱ्या आंदोलनांमुळे सामान्य जनतेला आणि व्यापारी वर्गाला मोठा आर्थिक फटका बसत आहे. त्यामुळे राजकीय आंदोलनांचे नियोजन करताना व्यापाऱ्यांचे नुकसान होणार नाही याची काळजी घेण्याची मागणी जोर धरत आहे. ■

**अविनाश देशपांडे**/पुणे

## नवेगाव येथील पुरातन श्री गंगादेवी मंदिर



नवरात्रोत्सवाची सुरुवात होण्यापूर्वी म्हणजे १९ सप्टेंबर रोजी नागपूर जिल्ह्यातील नवेगाव ता. कुही याठिकाणी जाण्याचा योग आला. याठिकाणी एक अतिशय पुरातन देवीचे मंदिर आहे. नागपूरपासून ६० कि.मी. अंतरावर नागपूर-आंभोरा मार्गावरील मांढळपासून अंदाजे ३ किमी आत हे मंदिर आहे. मंदिर परिसरात पोहोचताच भव्य सभामंडप दृष्टिपथात येतो. त्याच्या बाजूलाच एक आकर्षक देवीची मूर्ती आहे. या देवीचे नाव आहे श्री गंगादेवी. काळ्या पाषाणाची अष्टभुजा महिषासुरमर्दिनी आहे. अतिशय रमणीय परिसर लाभलेले हे मंदिर सुमारे ७०० वर्षांपेक्षा जास्त जुने आहे. विदर्भातील वाकाटककालीन इतिहास पुस्तकात या मंदिराचा उल्लेख आहे. नवेगावपासून २ किमी अंतरावर अडम या गावात पुरातत्त्व विभाग खोदकाम करीत असताना सुमारे १७०० वर्षे पुरातन नगर आढळले, ज्या खोदकामात घरे, नाल्या, रस्ते आढळून आले. इतिहास तज्ज्ञांच्या मते, या गावचा ग्रीस देशांसोबत बांगड्याचा व्यापार होत होता. मंदिरातील देवीच्या दर्शनासाठी नागपूरचे भोसले राजे येत, असाही उल्लेख आहे. गावातील एका भक्ताला या देवीची मूर्ती जवळच्या नदीत आढळली. ३ फूट उंच मूर्तीला बाहेर काढायला १२ बैलजोड्यांची गाडी लावावी लागली, असे म्हणतात. मूर्ती बाहेर काढल्यानंतर ही बैलगाडी ज्या ठिकाणी थांबली, त्याच ठिकाणी या गंगादेवीचे मंदिर तयार झाले आहे. मूर्ती नदीत सापडल्याने या देवीला गंगादेवी म्हणतात.

नवरात्रोत्सवात येथे मोठी यात्रा भरते. मंदिर परिसरात ग्रामदेवतेचे तसेच भैरवनाथाचे मंदिर असून गणपती, विठ्ठल रखुमाई, शंकराचे पंचायतन, हनुमान यांच्या गारीच्या बनवलेल्या मूर्ती आहेत. परिसरात हजार वर्षे जुने वडाचे झाड असून झाडांची मुळं गावापर्यंत पसरली आहेत. नागपूर येथील कृष्णा कढव यांनी १९९५ मध्ये मित्र परिवाराच्या सहकार्याने मंदिराचा जीर्णोद्धार केला. देवस्थानाच्या माध्यमातून फक्त धार्मिक कार्यक्रमांसोबतच सामाजिक उपक्रमही राबविले जातात. त्यात बाल संस्कार शिबिर, शेतकऱ्यांसाठी उद्‌बोधन शिबिर, रक्तदान शिबिर आदींचा समावेश आहे. ■

**रवींद्र गोविंद पांडे**/९३२५४५७०५२

## श्री नवरात्र उत्सव

**दीपक गो. देशमुख**

# कन्या पूजन



प्रचलित कथेनुसार, बाणासुर नावाचा राक्षस भगवान शिवाचा परमभक्त होता. त्याने भगवान शिवांची कठोर तपश्चर्या केल्यानंतर प्रसन्न झालेल्या भगवान शंकरांनी त्याला वर मागण्यास सांगितले. त्यावर बाणासुराने आपला मृत्यू नैसर्गिकरीत्या न होता एखाद्या कुमारिकेच्या हातून व्हावा, अशी मागणी केली. भगवान शंकरांकडून वरदान मिळाल्यानंतर बाणासुर अधिक आक्रमक बनला आणि त्याचे अत्याचार वाढू लागले. त्रिभुवन त्याच्या अन्यायाने त्रस्त झाले. बाणासुराच्या अत्याचाराला प्रतिबंध करण्यासाठी सर्व देवतांनी माता पार्वतीची आराधना करून त्याचा संहार करण्याची विनंती केली. त्यावरून मातेने कुमारिकेचा अवतार धारण करून बाणासुराचा वध केला. मातेचा हा अवतार कन्याकुमारी माता किंवा कन्यका परमेश्वरी म्हणून प्रसिद्ध आहे.

कन्याकुमारी येथील प्रसिद्ध मंदिर तामिळनाडू राज्यातील कन्याकुमारी जिल्ह्यात, बंगालचा उपसागर, अरबी समुद्र आणि हिंदी महासागर या तीन सागरांच्या त्रिवेणी संगमावर समुद्रातील एका बेटावर वसलेले आहे. भगवान परशुरामांनी आपल्या रेणुका मातेच्या स्मरणार्थ हे मंदिर समुद्राच्या मध्यभागी निर्माण केले, अशी आख्यायिका सांगितली जाते.

पुढे महाकालीचे परमभक्त आणि श्रीरामकृष्ण परमहंसांचे पट्टशिष्य स्वामी विवेकानंद यांनी या ठिकाणी अनुष्ठान करून आत्मचिंतन व साधना केली आणि मनःशांती प्राप्त केली, अशी श्रद्धा आहे. त्यांच्या स्मरणार्थ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते एकनाथजी रानडे यांच्या पुढाकाराने येथे स्वामी विवेकानंद शिला स्मारक उभारण्यात आले. कन्यका परमेश्वरी ही वैश्य समाजाची आराध्य देवता मानली जाते. आंध्र प्रदेशातील पेनुगोंडा या गावात तिचे प्रसिद्ध मंदिर आहे. माता कन्यका परमेश्वरीच्या प्रतीकात्मक पूजेसाठी नवरात्रीतील अष्टमीच्या दिवशी अनेक भक्तांकडून कुमारी पूजन केले जाते. लहान कुमारिकांमध्ये देवीचे स्वरूप पाहून त्यांचे पूजन केले जाते आणि त्यांच्यामध्ये आदिशक्तीचा अंश आहे, या श्रद्धेने हा धार्मिक विधी भक्तिभावाने संपन्न केला जातो.

कन्या पूजनाचा हा विधी स्त्रीशक्तीचा, पावित्र्याचा आणि आदिशक्तीच्या कुमारिका स्वरूपाचा सन्मान करणारा आहे. नवरात्रीच्या या पवित्र पर्वात कुमारिकेचे पूजन करून तिच्यात देवीचे दर्शन घेण्याची परंपरा भारतीय संस्कृतीतील स्त्रीशक्तीच्या पूजनाचे आणि सन्मानाचे प्रतीक मानली जाते. ■

उमरखेड । ९४०३६०८११५

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### माता रमाईच्या पुतळा स्थापनेचे काम अंतिम टप्प्यात; भीमसैनिकांच्या पाठपुराव्याला आले यश

**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

सोलापूर महानगरपालिकेच्या विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या पुतळा स्थापनेच्या कामाला गती मिळाली असून हे काम अंतिम टप्प्यात पोहोचले आहे. शनिवारी सकाळी आठ वाजता महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पुतळा स्थापनेच्या कामाला सुरुवात करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे , नगरसेवक गौतम कसबे, कामगार नेते अशोक जानराव, सर्पमित्र दीपक इंगळे, चंद्रकांत सोनवणे, सुमन लोंढे उपस्थित होते. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यागमूर्ती माता रमाई यांच्या विचारांचा व त्यागाचा वारसा जपणारे हे उद्यान सोलापूरच्या सामाजिक आणि ऐतिहासिक वैभवात महत्त्वाची भर घालणारे ठरणार आहे. दरम्यान, उद्यानातील उर्वरित विकासकामे अपूर्ण न ठेवता ती जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीसी) निधीतून तातडीने पूर्ण करावीत, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी केली.

### मराठा मंडळातर्फे उद्या दसरा महोत्सवाचे आयोजन

**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

मराठा समाज सेवा मंडळाच्यावतीने दसरा महोत्सव व वैचारिक सीमोल्लंघन अंतर्गत मराठा समाजातील नूतन नगरसेवकांचा सत्कार सोमवारी (दि.१९) रोजी सकाळी नऊ वाजता सरस्वती चौक परिसरातील छत्रपती शिवाजी प्रशालेच्या राजर्षी शाहू सभागृहात आयोजिला आहे. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते हा कार्यक्रम होणार असून, मंडळाचे अध्यक्ष मनोहर सपाटे हे अध्यक्षस्थानी असतील. याप्रसंगी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, आई शक्ती फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष मोहन डांगरे, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या उपकुलगुरू डॉ. स्मिता जाधव आणि मुख्याध्यापक महामंडळाचे माजी अध्यक्ष सुभाष माने यांची उपस्थिती राहणार आहे. यावेळी उपमहापौर ज्ञानेशवरी देवकर यांच्यासह अमोल शिंदे, जयकुमार माने, वृषाली चालुक्य, वैशाली भोपळे, श्रध्दा पवार,विनोद भोसले, अनंत जाधव, गणेश वानकर, मनीष केत, मनोरमा सपाटे, प्रियदर्शन साठे , कल्पना कदम, पूनम काशीद, आणि मृण्मयी गवळी या नूतन १५ नगरसेवकांचा सत्कार करण्यात येणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन मंडळाचे सरचिटणीस प्रा.महेश माने यांनी केले आहे.

# कर्जास कंटाळून शेतकऱ्याची झाडाला गळफास घेऊन आत्महत्या

### दक्षिण सोलापर तालुक्यातील इंगळगी येथील घटना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

कर्जास कंटाळून एका ५४ वर्षीय शेतकऱ्याने स्वतःच्या शेतातील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना आज शनिवारी सकाळी ९ वाजेच्या सुमारास उघडकीस आली.



नागनाथ अमोगसिद्ध राऊत (वय ५४ वर्ष, रा.इंगळगी ता.दक्षिण सोलापूर) असे मयताचे नाव आहे. शनिवारी सकाळी ९ वाजेच्या सुमारास त्यांच्या मृतदेह शेतातील चिंचेच्या झाडाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. त्यांना फासातून सोडवून गणपती (भाऊ) यांनी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

मयत नागनाथ राऊत यांच्या पश्चातत दोन मुले असा परिवार आहे. काही दिवसापूर्वी त्यांच्या पत्नीचे निधन झाले होते.शेती व्यवसायातील कर्जामुळे ते आर्थिक विवंचनेत होत्याची माहिती नातेवाईकानी दिली.

# ट्रक धडकेत जखमी पादचारी महिलेचा अखेर मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ ऑक्टोबर -**

ट्रकच्या धडकेत जखमी झालेल्या पादचारी महिलेचा वळसंग येथील राहत्या घरात शुक्रवारी सकाळी मृत्यू झाला. शिवम्मा सुतार (वय ५०, रा. वळसंग, दक्षिण सोलापूर) असे मयत महिलेचे नाव आहे. त्या तीन सप्टेंबर रोजी दुपारी सोलापुरातील गव्हर्नमट पॉलीटेक्निक कॉलेजजवळ रस्ता ओलांडताना जखमी झाल्या होत्या. त्यांना उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. त्यानंतर त्यांना ६ ऑक्टोबर रोजी डिस्चार्ज दिला होता. मात्र आज सकाळी घरात श्वास घेण्यास त्रास होऊ लागल्याने त्यांना मुलगी नागम्मा हिने उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

# विद्यापीठ विद्यार्थी परिषद निवडणुकांसाठी अभिप्राय जाणून घेतले जाताहेत

### १९ ऑक्टोबरपर्यंत ऑनलाईन स्वरुपात मते नोंदवण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर -**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदींनुसार विद्यार्थी परिषद निवडणुका मुक्त, निर्भय, शांततापूर्ण व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी राज्य शासनाने मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ.सुहास पेढेकर यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञ समितीची स्थापना केली आहे. या समितीच्या माध्यमातून महाविद्यालय व विद्यापीठातील सर्व घटकांचे अभिप्राय जाणून घेतले जात आहेत. यामध्ये विद्यापीठातील व महाविद्यालयांतील प्राचार्य, प्राध्यापक, संचालक, प्रशासकीय अधिकारी, शैक्षणिक संस्थांचे प्रमुख, व्यवस्थापन प्रतिनिधी, पालक आणि विद्यार्थ्यांकडून विविध मुद्द्यांवर मते व सूचना १९ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ४:०० वाजेपर्यंत विद्यार्थी विकास विभागाच्या dsw@sus.ac.in या ई-मेल आयडीवर पाठवावेत, असे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. महेश खरात यांनी कळविले आहे. प्राप्त सर्व अभिप्रायांचे संकलन करून ते पुढील कार्यवाहीसाठी तात्काळ शासनास सादर केले जाणार आहेत. **अभिप्राय नोंदवण्यासाठी आठ प्रमुख मुद्दे याप्रमाणे - निकोप वातावरण:** विद्यार्थी परिषद निवडणुका पूर्णतः निकोप वातावरणात पार पडण्यासाठीच्या सूचना.

**डिजिटल/ऑनलाईन प्रक्रिया:** निवडणूक प्रक्रिया सुलभ व गतिमान करण्यासाठी डिजिटल किंवा ऑनलाईन पद्धत वापरण्याबाबतची मते. **राजकीय हस्तक्षेप:** निवडणुकांमधील राजकीय हस्तक्षेप टाळण्यासाठीच्या उपाययोजना. **नामनिर्देशन:** विद्यार्थी परिषदेवर नामनिर्देशन करण्याबाबतच्या सूचना.

**प्रशासकीय सहभाग:** निवडणूक प्रक्रियेत शासन, प्रशासन व प्रशासकीय घटकांचा सहभाग कसा असावा, याबद्दलचे मत. विद्यार्थी विकास व कर्तव्ये: विद्यार्थी विकासासाठी परिषदेचा सहभाग वाढवणे आणि तिची कर्तव्ये व जबाबदाऱ्या ठरवणे. **राष्ट्रीय शैक्षणिक धोरण** (NEP २०२०): राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विद्यार्थी परिषदेचा सहभाग अधिक प्रभावी करणे. नियमांचे उल्लंघन टाळणे: निवडणूक नियमांचे उल्लंघन होऊ नये यासाठीच्या उपाययोजना.

# मेहता माध्यमिक शाळेत भोंडला उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

कै. विलासचंद्र मोतीचंद मेहता माध्यमिक शाळेत भोंडल्याचा पारंपरिक उत्सव अत्यंत उत्साहपूर्ण आणि आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. महाराष्ट्राच्या समृद्ध लोकसंस्कृतीचा वारसा जपणाऱ्या या उत्सवातून विद्यार्थिनींना पारंपरिक सण-उत्सवांचे महत्त्व अनुभवण्याची संधी मिळाली.

कार्यक्रमाची सुरुवात गजराजाच्या विधिवत पूजनाने झाली. त्यानंतर विद्यार्थिनींनी भोंडल्याचा फेर धरत पारंपरिक गीते सादर केली. यावेळी काही शिक्षिकांनीही सुरेल भोंडल्याची गाणी गाऊन कार्यक्रमात उत्साहाची भर घातली. पारंपरिक गीतांच्या स्वरांनी संपूर्ण प्रशालेत आनंदमय आणि सांस्कृतिक वातावरण निर्माण झाले. या कार्यक्रमास अशिवनी तडवळकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढली.



कार्यक्रमाच्या शेवटी गजराजाची आरती करण्यात आली. त्यानंतर सर्व मुलींना खिरापतीचे वाटप करण्यात आले. पूजन, पारंपरिक गीते, शिक्षिकांचा उत्स्फूर्त सहभाग आणि खिरापतीचा गोडवा यांमुळे भोंडल्याचा हा सोहळा आनंदात संपन्न झाला.

## सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकांना, डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी हद्दीतील सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब. डि. ता. बार्शी पैकी शहर बार्शी म्यु.पल हद्दीतील सि.स.नं. ४३०३/ब याचे क्षेत्रफळ १४९.७० चौ.मी. आहे यापैकी दक्षिण बाजूची निम्मी जागा तिचे क्षेत्रफळ २४.७२ चौ.मी. याचे चौ.फुट २६६ आहे. याचे मोजमाप ११×२४ फुट आहे यासी चतुःसिमा पुर्वेस - शहा यांची मिळकत, दक्षिणेस - सोमवार पेठ, पश्चिमेस- करळे यांची मिळकत, उत्तरेस- दत्तबोळ याचे पाणी व वागणूक उत्तर बाजूचे रस्त्याने जाते व आहे. देणेप्रमाणे चतुःसिमा पुर्वक मिळकत आतील सर्व बांधकाम लाईट व नळ कनेक्शन वगैरे सर्व तदंगभूत वस्तू व वहिवाटीचे हक्कासह

सदरची मिळकत ही शहनाज रऊफ शेख यांचे मालकी व कब्जेवहिवटीची आहे. त्याप्रमाणे त्यांची वर नमूद मिळकतीचे सिटी सर्व्हे रेकॉर्डला नावाची नोंद असून सदरची मिळकत त्यांचे मालकी व कब्जेवहिवाटीस आहे.

सदरची मिळकत ही शहनाज रऊफ शेख यांचे मालकी हक्काची व नांवे असलेली कब्जेवहिवाटीची मिळकत असून त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलास कायमखुष खरेदी देण्याचा ठराव करुन आमचे अशिलांसोबत नोटरी इसारपावतीचा दस्त दि. २७/०८/२०२६ रोजी करून इसारादाखल रक्कमही स्विकारलेली आहे. अशी वस्तुस्थिती असताना शहनाज रऊफ शेख हे आमचे अशिलांचे अपरोक्ष दुसऱ्या कोणासही विक्री करणार असल्याचे आमचे अशिलास नुकतेच कळाले आहे. तसेच त्यांनी आमचे अशिलांचे ओळखीचे व्यक्तींसमोर बोलूनही दाखविले आहे.

सबब या सावधानतेच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वर उल्लेख केलेल्या बांधकामासहीत असलेल्या मिळकतीशी कोणीही कसलीही गहाण, दान, लिज, इसारपावती, बक्षिसरपत्र, हिब्बानामा, साठेखत, खरेदीखत अथवा इतर कसलाही जमीन हस्तांतरणाचा व्यवहार करू नये, या उपर कोणी सदर मिळकतीशी कोणीही काही व्यवहार केल्यास तो आमचे अशिलावर व सदर मिळकतीचे कब्जे मालकी वहीवाटीवर बंधनकारक राहणार नाही कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून मी सावधानतेची जाहीर नोटीस दिली असे ता. १७/१०/२०२६

सही/-
**ॲड. साकिब एम. शेख**
**जिल्हा व सत्र न्यायालय आवार**
**बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर**
**मो.नं. ९९७०४१७९४७**
**अशिल- शबाना इन्नुस शेख**
**तर्फे ॲडव्होकेट**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे- उंडेगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर सदर भागातील सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मिळकर्तीचे वर्णन - डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे- उंडेगाव येथील शेतजमीनीचे वर्णन खालील प्रमाणे -

अ) गट क्र. ३१३/१ याचे क्षेत्र ०० हे. ४६ आर + पो.ख. ००-१० आर, एकूण क्षेत्र ०० हे. ५६ आर, याचा आकार ०१ रू. ४४ पैसे यासी चतुःसिमा पूर्वेस-गट नं. ३१४, दक्षिणेस-गट नं. २८४, पश्चिमेस- संगीता जगताप, उत्तरेस-

ब) गट क्र. ३१४ याचे क्षेत्र ०३ हे. ५४ आर + पो.ख. ००-१० आर, एकूण क्षेत्र ०३ हे. ६४ आर, याचा आकार १० रू. ९४ पैसे यासी चतुःसिमा पूर्वेस - गट नं. ३१५, दक्षिणेस-गट नं. २८४, पश्चिमेस- गट नं. ३१३, उत्तरेस-पानगांव शिव

क) गट क्र. ३१३/२ याचे क्षेत्र ०० हे. १० आर, आकार ०० रू. ३२ पैसे यासी चतुःसिमा पूर्वेस-गट नं. ३१४, दक्षिणेस- संगीता जगताप, पश्चिमेस- गट नं. ३१५, उत्तरेस- तानाजी जगताप

वरील कलम अ, ब, क मधील वर्णनाच्या संपूर्ण जमिनी तसेच ग.नं. ३१३/१ व ३१४ मध्ये चालू पाण्याच्या विहिरी मोटर पाईपलाईन येणेप्रमाणे तदंगभूत वस्तुसह.

वरील वर्णनाची शेतजमीन ही आमचे अशिल राजकुमार मोहन घायतिडक, रा. काळेगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर व त्यांचे भाऊ नंदकुमार मोहन घायतिडक यांचे नावे ७/१२ उताऱ्यावर समाईकात आहे. सदर शेतजमीनी हया वडिलोपार्जित असून अद्याप सदर जमिनीचे सरस-निरस मानाने वाटप झालेले नाही सर्व जमिनी एकत्रातच आहेत.

उपरोक्त ग.नं. ३१३/१, ३१४, ३१३/२ ह्या मिळकती ह्या एकत्र हिंदू कुटुंबाच्या मिळकती आहेत परंतु आमचे अशिलाचे सदर मिळकतीमध्ये प्रत्येकी १/२ हिस्सा त्यामध्ये असताना आमचे अशिलाचे भाऊ नंदकुमार मोहन घायतिडक हे सदर जमीन विकण्याचे हेत आहेत. त्यामुळे सदरची गट नं. ३१३/१, ३१४ व ३१३/२ ह्या मिळकती संदर्भाने कोणीही नंदकुमार मोहन घायतिडक यांचे सोबत कसलाही गहान, दान, लिज, कब्जेसाठेखत, साठेखत, खरेदीखत, गहाणखत इत्यादी तत्सम तथा कोणत्याही स्वरूपाचा व्यवहार करू नये जर व्यवहार केला तर आमचे अशिलावर बंधनकारक नाही तसेच सदर गट नं. ३१३/१, ३१४ व ३१३/२ मध्ये आमचे अशिलाचा १/२ हिस्सा आहे. त्यामुळे कोणाचीही कसलीही फसगत होवू नये म्हणून सदरील जाहीर नोटीस दिली असे. ता. १७/१०/२०२६

सही/-
**ॲड. ज्योतिर्लिंग उमेनेश्वर नवले**
**बी.ए.एल.एल.एम**
**अशिलतर्फे ॲडव्होकेट**
**मु. पो. काळेगांव, ता. बार्शी जि. सोलापूर.**
**मो. ९९२२११८७१४**

सही/-
अशिल

### हाजापुर परिसरातुन विवाहित महिलेचे तीन मुलांसह अपहरण

**मंगळवेढा, दि. १७ ऑक्टोंबर-**

हाजापुर परिसरात अंगावर काटा आणणारी घटना घडली आसुन ऐका २६ वर्षीय विवाहीत महिलेला तिच्या आन्य तिन लेकरासह आज्ञाताने पळवुन नेले आहे. पतीच्या फिर्यादीवरून आज्ञात व्यक्तीविरूध्द पोलीसात गून्हा दाखल झाला आहे.पोलीस सुत्रांनी दिलेली माहीती आशी फिर्यादी पती व पत्नी,तसेच मुल दि. २८ सप्टेंबर रोजी रात्री ११ वाजता यांच्यासोबत जेवण केले आणि झोपले होते.रात्री बारा वाजता पतीला जाग आली. शेजारी पाहिलं तर... कोणीच नाही पतीन घरभर शोधलं, आजूबाजूला पाहिलं, तसेच नातेवाईकाकडे शोध घेतला मिळून आले नाहीत. पतीने पोलीसात जाण्याआधी स्वतः २० दिवस वेड्यासारखा शोध घेतला. कुठे भांडण होऊन गेली असेल? पण नाही. शेवटी त्याची खात्री पटली कोणीतरी अज्ञात इसमानं माझ्या बायको पोरांना पळवून नेलंय अखेर दि. १७ ऑक्टोबर रोजी तो धावत मंगळवेढा पोलीस ठाण्यात पोहोचला आणि अज्ञाताविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.मंगळवेढा पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत सामान्य कामे**

वरिष्ठ मंडळ विद्युत अभियंता (सामान्य), मध्य रेल्वे, सोलापूर हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाईट www.ireps.gov.in वर ऑनलाईन ई-निविदा मागवत आहेत. निविदा क्र. : SUR/L/T/2025/35R कामाचे नाव : सोलापूर मंडळातील सोलापूर, कलबुर्गी, वाडी, लातूर, उस्मानाबाद, कुर्डूवाडी, हरंगूळ आणि पंढरपूर रोड रेल्वे स्थानकांवर गर्दी व्यवस्थापन प्रणालीशी संबंधित विद्युत सामान्य सेवेचे काम. अंदाजित खर्च: ४,७१,४८,००२.१०/-, बयाणा रक्कम : ९,४३,०००/-, काम पूर्ण करण्याचा कालावधी : १२ महिने ऑफरची वैधता : ६० दिवस वेबसाईटवर निविदा बंद होण्याची तारीख व वेळ : ०९.११.२०२६ रोजी दुपारी १५.०० वाजता (३:०० वाजता) ई-पेमेंट : बिड सिक्युरिटीची रक्कम www.ireps.gov.in या संकेतस्थळावर ई-पेमेंटद्वारे भरावी लागेल.

EXP-40 **वरिष्ठ म. वि. अ. (सा.), सोलापूर**

**तिकिटांसाठी रेलवन ॲप डाउनलोड करा**

## जाहीर प्रसिद्धीकरण

सिव्हिल एम. ए. नं. ४२/२०२६

### अक्कलकोट येथील मे. सिव्हिल जज ज्यु.डी. यांचे कोर्टात

**१) श्रीमती हिराबाई शिलवंत घोडके**
रा. चिंचोळी (न.), पो. सुलेरजवळगे,
ता. अक्कलकोट, जि. सोलापूर

**२) श्री. भुताळी शिलवंत घोडके** **-- अर्जदार**
रा. चिंचोळी (न.), पो. सुलेरजवळगे,
ता. अक्कलकोट, जि. सोलापूर

**३) नागबाई अमसिद्ध पुजारी**
रा. सुलेरजवळगे, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर

**विरुद्ध**

**कोणीही नाही** **-- सामनेवाले**

ज्या अर्थी वरील अर्जदाराने या न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज नं. ४२/२०२६ हा दि. बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे दाखल केला असून अर्जदार क्र. १ चे पती, अर्जदार क्र. २ व ३ चे वडील शिलवंत भुताळी घोडके यांचे दि. १३/०८/२०२५ रोजी सुलेरजवळगे, ता. अक्कलकोट येथील राहते घरी निधन झाले आहे. अर्जदारांना शासकीय कामाकरिता अर्जदार हे शिलवंत भुताळी घोडके यांचे वारस असलेने अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र मिळावे याकरीता अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रसिद्धीकरणाने कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत अथवा यातील अर्जदार हे मयत शिलवंत भुताळी घोडके यांचे वारस असलेबाबत कोणाचे काही म्हणणे अगर हरकत असल्यास त्यांनी हे जाहीरप्रसिद्धीकरण प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दिनांक २३/११/२०२६ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जाच्या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे अर्जदारांना त्यांच्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश मे. कोर्टातर्फे देण्यात येईल.

हे जाहीर प्रसिद्धीकरण केले. ता. १५/१०/२०२६

आज रोजी मे. कोर्टाच्या हुकुमाप्रमाणे माझ्या सहिने प्रसिद्ध केले.

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा. अधीक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय**
**अक्कलकोट**

## जाहीर प्रसिद्धीकरण

दि.कि. अर्ज नं. ६९/२०२६

### बार्शी येथील मे.सि.ज.ज्यु.डि साहेब यांचे कोर्टात

**१) स्वाती अतुल खुने**
वय-४३ वर्ष धंदा - घरकाम
रा. अलिपूर रोड, छत्रपती पार्क गुंड शॉपिंग सेंटर
बार्शी ता.बार्शी जि.सोलापूर **-- अर्जदार**

**२) विराज अतुल खुने**
वय-२१ वर्ष धंदा -शिक्षण रा. सदर

**३) ऐश्वर्या अतुल खुने**
वय-१७ धंदा-शिक्षण रा. सदर

**विरुद्ध**

**कोणी नाही** **-- सामनेवाला**

ज्याअर्थी, प्रस्तुत प्रकरणातील अर्जदारनं. १ यांचे पती व अर्जदारनं. २ व ३ यांचे वडिलांचे दि. ३१/०५/२०२६ रोजी राहत्या घरी अलिपूर रोड, छत्रपती पार्क गुंड शॉपिंग सेंटर बार्शी येथे मयत झालेले आहेत. मयत अतूल रामचंद्र खुने यांचे पश्चात त्यांचे प्रमाणपत्र अर्जदारांकडे असावे तसेच त्यांना त्यांच्या मृत्यु नंतर शासकीय व निमशासकिय कामासाठी सोयी चे व्हावे याकरिता अर्जदार यांना मयत अतूल रामचंद्र खुने यांच्या वारसप्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तसेच अर्जदारां शिवाय मयतास अन्य कोणीही वारस नसल्याने त्यांना त्याबाबतचा वारस दाखला मिळण्यासाठी यातील अर्जदार यांनी या मे.कोर्टात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी वर नमुद अर्जदार यांच्या शिवाय मयत अतूल रामचंद्र खुने यांच्या बाबत इतर कोणाचा कसलाही प्रकारे वारसहक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाले पासून ३० दिवसांचे आत अगर निमलेले तारिख २९/१०/२०२६ रोजी या कामी मे.कोर्टात सकाळी ११.०० वा. हजर राहुन कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी अथवा कोणाचीही काही म्हणणे/हरकत न असल्यास सदरील अर्जदार यांना मयत अतूल रामचंद्र खुने यांचे वारस असले बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल. कळावे

हे जाहीर प्रसिद्धी करण दिले. ता. १६/१०/२०२६

**सही/-**
**क. लिपिक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर**
**बार्शी**

## जाहीर नोटीस उत्तर

तमाम लोकांना विशेषतः जि. सोलापूर ता. माढा पैकी मौजे पिंपळखुंटे येथील व परिसरातील लोकांना या जाहीर नोटीस उत्तराने कळविण्यात येते की,

जि. सोलापूर ता. माढा पैकी मौजे पिंपळखुंटे येथील गट नं. ३६ पैकी क्षेत्र ०१ हे. ६२ आर आकार ०३ रुपये ६६ पैसे असे मिळकतीचे वर्णन करून मुबारक महिबुब मुलाणी यांनी ॲड. कबीर रुबाब शेख रा. कुर्डूवाडी, ता. माढा, जि. सोलापूर यांच्यामार्फत दि. २७/०९/२६ रोजीच्या दैनिक पुण्यनगरी या वर्तमानपत्रातील पान नं. ९ वर प्रसिद्ध केलेल्या जाहीर नोटीसेस या जाहीर नोटीस उत्तराने कळविण्यात येते की,

दि. २७/०९/२६ रोजी दैनिक पुण्यनगरी या वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेली जाहीर नोटीस ही मुळतःच खोटी, बनावट व बेकायदेशीर अशी आहे.

सदर नोटीस मधील जि. सोलापूर ता. माढा पैकी मौजे पिंपळखुंटे येथील गट नं. ३६ पैकी क्षेत्र ०१ हे. ६२ आर आकार ०३ रुपये ६६ पैसे ही मिळकत अब्दुलकरिम ईस्माईल शेख यांचे मालकीची होती एवढाच मजकूर खरा व बरोबर असून बाकी संपूर्ण मजकूर खोटा, बनावट व बेकायदेशीर असा आहे. जि. सोलापूर ता. माढा पैकी मौजे पिंपळखुटं येथील गट नं. ३६ क्षेत्र हे. ०३-६३ आर, पोख ०५ आर यापैकी पश्चिमेचे क्षेत्र हे. ०१-८२ आर, पोख ०२ आर, आकार रू. ०३-६५ पैसे यांसी चतुःसिमा पूर्वेसः- गट नं. ३६ पैकी, दक्षिणेसः- गट नं. ४०, पश्चिमेसः- गट नं. ३५ व उत्तरेस बेंद ओढा (सदर गटात एक विहीर, तसेच विहिरीवर ५ हॉर्स पॉवरची भले.मोटारसह त्यात प्रत्येकी १/२ पाणी घेण्याच्या व रस्त्याच्या वहिवाटीच्या हक्कासह ही मिळकत आमचे अशिल श्री. महेश बबन रासकर यांनी अब्दुलकरिम ईस्माईल शेख यांचेकडून दि. २०/१२/२००२ रोजी रक्कम रू. १,३५,०००/- किंमतीस रजि. खरेदीखताने कायम खुश खरेदी घेतलेली आहे. त्याप्रमाणे सदर मिळकतीच्या गावच्या हक्कपत्रकी आमचे अशिलाची नोंद झालेली असून तेव्हापासून तशी प्रत्यक्षात आमचे अशिलाची कब्जे वहिवाट आहे. त्यामुळे सदर मिळकतीशी नोटीस देणार मुबारक मुलाणी यांचा कसलाही हक्क व अधिकार नाही.

तथापि नोटीस देणार यांनी त्यांचे नोटीस मध्ये सदरची मिळकत वहिवाटून उत्पन्न घेणे खर्चाक व गैरसोईचे असल्याने त्यांनी सदरची मिळकत २० वर्षांपूर्वी आमचे अशिलास चालू बाजारभावाप्रमाणे रक्कम रू. ३,००,०००/- एवढ्या किंमतीस खरेदी देण्याची विनंती केली. सदरची मिळकत गट नं. ३५ लगत व सोईची असल्यामुळे आमचे अशिलाने सदरची मिळकत खरेदी करण्याचे मान्य व कबुल केले. परंतु त्यावेळी आमचे अशिलाकडे तेवढी रक्कम नसल्यामुळे त्यांनी रक्कम रू. ३,००,०००/- अकलूज येथील ओळखीचे सावकार बबनराव त्रिंबक रासकर यांचेकडून व्याजाने रक्कम घेऊन जमीन मालकास रक्कम दिली व सावकारकी व्यवहारात पैशाला तारण म्हणून सदरची मिळकत सावकाराचा मुलगा महेश बबनराव रासकर यांचे नांवे तारणादाखल खरेदी दिली. सदर सावकारास रक्कम रू. ४,४५,०००/- दिल्यानंतर त्याने दि. ०५/०१/२६ रोजी सदर मिळकतीपैकी ०० हे. ६० आर एवढे क्षेत्र आमचे अशिलाचे नावे परत खरेदीखत करून दिले. तसेच हिशोबाने निघणारी उर्वरित रक्कम रू. ७,००,०००/- दिल्यानंतर राहिलेले क्षेत्र ०१-२२ आर ही मिळकत आमचे अशिलास खरेदी देण्याचे आश्वासन दिले आहे. असा व त्या अनुषंगाने जाहीर नोटीस मध्ये नमूद केलेला मजकूर हा पूर्णपणे खोटा, बनावट, बेकायदेशीर असून तो आमचे अशिलाची मानहानी व बदनामीकारक असा आहे याची माहिती व जाणीव मुबारक मुलाणी यांना माहिती व जाणीव असून तसे खोट्या आशयाचा मजकूर नमूद करून जाहीर नोटीस वर्तमानपत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध केलेली आहे. त्यामुळे मुबारक महिबुब मुलाणी यांनी फौजदारी स्वरूपाचे कृत्य केलेले असल्याने त्याबाबत आमचे अशिल त्यांचेविरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई करणार आहेत.

वर जाहीर नोटीस मध्ये नमूद केलेल्या आमचे अशिलाच्या खरेदी मालकीच्या वहिवाटीच्या मिळकतीपैकी दक्षिण बाजूचे क्षेत्र हे. ००-६० आर, आकार रू. ००-६४ पैसे ही मिळकत नोटीस देणार मुबारक महिबुब मुलाणी यांनी आमचे अशिलाकडून दि. ०५/०१/२०२६ रोजी रक्कम रू. ४,४५,०००/- किंमतीस रजि. खरेदीखताने कायम खुश खरेदी घेतलेली आहे. त्यामुळे नोटीस देणार यांनी दि. २७/०९/२६ रोजीच्या जाहीर नोटीस मध्ये केलेल्या तक्रारी हया पूर्णपणे बिनबुडाच्या व बेकायदेशीर स्वरूपाच्या अशा आहेत. आता सद्या नोटीस देणार यांना दि. ०५/०१/२६ रोजी खरेदी दिलेले क्षेत्र सोडून क्षेत्र हे. ०१-२२ आर ही मिळकत प्रत्यक्षात आमचे अशिलाचे कब्जे वहिवाटीस आहे. आमचे अशिल हे जि. सोलापूर ता. माळशिरस पैकी मौजे अकलूज येथे राहतात यांचा गैरफायदा घेऊन राहिलेले क्षेत्र कमी रकमेत आमचे अशिलांनी मुबारक महिबुब मुलाणी यांना विक्री करावे व ते क्षेत्र दुसऱ्या कोणास विक्री करू नये या दृष्ट हेतूने तशी खोट्या आशयाचा मजकूर नमूद करून जाहीर नोटीस प्रसिद्ध केलेली आहे.

नोटीस देणार यांनी सदर जाहीर नोटीस मध्ये आमचे अशिलाबाबत व त्यांचे वडील बबनराव त्रिंबक रासकर यांचेबाबत खोटा, चुकीचा व बेकायदेशीर असा मजकूर नमूद करून सावकारकी बाबत नमूद केलेला मजकूर हा खोटा, बनावट व बेकायदेशीर आहे यांची माहिती व जाणीव असून त्यामुळे आमचे अशिलाची मानहानी होऊन बदनामी होणार आहे व त्याचा फायदा नोटीस देणार यांना होणार आहे याची माहिती व जाणीव असूनही तशी बेकायदेशीररित्या दैनिक वर्तमानपत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध करून फौजदारी स्वरूपाचा गुन्हा केलेला आहे. आमचे अशिलाचे वहिवाटीस असलेल्या मिळकतीशी नोटीस देणार मुबारक महिबुब मुलाणी यांचा कसलाही हक्क व अधिकार नाही. त्यामुळे ते क्षेत्र आमचे अशिलाने कोणास विक्री करावयाची किंवा नाही यांचा अधिकार पूर्णपणे आमचे अशिलास आहे. केवळ आमचे अशिलाने दबावाखाली येवून सदरची मिळकत नोटीस देणार मुबारक महिबुब मुलाणी यांनाच विक्री करावे या दृष्ट हेतूने सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध केलेली आहे. त्यामुळे सत्य वस्तुस्थितीची माहिती व जाणीव होवून कोणाची कसलीही फसवगत होवू नये म्हणून हे जाहीर नोटीस उत्तर प्रसिद्ध करणे भाग पडत आहे. यांची नोंद घ्यावी. कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस उत्तर प्रसिद्ध केले असे ता. १६/१०/२०२६

सही/-
**श्री. दिलीप अभयकुमार फडे**
**ॲडव्होकेट**
**आय.डी.बी.आय. बँक शेजारी, स्तंभासमोर**
**महावीर पथ, अकलूज-४१३१०१**
**ता. माळशिरस, जि. सोलापूर**
**रजि. नं. महा/७०९/१९८१**
**मो.नं. ९४२२४६०५७८**

## प्रसिध्दीकरण

नि. ५

दि.कि. अर्ज नं. ७५/२०२६

### बार्शी येथील मे.सि.ज.ज्यु.डि साहेब यांचे कोर्टात

**१) महंमदहुसेन अब्दुलकरीम हन्नुरे**
वय-५३ वर्ष धंदा व्यापार
रा. ७०७, महेदी नगर परंडा रोड बार्शी

**२) अर्जुमन बानु महंमद गौस हन्नुरे** **-- अर्जदार**
वय-५२ वर्ष धंदा-घरकाम रा. जवाहर शास्त्री नगर
बँक कॉलनी उमरगा ता.उमरगा जि.धाराशिव

**३) इसाक अब्दुल करिम हन्नुरे**
वय-५० धंदा-मजुरी रा. समर्थ नगर भुम
ता. भुम जि.धाराशिव

**४) विलायत अब्दुल करिम हन्नुरे**
वय-४९ धंदा-मजुरी रा. समर्थ नगर भुम
ता. भुम जि.धाराशिव

**विरुद्ध**

**कोणी नाही** **-- सामनेवाला**

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम VIII चे २ प्रमाणे**

यात अर्जदार विनंती पूर्वक कळवितात की,

ज्याअर्थी प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार नं. १ ते ४ यांचे वडील दि. २७/०३/२०२४ रोजी राहत्या घरी ७०७, महेदी नगर परंडा रोड बार्शी येथे यत अब्दुल करीम अल्लाबक्ष हन्नुरे झालेले आहेत. मयत अब्दुल करीम अल्लाबक्ष हन्नुरे यांचे पश्चात त्यांचे प्रमाणपत्र अर्जदारांकडे असावे तसेच त्यांना त्यांच्या मृत्यु नंतर त्यांना वंदनीय लक्ष्मीबाई केळकर महिला नागरी सहकारी पतसंस्था बार्शी येथे मयत अब्दुल करीम अल्लाबक्ष हन्नुरे यांनी सदरील पतसंस्थेत दि. ०५/११/२०२० रोजी लॉकर नं. १९ चावी नं. ६१ या क्रमांकाचे लॉकर घेतले होते परंतु ते मयत झालेने सदरील लॉकर मध्ये असलेले सामान कागदपत्रे वगैरे अर्जदार यांना मिळणे करिता सदरील पतसंस्थेने वारस प्रमाणपत्र मागितलेले असलेने तसेच इतर कामाकरिता सोयीचे व्हावे या करिता अर्जदार यांना मयत अब्दुल करिम अल्लाबक्ष हन्नुरे यांच्या वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तसेच अर्जदारां शिवाय मयतास अन्य कोणीही वारस नसल्याने त्यांना त्या बाबतचा वारस दाखला मिळणे साठी यातील अर्जदार यांनी या मे. कोर्टात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी वर नमुद अर्जदार यांच्या शिवाय मयत अब्दुल करीम अल्लाबक्ष हन्नुरे यांच्या बाबत इतर कोणाचा कसलाही प्रकारे वारस हक्क हित संबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाले पासून ३० दिवसांचे आत अगर निमलेले तारीख ०१/१२/२०२६ रोजी या कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा. हजर राहुन कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी अथवा कोणाचेही काही म्हणणे / हरकत न असल्यास सदरील अर्जदार यांना मयत अब्दुल करीम अल्लाबक्ष हन्नुरे यांचे वारस असले बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल. कळावे

हे जाहीर प्रसिद्धीकरण दिले. ता. १४/१०/२०२६

**सही/-**
**क. लिपिक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहाय्यक अधीक्षक**
**सह दिवाणी न्यायालय क.स्तर,**
**बार्शी**



## व्हॉलिबॉल स्पर्धेत गुंजेगावच्या सिद्धिविनायक विद्यामंदिरला विजेतपद

**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

चारे (ता. बार्शी) येथे झालेल्या जिल्हा व्हॉलिबॉल स्पर्धेत दक्षिण सोलापूर तालुक्यातील गुंजेगाव येथील श्री सिद्धिविनायक विद्यामंदिर प्रशालेने विजेतपद पटकावले.या यशाच्या जोरावर हा संघ बार्शी तालुक्यातील खामगाव येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. स्पर्धेत संभव पाटील, अनय पवार, नागेश एडके, पृथ्वीराज गुंड, भालचंद्र निंगफोडे, विराज घुले, राजवीर भडकुंबे, विश्वराज भडकुंबे, सार्थक पाटील, विजयराज भडकुंबे, अजिंक्य मोटे आणि ऋतुराज निंगफोडे या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.या यशस्वी खेळाडूंना क्रीडा शिक्षक शिरीषकुमार गुरव यांचे मार्गदर्शन तर बालाजी भडकुंबे यांचे सहकार्य लाभले. संघांचे संस्थेचे अध्यक्ष सुधीर रघोजी, सचिव बाळासाहेब शेळके, अनिल गिराम, सुमित बचुटे व मुख्याध्यापक शशिकांत उपासे यांनी संघांचे खेळाडूंचे अभिनंदन करुन पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# दुहेरीत भारताच्या दक्षिणेश्वर सुरेश व मनीष सुरेशकुमार यांना विजेतपद

### आयटीएफ 30 हजार डॉलर पुरुष टेनिस स्पर्धा : एकेरीत भारताच्या करण सिंग व अमेरिकेच्या समीर बॅनर्जी यांच्यात आज अंतिम लढत



**तभा वृत्तसेवा, सोलापूर, १७ ऑक्टोबर-**

सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटना यांच्या वतीने आयोजित व अखिल भारतीय लॉन टेनिस संघटना, महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या महाराष्ट्र शासन, सोलापूर महानगरपालिका व जिल्हाधिकारी कार्यालय पुरस्कृत एमएसएलटीए एसडीएलटीए आयटीएफ २५हजार डॉलर पुरुष टेनिस स्पर्धेत एकेरीत भारताच्याकरण सिंग,अमेरिकेच्या समीर बॅनर्जी यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. दुहेरीत दक्षिणेश्वर सुरेश व मनीष सुरेशकुमार या भारतीय जोडीने विजेतपद संपादन केले.




येथील एमएसएलटीए टेनिस कोर्ट, डिस्ट्रिक्ट स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे सुरु असलेल्या या स्पर्धेत मुख्य ड्रॉ मध्ये एकेरीत उपांत्य फेरीत पहिल्या सामन्याततिसऱ्या मानांकित भारताच्या करण सिंग यानेथायलंडच्या थानापट चॅनताचा टायब्रेकमध्ये ७-६(३), ६-२ असा पराभव करून अंतिम फेरीत धडक मारली. हा सामना१तास १९मिनिटेचालला. दुसऱ्या उपांत्य फेरीच्या लढतीतसहाव्या मानांकित अमेरिकेच्या समीर बॅनर्जी यानेकाल अव्वल मानांकित खेळाडूवर विजय मिळवणाऱ्या स्वीडनच्या रेचटमन विन्सिगुएरा, डब्ल्यू याचा ३-६, ६-३, ६-१ असा तीन सेटमध्ये पराभव करून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. हा सामना २तास २ मिनिटे चालला. दुहेरीत अंतिम फेरीतभारताच्या दक्षिणेश्वर सुरेश व मनीष सुरेशकुमार यांनी दुसऱ्या मानांकित भारताच्या आदिल कल्याणपूर व जपानच्या रियुकी मत्सुदा यांचा६-३, ६-४ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. स्पर्धेतील विजेत्या जोडीला करंडक, १,७०,०००/-रुपये व २५आयटीएफ गुण, तर उपविजेत्या जोडीला करंडक,९८,०००/-रुपये व १४आयटीएफ गुण अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरणओएसिस मॉल चे व्यस्थापकीय संचालक सिद्धार्थ गांधी यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.या प्रसंगी पर्यवेक्षक लीना नागेशकर उपस्थित होत्या.दुहेरीतील विजयी व उपविजयी खेळाडूंना रूबी ट्रॅव्हलचे संचालक असिफ पटेल यांच्या तर्फे भेट वस्तू देऊन गौरविण्यात आले.सूत्र संचालन स्पर्धा संचालक व एमएसएलटीएचे सह सचिव राजीव देसाई यांनी केले.





## जिल्हा बास्केटबॉल स्पर्धेत 'एमआयटी ज्युनिअर कॉलेजला उपविजेतेपद

**पंढरपूर, दि.१७ ऑक्टोबर-**

शालेय जिल्हा बास्केटबॉल स्पर्धेत १९ वर्षांखालील गटात वाखरी (पंढरपूर) येथील माईर्स एमआयटी विश्वशांती गुरुकुल ज्युनिअर कॉलेजच्या मुलांच्या संघाने उपविजेतेपदा संपादिले. सांगोला विद्यामंदिर येथे झालेल्या या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ क्रीडा अधिकारी राहुल गायकवाड यांच्या उपस्थितीत झाला. संघास क्रीडा शिक्षक प्रविण पिसाळ यांचे मार्गदर्शन लाभले. हेडमिस्ट्रेस शिबानी बॅनर्जी, प्राचार्य डॉ. स्वप्नील शेठ यांनी संघाचे मार्गदर्शक क्रीडा शिक्षकांचे अभिनंदन केले.
**उपविजेता संघ :** कर्णधार तन्मय उद्धव होले, उपकर्णधार प्रशांत हणमंत खरात, कार्तिक कदम, धीरज कदम, उदय खरात, प्रणव जठार, ओम खटकाळे, अबूबकर नदाफ, मोहित कांबळे, तनिष्क देशमाने, राजवीर बोरसुरे आणि प्रतीक गायकवाड.

## समर्थ क्रिकेट क्लब पीएम चषकाचा मानकरी

### पीएमसीसी उपविजेता; संदीप पवार मालिकावीर व उत्कृष्ट फलंदाज



**तभा वृत्तसेवा, सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

समर्थ क्रिकेट क्लबने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि क्रकेटप्रेमी परमेश्वर माळगे यांच्या वाढदिवसानिमित्त परमेश्वर माळगे मित्र परिवाराच्या वतीने केलेल्या पीएम चषक २०२६ टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे विजेतपद पटकाविले. पीएमसीसी संघास उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

जुळे सोलापूर येथील भंडारी मैदानावर झालेल्या या स्पर्धेत १२ निमंत्रित संघांनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेचे पारितोषिक वितरण प्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. शैलेश पाटील यांच्या हस्ते झाले. मालिकावीर व फलंदाजाचे पारितोषिक संदीप पवार व गोलंदाजाचे पारितोषिक जॉय दास यास देण्यात आले. यावेळी गोरख चौधरी, विजय कोणापुर, आप्पा रामदाशी,सचिन कुसेकर, बालाजी पाठक, श्रीकांत पाटील, धरमराज नाशी, राज कामशेट्टी, श्रीशैल कुताटे, महादेव यलशेट्टी, शिवराज बिराजदार, लखन चिवडशेट्टी, सनी कीर्तने, प्रकाश रायचूरकर, कौस्तुभ स्वामी, स्वप्निल ईगळे, अनिल गायकवाड, यश दिंडोरे, गणेश जाधव, विवेक ईगळे आदी मान्यवर उपस्थित होते.



## पानगल प्रशालेच्या मुलींच्या संघास तिहेरी मुकुट

### शालेय शहर सेपक टकरा स्पर्धेतील कामगिरी

**तभा वृत्तसेवा, सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

यलगुलवार प्रशालेच्या मैदानावर झालेल्या शालेय शहर सेपक टकरा स्पर्धेत एम. ए. पानगल अँग्लो उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या मुलींच्या संघाने १४,१७ व १९ वर्षाखालील गटात विजेतेपद पटकावीत तिहेरी मुकुट संपादला.

१४ व १७ वर्षाखालील मुलींच्या अंतिम सामन्यात त्यांनी सेंट थॉमस स्कूलला २-० ने हरविले. तसेच १९ वर्षाखालील मुलींच्या गटात राज मेमोरियल स्कूलला २-० ने नामविले. या कामगिरीवर तिन्ही संघाची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. संघास क्रीडा शिक्षक नावेद मुनशी, इकबाल दलाल व अल्ताफ सिद्दिकी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे प्राचार्य डॉ. हारून रशीद बागबान, परजाना नदाफ, फौजिया खरेदी, रियाज सय्यद, जाकीर शहापुरे, इद्रीस पेरमपल्ली, फरहत शेख, आयान बागवान , जैद हन्नुरे, अजमल काझी आदींनी अभिनंदन केले.

**विजयी संघ : १४ वर्षाखालील :** जोहरा शेख, फातिमा शेख, जैनब बागवान, ओमाना शेख, तमन्ना शेख. **१७ वर्षाखालील :** असीला शेख. खुतेजा बेगम शेख,अकसा बागवान, शालेहा पठाण, अलीना शेख. **१९ वर्षाखालील :** अलमिनाज शेख, मिसबा पटेल, निकत बागवान, आयमन शेख, साजिया डोंगरे.



## व्हॉलिबॉल स्पर्धेत कोर्टी पंढरपूरच्या एसकेएन सिंहगड अभियांत्रिकी उपविजेता

**पंढरपूर, दि.१७ ऑक्टोबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अंतर्गत कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी येथे आयोजित आंतरमहाविद्यालयीन व्हॉलीबॉल स्पर्धेत सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोर्टी, पंढरपूरच्या व्हॉलीबॉल संघाने उपविजेतेपद संपादिले. विद्यापीठाच्या पुढील कॅम्प साठी शिवम देशमुख, साई मिसाळ, सागर नायर, जयेश भोसले यांची निवड झाली आहे. संघास क्रीडाप्रमुख प्रा. अनिल जाधव, प्रा. बाळकृष्ण जगदाळे, प्रा. सचिन घाडगे आणि डॉ.नामदेव सावंत यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे प्राचार्य डॉ. कैलाश करांडे आणि उपप्राचार्य डॉ. स्वानंद कुलकर्णी यांनी संघाचे अभिनंदन केले.

## मंद्रूपच्या संतोष भीमराव पाटील महाविद्यालयाचे दोन्ही संघ अव्वल साखळीत

### आंतर महाविद्यालयीन खो-खो स्पर्धा

**तभा वृत्तसेवा, सोलापूर, १७ ऑक्टोबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन खो-खो स्पर्धेत पुरुष गटात संगमेश्वर, संतोष भीमराव पाटील मंद्रूप, वसुंधरा महाविद्यालय आणि महिला गटात सांगोला महाविद्यालय, एन.बी. नवले सिंहगड, संतोष भीमराव पाटील मंद्रूप व श्रीराम इन्स्टिट्युट पानीवर संघाने अव्वल साखळीत प्रवेश केला.

सुशीलकुमार शिंदे शारीरिक शिक्षण महाविद्यालयाने त्यांच्या मैदानवार आयोजिलेल्या या स्पर्धेत पुरुष गटात १३ व महिला गटात ११ महाविद्यालयांनी भाग घेतला आहे. या स्पर्धेचे उद्घाटन विद्यापीठाच्या क्रीडा परिषदेचे चेअरमन व छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन मोटे व जय जवान जय किसान सैनिकी स्कुलचे प्राचार्य रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी प्राचार्य डॉ. कलाश्री देशपांडे. क्रीडा परिषदेचे सचिव प्रा. संतोष गवळी, विद्यापीठ सिनेट सदस्य अजितकुमार संगवे, निवड समितीचे डॉ. शिवानंद तोरवी, विजय पवार, सुभाष मारकड तसेच शारीरिक शिक्षण संचालक किरण चोकाककर, डॉ. अशोक पाटील, डॉ. एम. बी. पाटील, डॉ.दत्तात्रय बिराजदार, प्रा. नागनाथ पुदे, विजय तरंगे, सुवर्णा कांबळे, डॉ. आनंद चव्हाण, सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे सचिव उमाकांत गायकवाड, पंच मंडळ सचिव मोहन रजपूत, सहसचिव अजित शिंदे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन बाळासाहेब वाघचवरे यांनी केले.




#### सांगोला व सोनी महाविद्यालयाचे संघ बिगर कीटमध्ये

पुरुष गटात सोनी महाविद्यालय विरुद्ध सांगोला महाविद्यालय हा सलामीचा सामना झाला. या सामन्यात दोन्ही संघाना महाविद्यालयाने कीट न दिल्यामुळे दोन्ही संघ बिगर कीटमध्येच उतरले होते. सोनी महाविद्यालचा एक खेळाडू तर पँटीवरच मैदानात उतरला होता. याबाबत संघातील खेळाडूंकडून माहिती घेतली असता एका महाविद्यालयाने कीट वेळेवर उपलब्ध झाले नसल्याचे तर एका महाविद्यालयाने कीट दिले नसल्याचे सांगितले.



## शालेय सॉफ्टबॉल स्पर्धेत आसावा प्रशालेस विजेतेपद

**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

शालेय शहर सॉफ्टबॉल स्पर्धेत दयानंद काशिनाथ आसावा प्रशालेने १४ वर्षांखालील मुलींच्या गटात विजेतेपद पटकाविले. सलामीच्या सामन्यात मल्लिकार्जुन प्रशालेचा ७/२ तर अंतिम सामन्यात सिद्धेश्वर साखर कारखाना प्रशालेचा ९/२ असा एका डावाने पराभव केला.

यात प्रणिती चव्हाण, श्रेया तोडकरी, कावेरी सीता यांनी उत्तम कामगिरी केली. या विजेत्या संघास प्रशालेचे क्रीडाशिक्षक प्रमोद कुनगुलवार यांचे मार्गदर्शन लाभले.

विजयी संघाचे संस्थेचे स्थानिय सचिव डॉ. महेशजी चोप्रा, प्रशासक डॉ. विजयकुमार उबाळे, मुख्याध्यापिका मनीषा पाटील तसेच पर्यवेक्षिका सुनीता गवळी यांनी अभिनंदन केले.

## शालेय मैदानी स्पर्धेत अक्कलकोटच्या राजश्री बन्नेला तिहेरी मुकुट



**अक्कलकोट, दि. १७ ऑक्टोबर**

पंढरपूर येथे झालेल्या जिल्हा मैदानी क्रीडा स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलींच्या गटात मराठा मंदिर श्रीमंत राणी निर्मलाराजे कन्या प्रशालेच्या राजश्री यल्लप्पा बन्ने हिने ८००, १५०० मीटर व ३००० मीटर धावणे या तीन प्रकारात प्रथम क्रमांक पटकावित तिहेरी मुकुट संपादिला. या कामगिरीवर तिची पुणे येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. तिला क्रीडा शिक्षक प्रकाश सोनटक्के यांचे मार्गदर्शन लाभले. तिचे मातृसंस्था मराठा मंदिर मुंबईचे उपाध्यक्ष विलासराव देशमुख, उपाध्यक्ष शिवाजी भोसले, चिटणीस राजन गावडे, सरचिटणीस दीपक देशमुख, मराठा मंदिर विद्यावर्धिनीचे अध्यक्ष योगेश पवार, सचिव मनोहर साळवी, शालेय समिती निमंत्रित अमोलराजे भोसले, राजीव माने, मुख्याध्यापक आर.एस.पडवळकर आदींनी अभिनंदन केले.

# सोलापूरसह जालना, रायगड व नाशिकची विजयी सलामी

### राज्य ज्युनियर व सबज्युनियर डॉजबॉल स्पर्धा

**तभा वृत्तसेवा, सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

राज्यस्तरीय डॉजबॉल स्पर्धेत मुलांच्या ज्युनियर गटात जालना व रायगड तर सबज्युनियर गटात सोलापूर व नाशिकने अनुक्रमे जळगाव, कोल्हापूर, सांगली व कोल्हापूरवर मात करीत विजयी सलामी दिली.

डॉजबॉल स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या मान्यतेने, डॉजबॉल असोसिएशन सोलापूर व पार्थ कला क्रीडा शैक्षणिक बहुउद्देशीय संशोधन संस्था, श्री मल्लिकार्जुन हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजिलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन डॉजबॉल असोसिएशन ऑफ सोलापूरचे जिल्हाध्यक्ष वैजिनाथ हत्तुरे यांच्या हस्ते, राज्य महासचिव एकनाथ साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी जिल्हा डॉजबॉल संघटनेचे संचालक धरेप्पा हत्तुरे, क्रीडा अधिकारी नदीम शेख निवृत्त क्रीडा अधिकारी सत्येन जाधव राज्य डॉजबॉल संघटनेचे उपाध्यक्ष संगम डंगर रायगड, महेंद्र कुमार मोटघरे नाशिक, राज्यसहसचिव रमेश शिंदे जालना, कोल्हापूरचे सचिव संजय जाधव, जिल्हा संघटनेचे खजिनदार गंगाराम घोडके व विनायक हत्तुरे यांची उपस्थिती होती.



या स्पर्धेसाठी पंच म्हणून सागर तांबे सपना जाधव करुणा साळवे संभाजीनगर अक्षय डेंगळे विजय चव्हाण जालना, सुशांत जुळवे, सतीश मोकल रायगड हे काम पाहत आहेत

या स्पर्धा आयोजन व नियोजनाचे सचिव प्रा.संतोष खेंडे, खजिनदार गंगाराम घोडके परमेश्वर चांदोर संतोष पाटील खराडे हे परिश्रम घेत आहेत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संतोष खेंडे यांनी केले. गंगाराम घोडके यांनी आभार मानले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सीना-माढा योजनेच्या पाण्यासाठी शेतकऱ्यांचा रास्ता रोको

## १९ ऑक्टोबरपर्यंत आंदोलन स्थगित; टेलपर्यंत पूर्ण दाबाने पाणी देण्याचे आश्वासन



**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १७ ऑक्टोबर -**

सीना-माढा उपसा सिंचन योजनेच्या मोडनिंब लघुवितरिका क्रमांक आठला तातडीने पूर्ण दाबाने पाणी सोडावे, या मागणीसाठी शेतकरी आणि ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलन केले. आंदोलनामुळे सुमारे तासभर वाहतूक ठप्प झाली. अधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर आंदोलन १९ ऑक्टोबरपर्यंत स्थगित करण्यात आले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सौदागर जाधव यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन झाले. आंदोलनादरम्यान शेतकऱ्यांनी पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर आक्रमक भूमिका मांडली. दरम्यान उपकार्यकारी अभियंता तुंबळ यांनी आंदोलकांची भेट घेऊन १९ ऑक्टोबरपर्यंत टेलपर्यंत पूर्ण दाबाने पाणी देण्याबाबत लेखी आश्वासन दिले. त्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले. आंदोलनादरम्यान पोलीस निरीक्षक बाळासाहेब भरणे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

आंदोलनात प्रमोद वसेकर, मनोज शहा, बिभीषण रणदिवे, प्रशांत गिड्डे, रशीद सय्यद, तुळशीचे सरपंच शरद मोरे, नितीन गडदरे, दिग्विजय कांबळे, अमोल गिड्डे, नागेश राऊत, बालाजी पाटील, पांडुरंग देशमुख, विलास जाधव, अनिल माळी, मारुती माळी, गणेश जाधव, जालिंदर गोडंवळे, राजकुमार जाधव, महादेव मोरे, अभिजीत चव्हाण, गणेश म हाडिक, शरद शिंदे, शिवाजी सावंत, उत्तम सावंत, प्रवीण जाधव, अंकुश चोपडे, पांडुरंग रणदिवे, गणेश रणदिवे आदींसह जाधववाडी, बैरागवाडी, अरण, तुळशी व मोडनिंब परिसरातील शेतकरी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### आश्वासन पुर्ण न केल्यास महिलांचे आंदोलन

उपकार्यकारी अभियंता तुंबळ यांनी १९ ऑक्टोबरपर्यंत मोडनिंब लघुवितरिका क्र. आठच्या टेलपर्यंत पूर्ण दाबाने पाणी देण्याबाबत लेखी आश्वासन दिले आहे. त्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित केले. मात्र, १९ ऑक्टोबरपर्यंत पाणी मिळाले नाही, तर जाधववाडी आणि बैरागवाडी येथील महिला पाण्याच्या टाकीवर चढून तीव्र आंदोलन करतील.

**- सौदागर जाधव, जिल्हा उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)**

## महत्वाचे...



### बाईक टॅक्सी बंदीसह विविध मागण्यांसाठी 'महासंघा'चे निवेदन

**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

सोलापुरातही बाईक टॅक्सी बंद करावी, आदी मागण्यांचे निवेदन वाहतुक संघटना संयुक्त महासंघातर्फे उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांना देण्यात आले. त्यांनी प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन सकारात्मक कारवाईचे आश्वासन दिले. याशिवाय स्वतंत्र मीटर भाडे निश्चिती समिती स्थापन करणे, इलेक्ट्रिक तीनचाकींचे वर्गीकरण स्पष्ट करणे आणि प्राधिकरणात अशासकीय सदस्याला प्रतिनिधित्व देण्याची प्रदेशाध्यक्ष रियाज सय्यद यांनी केली. यावेळी प्रदीप शिंगे, इरफान कल्याणी, इम्रान शेख, मनोहर खांडेकर, अस्लम शेख, देविदास कोळी, रशीद मामू, अन्सार शेख, युसुफ शेख आणि समीर शेख उपस्थित होते.

### तरुणीस पळवून नेल्याप्रकरणी मंगळवेढ्यात गुन्हा दाखल

**मंगळवेढा, दि.१७ ऑक्टोबर -**

हाजापूर परिसरातून एका १८ वर्षीय कॉलेज तरुणीस कारणावरुन फूस लावून पळवून नेण्यात आले. या प्रकरणी मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. १३ ऑक्टोबर रोजी सर्व कुटूंबिय रात्री १० वाजता जेवण करुन घरात झोपी गेले होते. आई व वडिल हे दोघे घराबाहेर झोपले होते. दि.१४ च्या पहाटे ४ वाजता आई नेहमीप्रमाणे उठल्यानंतर घरात जावून पाहिले असता सदरची मुलगी झोपलेल्या जागी दिसून आली नाही. तद्नंतर कुटूंबियांनी परिसरातील गावात व नातेवाईकाकडे शोध घेतला असता ती मिळून आली नाही. त्यानंतर आईच्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल झाला आहे. मुलीचे वर्णन -उंची १५० सेंमी, अंगाने सडपातळ, रंग सावळा, चेहरा गोल, नाक सरळ, डोळे मोठे, अंगात चॉकलेटी रंगाचा टी शर्ट व निळ्या रंगाची जीन पँट, शिक्षण अकरावी अशा वर्णनाची तरुणी कोणाच्या निदर्शनास आल्यास त्यांनी मंगळवेढा पोलीसांशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.



### बार्शीतील महाराष्ट्र विद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

**बार्शी, दि.१७ ऑक्टोबर-**

येथील महाराष्ट्र विद्यालय बार्शी येथे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर रोजी वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली. डॉ. अब्दुल कलाम यांचे जीवन, त्यांचे वैज्ञानिक क्षेत्रातील योगदान यांची आठवण काढण्यात आली. वाचनामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडते, विज्ञानविषयक पुस्तके व प्रेरणादायी साहित्याचे नियमित वाचन करावे, असा संदेश देण्यात आला. विद्यालयाच्या प्राचार्या के. डी. धावणे, उपमुख्याध्यापक आर. बी. सपताळे, पर्यवेक्षिका एन. बी. साठे, पर्यवेक्षक के. जी. मदने, ग्रंथपाल मनोज मिरगणे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



## सप्तशृंगी नवरात्र मंडळातर्फे नवरंगे बालकाश्रमातील अनाथांना धान्यदान

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा, दि. १७ ऑक्टोबर-**

मंगळवेढा येथील सप्तशृंगी नवरात्र महोत्सव मंडळाच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत पंढरपूर येथील वासुदेव बाबाजी नवरंगे बालकाश्रमातील अनाथ बालकांना धान्यदान वाटप करण्यात आले.

नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसोबतच सामाजिक उपक्रम राबवून गरजूंच्या मदतीसाठी पुढाकार घेण्याचा मंडळाचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. अनाथांप्रती संवेदनशीलता जपणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

धार्मिक उत्सव केवळ मनोरंजनापुरते मर्यादित न ठेवता त्याला समाजसेवेची जोड देण्याचे काम सप्तशृंगी नवरात्र महोत्सव मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

मंडळाच्या या सामाजिक कार्याचे नवरंगे बालकाश्रमाने कौतुक करीत आभार मानले. यावेळी बालकाश्रमाच्या राजश्री गाडे यांच्यासह मंडळाचे अध्यक्ष समाधान डोंगरे, माजी अध्यक्ष दत्तात्रय जावळे, शरद हेंबाडे, दिलीप वाडेकर,संतोष डोंगरे,विनोद नागणे, ऋतुराज भगत, रणजित चेळेकर, डॉ. युवराज पवार, सौरभ गुंड आदी उपस्थित होते

## 'अभाविप'च्या माध्यमातून राष्ट्रबांधणीत योगदान द्या

### क्षमा शर्मा; क्षितिज युवती संमेलनात मार्गदर्शन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

देशाला सशक्त करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता आहे. 'अभाविप'च्या माध्यमातून विद्यार्थिनींनी राष्ट्रबांधणीच्या कार्यात आपले योगदान द्यावे, असे प्रतिपादन अभाविपच्या राष्ट्रीय मंत्री क्षमा शर्मा यांनी केले.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतर्फे शनिवारी हुतात्मा स्मृती मंदिरात क्षितिज युवती संमेलन उत्साहात झाले. यावेळी उपस्थित शेकडो युवतींना राष्ट्रीय मंत्री क्षमा शर्मा यांनी मार्गदर्शन केले. संमेलनाचे उद्घाटन दीपप्रज्वलन आणि देवी सरस्वती, स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमा पूजनाने झाले. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय मंत्री क्षमा शर्मा, उद्योगवर्धिनी संस्थेच्या अध्यक्षा चंद्रिका चौहान, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, संमेलन व्यवस्था प्रमुख डॉ. स्मितांजली दामा, महानगर सहमंत्री नताशा कोतापल्ली, संमेलन समिती सचिव ॲड. रेवती मुदलीयार उपस्थित होते. कार्यक्रमास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, पृथ्वीराज सावंत, अभाविपचे पश्चिम महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष डॉ. शांतीनाथ बागेवाडी, महानगर अध्यक्ष प्रा. शिवकुमार बिरादार, उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास भंडारी, प्रा. जगदेव बिराजदार, जिल्हाप्रमुख प्रा. धन्यकुमार बिराजदार, जिल्हा संयोजक उमेश वंजारी, महानगर मंत्री रविकांत चांभार यांची प्रमुख उपस्थिती होती.

उद्योगवर्धिनीच्या अध्यक्षा चंद्रिका चौहान म्हणाल्या, स्त्रियांनी न्यूनगंड झटकून पूर्वीप्रमाणे खंबीरपणे उभे राहिले पाहिजे. २०४७ साली होणाऱ्या विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीत स्त्रीशक्तीचे योगदान महत्त्वाचे राहणार आहे.

## 'भाजपा'चे संघटक गोविंदराव कुलकर्णी यांचे निधन

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डुवाडी दि.१७ ऑक्टोबर -**

संपूर्ण जीवन समाजसेवा, संघटन आणि निष्ठा भाजप आणि संघ कार्यासाठी समर्पित करणारे सामाजिक कार्यकर्ते गोविंदराव शंकरराव कुलकर्णी यांचे निधन झाले आहे.



गोविंदराव कुलकर्णी यांचा जन्म ९ नोव्हेंबर १९३५ रोजी धाराशिव येथील माणकेश्वरीच्या चिरेबंदी वाड्यात झाला. प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढत त्यांनी आपले प्राथमिक शिक्षण सुलाखे हायस्कूल, बार्शी येथून पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी कुर्डुवाडी येथे येऊन उद्योग व सामाजिक क्षेत्रात आपला ठसा उमटवला. नॅशनल टायपिंग इन्स्टिट्यूटची स्थापना करून अनेक तरुणांना रोजगाराची व स्वावलंबनाची नवी दिशा दाखवली. त्यांचा स्वभाव अत्यंत रोखठोक, साधा आणि मनमिळावू होता. भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष, प्रदेश परिषद सदस्य आणि राष्ट्रीय परिषद सदस्य यांसारख्या विविध जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वीपणे पार पाडल्या. सांगली अर्बन बँक कुर्डूवाडी शाखा सुरू करुन नावारूपाला आणली. किसान संघाच्या आंदोलनापासून ते अयोध्या आंदोलनापर्यंत अनेक सामाजिक व राष्ट्रीय चळवळींमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला.संघर्षाच्या काळात त्यांना सोलापूर जेलमध्ये कारावासही भोगावा लागला. अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे यांसारख्या देशपातळीवरील अनेक दिग्गजांशी त्यांचा जवळचा आणि आपुलकीचा संबंध होता.

त्यांच्या पश्चात मोठा मित्रपरिवार व स्नेहीजन आहेत. त्यांच्या निधनाने समाजकारणातील आधारस्तंभ हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.



## निंबर्गी येथे शासनाचे सर्व दाखले एकाच छताखाली

### श्री छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर -**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत आयोजित श्री छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर निंबर्गी येथे पार पडले. शिबिरात शेतकऱ्यांना व नागरिकांना शासनाचे सर्व दाखले एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आले. शिबिराचे उद्घाटन प्रगतीशील शेतकरी गंगाधर बिराजदार यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमास पोलीस पाटील राजकुमार बिराजदार व मंडल अधिकारी राणा वाघमारे आदी उपस्थित होते. निंबर्गीचे मंडळ अधिकारी राणा वाघमारे यांनी राज्य शासनाच्या निर्देशानुसार दक्षिण सोलापूर तालुक्यातील प्रत्येक मंडलात हे महाराजस्व समाधान शिबीर राबवले जात आहे. शिबिराचा मुख्य उद्देश नागरिकांना जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, ७/१२, ८-अ, फेरफार, ई-केवायसी यासारखे सर्व दाखले तात्काळ मिळावेत हा असल्याचे सांगितले. यावेळी शेकडो लाभार्थ्यांना विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आल्याचेही वाघमारे यांनी सांगितले.

शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शेकडो नागरिकांनी विविध दाखल्यांसाठी अर्ज केले. अनेकांना जागेवरच दाखले वाटप केले. यावेळी सहाय्यक कृषी अधिकारी अशोक राठोड, तलाठी राजेश विटेकर, गणेश भुजबळ, निंगु कोळी, भारत फरताडे, अनिल उमदी, किरण कौटुळे, धनराज साळवे, नेहा पवार, युसुफ शेख, किरण काटे आदींसह विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी दुष्काळ असल्यामुळे कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांचे सत्कार करण्यात आले नाहीत.

## सांगली जिल्ह्यातही डॉ.बी.पी. रोंगे यांना प्रतिसाद



### पुणे विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणूक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१७ ऑक्टोबर-**

पुणे विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तंत्रशिक्षणातील 'ज्ञानयात्री' म्हणून राज्यात ओळख झालेले स्वेरीचे डॉ. बी. पी. रोंग हे सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यातील शिक्षकांशी थेट संवाद साधत आहेत आणि त्याला प्रचंड प्रतिसाद लाभत आहे.

डॉ. बभ्रुवाहन पांडुरंग रोंगे हे शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर लक्ष केंद्रित करत असल्याचे पहायला मिळत आहे. ते गेल्या वर्षापासून पुणे विभाग मतदारसंघातील पाचही जिल्ह्यांतील शाळा व कॉलेजमधील पदाधिकारी व शिक्षकांना भेट देऊन त्यांच्या समस्या जाणून घेत आहेत. सध्याही त्यांनी शिक्षकांच्या प्रत्यक्ष भेटीवर भर दिला आहे. त्यांना पाचही जिल्ह्यांतील ५८ तालुक्यांतील शिक्षकांचा भक्कम प्रतिसाद मिळत आहे. मतदार नोंदणीपासून निवडणूकीच्या सर्व प्रक्रियांबाबत ते प्रत्येक शाळेत, प्रत्येक शिक्षकांना, संस्थाचालकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना भेट देवून चर्चा करत आहेत. या चर्चांना सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

गेल्या आठवड्यात मिरज तालुक्यातील आर. एम. हायस्कूल मिरज, आयडियल इंग्लिश स्कूल मिरज, मिरज महाविद्यालय मिरज, कन्या महाविद्यालय मिरज, विद्या प्रशाला मिरज, बळवंतराव मराठे विद्यालय मिरज, संजय भोकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट, विद्यादीप इंग्लिश स्कूल, न्यू इंग्लिश स्कूल कसबे डिग्रज, जुबली इंग्लिश स्कूल मिरज असे मिळून जवळपास २२ शाळा व महाविद्यालयांना भेटी देऊन डॉ. रोंगे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

आज शिक्षकांसमोर अनेक प्रश्न, अडचणी, समस्या आहेत. त्या सर्व शासन पातळीवर अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडण्यासाठी मी कटिबद्ध आहे. टीईटी, जुनी पेन्शन योजना अशा अनेक समस्या आहेत, त्यांचा मी बारकाईने अभ्यास केला आहे. उदासीनतेमुळे ते सुटलेले नाहीत. ते सोडविण्यासाठी कोठेही कमी पडणार नाही.' अशी ग्वाही डॉ.बी.पी. रोंगे यांनी यावेळी दिली.



### स्पर्धा परीक्षांतील यशासाठी चौफेर ज्ञान आवश्यक : जगदाळे

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ ऑक्टोबर -**

स्पर्धा परीक्षांमध्ये यशासाठी विद्यार्थ्यांनी इंग्रजी, मराठी, संवाद कौशल्ये, नीतिशास्त्र, सामान्य ज्ञान आदींचा अभ्यास करून चौफेर ज्ञान संपादन करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नंदन जगदाळे यांनी केले.

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम जयंतीनिमित्त श्री शिवाजी महाविद्यालयातील कर्मवीर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. बी. शेख, ग्रंथपाल एम. डी. टिपरसे, युवा उद्योजक प्रवीण कसपटे हे उपस्थित होते.

याप्रसंगी विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त ग्रंथांचे मोफत वाटप केले. माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांच्या कार्याचा परिचय करून दिला. एमपीएससीच्या परीक्षांच्या तयारीसाठी आवश्यक पुस्तके व तयारी याबाबत जगदाळे यांनी माहिती दिली. विविध परीक्षांमध्ये सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा यावेळी सत्कार झाला. कार्यक्रमाला युवा उद्योजक प्रवीण कसपटे यांची विशेष उपस्थिती होती. त्यांनी विद्यार्थ्यांना कृषी क्षेत्रांतील संधींबाबत माहिती दिली.

प्रा. विनायक जगताप यांनी स्पर्धा परीक्षेची पुस्तके महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना भेट दिली. निवृत्त मेजर वायकुळे आणि पांडुरंग कौलगे यांनी तांत्रिक सहकार्य केले. प्रास्ताविक व आभार केंद्राचे समन्वयक डॉ. राहुल पालके यांनी केले. याप्रसंगी सहाय्यक ग्रंथपाल घावटे, जयंत पवार, ग्रंथालयीन कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## मुख्यमंत्र्यांच्या निर्णयाचे चेतनसिंह केदार सावंतांकडून स्वागत

### अंमलबजावणीही पारदर्शक व वेळेत होण्याची अपेक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१७ ऑक्टोबर-**



दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने जाहीर केलेल्या ५ हजार रुपयांच्या अग्रिम अर्थसहाय्याच्या निर्णयाचे सोलापूर जि.प.शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार-सावंत यांनी स्वागत करत त्यांचे अभिनंदन केले आहे.

दुष्काळाच्या संकटामुळे शेतकरी आर्थिक अडचणींचा सामना करत असताना त्यांना आर्थिक आधार देण्याबरोबरच पिण्याच्या पाण्याचे नियोजन, जनावरांसाठी चारा उपलब्धता आणि शेतीशी संबंधित समस्यांवर प्रभावी उपाययोजना करणे गरजेचे आहे. सरकारच्या मदतीमुळे संकटग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळण्यास मदत होईल. तसेच केंद्र व राज्य सरकारच्या विविध कृषी योजनांच्या माध्यमातून शेतकरी कुटुंबांना आर्थिक आधार देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. पीएम किसान सन्मान निधी, नमो शेतकरी महासन्मान निधी, प्रधानमंत्री पीकविमा योजना आणि कृषी क्षेत्रासाठीच्या विविध सवलतींचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जाहीर केलेल्या अग्रिम अर्थसहाय्याची अंमलबजावणीही पारदर्शक आणि वेळेत व्हावी अशी अपेक्षा चेतनसिंह केदार-सावंत यांनी व्यक्त केली.

### शेतकरी हिताला प्राधान्य द्यावे

संकटग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळवून देणे, त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी पाठपुरावा करणे आणि ग्रामीण भागाला या परिस्थितीतून सावरण्यासाठी सहकार्य करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. दुष्काळाच्या प्रश्नावर राजकीय मतभेद बाजूला ठेवून शेतकरी हिताला प्राधान्य द्यावे, असे आवाहन चेतनसिंह केदार-सावंत यांनी केले.

## छायाचित्रातून...



सोलापूर : गणेश पेठ येथील हिंगुलांबिका मंदिरात शनिवारी देवीस सप्तश्रृंगी देवी रुपदर्शन करण्यात आला.



तामलवाडी : कटारे परिवारच्या श्रीमहालक्ष्मी मंदिरात देवीला गजलक्ष्मीचे रुप देण्यात आले होते.



सोलापूर : श्रीरुपाभवानी मंदिरात सातव्या माळेला श्री देवीस धान्याची आरास करण्यात आली होती.

# मतदार जरी सुशिक्षित असला तरी मतदानाची पध्दत किचकट

## ‘भाजपा’चे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत सोलापुरात घेण्यात आला मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

पदवीधर आणि शिक्षक मतदार संघासाठी बॅलेट पेपर अर्थात मतपत्रिकाद्वारे मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या दोन्ही मतदार संघासाठी पात्र मतदार जरी सुशिक्षित असला तरी मतदानाची पध्दत किचकट आहे. त्यामुळे मत बाद होऊ नये; यासाठी सूक्ष्म नियोजन करण्यात येत आहे. या अनुषंगाने विशेष बैठका घेण्यात येत आहेत, असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केले. सोलापूर येथील हॉटेल बालाजी सरोवर येथे आयोजित ‘महायुती’च्या संघटनात्मक आढावा बैठकीत व कार्यकर्ता संवाद मेळाव्यात ते बोलत होते.

‘महायुती’मध्ये कोणत्याही प्रकारचे मतभेद, मनभेद वा मिठाचा खडा नाही. संपूर्ण राज्यात आपण महायुती म्हणून आम्ही एकत्रितपणे पूर्ण ताकदीने लढत आहोत. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांच्या प्रमुख नेत्यांनी ही निवडणूक एकत्रितपणे लढवण्याचा निर्णय घेतला असून तो तळागाळातील कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचला आहे. पुणे पदवीधर मतदार संघातून डॉ.स्मिता जाधव तर शिक्षक मतदार संघातून कौस्तुभ गावडे यांना रिंगणात उतरविण्यात आले आहे. ‘महायुती’चा प्रत्येक कार्यकर्ता, मतदार आमच्या उमेदवारांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.



### स्थानिक नेतृत्वाची थोपटली पाठ

‘भाजपा’चे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सोलापूर जिल्ह्यातील निवडणूक तयारीबाबत समाधान व्यक्त करत, स्थानिक नेतृत्वाची पाठ थोपटली. जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे आणि त्यांच्यासोबत असणाऱ्या सर्व आमदारांनी मिळून या निवडणुकीचे अत्यंत उत्कृष्ट नियोजन केले आहे. ‘महायुती’च्या उमेदवारांचा विजय निश्चित आहे, असेही त्यांनी आवर्जून नमूद केले.

याप्रसंगी राज्याचे ग्रामविकास तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, ‘भाजपा’चे प्रदेश सरचिटणीसद्वय आ.निरंजन डावखरे, राजेश पांडे, प्रदेश सचिव राम सातपुते, आ.सुभाष देशमुख, आ.देवेंद्र कोठे, आ.सचिन कल्याणशेट्टी, महापौर विनायक कोंड्याल, भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, जिल्हाध्यक्षद्वय शशिकांत चव्हाण, चेतनसिंह केदार-सावंत, पुणे शिक्षक मतदारसंघातील उमेदवार कौस्तुभ गावडे यांच्यासह महायुतीचे अनेक आजी-माजी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी विविध पक्षाच्या अनेक पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी ‘भाजपा’मध्ये प्रवेश केला.

## गुजराती मित्र मंडळ संचलित महिला विभागाच्या वतीने २२ ऑक्टोबर पासून सखी संगम प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ ऑक्टोबर-**

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर श्री सोलापूर गुजराती मित्र मंडळ संचलित महिला विभागाच्या वतीने मुरारजी पेठेतील गुजराती भवन येथे गुरुवार, दि.२२ ऑक्टोबर आणि शुक्रवार, दि.२३ ऑक्टोबर २०२६ असे दोन दिवस दररोज सकाळी १० ते रात्री ८ यावेळेत सखी संगम प्रदर्शनचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती महिला विभागाच्या अध्यक्षा प्रीती शहा, सचिवा अर्पिता बक्षी यांनी दिली.

महिला उद्योजकांना आणि व्यावसायिकांना आपल्या उत्पादनांचे प्रदर्शन व विक्री करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करुन देणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. या प्रदर्शनात आकर्षक ज्वेलरी, आर्टिफिशियल ज्वेलरी, सोने-चांदीचे दागिने, ड्रेस, साड्या, ड्रेस मटेरियल, तोरण, रांगोळी साहित्य, विविध खाद्यपदार्थ, मुखवास तसेच इतर अनेक वस्तूंचा समावेश असणार आहे, असेही त्यांनी सांगितले.



सोलापूर : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त दैनिक तरुण भारतच्या वतीने काढण्यात आलेले विशेषांक माजी आमदार राम सातपुते, ‘भाजपा’चे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत, नगरसेवक गणेश वानकर, लेबर फेडरेशनचे शंकर चौगुले यांना देताना दै.‘तरुण भारत’चे जाहीरात विभाग प्रमुख मनोहर बायनी, मराठवाडा विभाग प्रमुख राजाराम मस्के, वरिष्ठ उपसंपादक अविनाश गायकवाड.

## ‘संभाजी आरमार’च्या वतीने मंगळवारी ‘दसरा दरबार’

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

विजयादशमीनिमित्त संभाजी आरमारच्यावतीने मंगळवार, दि.२० ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता डॉ.निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे ‘दसरा दरबार’चे आयोजन करण्यात आल्याची माहिती ‘संभाजी आरमार’चे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे, कार्याध्यक्ष तथा नगरसेवक शिवाजी वाघमोडे यांनी दिली.

या दरबारचे यंदाचे १९ वे वर्ष आहे. सोलापूर महानगपालिकेचे आयुक्त डॉ.सचिन ओंबासे यांच्या हस्ते, पोलिस उपायुक्त प्रीतम यावलकर, डॉ.वैशंपायन स्मृती वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.ऋत्विक जयकर, डॉ.श्रीकांत माकम, सोलापूर बार अशोसिएशनचे अध्यक्ष ॲड.संतोष पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत याचे उद्‌घाटन करण्यात येणार आहे.

प्लास्टिक जैव विघटनात अमूल्य संशोधन करणारे प्रा.डॉ. पंकज सुतकर, आस्था रोटी बँकेचे विजय छंचूरे, अभिनेता सोनू सूद यांच्या माध्यमातून सामाजिक काम करणारे विपुल मिरजकर, शिल्पकलेच्या माथ्यमातून सोलापूरचा लौकिक वाढविणारे शिल्पकार नितीन जाधव, आधुनिक जादूगार आदित्य कोडमुर आणि सोलापूर महानगरपालिका शाळा क्र.१० यांचा यावेळी सन्मान केला जाणार आहे.

‘वंदे मातरम : २५० वर्षांचा धगधगता इतिहास’ या विषयावर ज्येष्ठ पत्रकार सिध्दाराम पाटील यांचे व्याख्यान होणार आहे. सोलापूरकरांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहनही त्यांनी केले.

## बसस्थानकावरुन महिलेचे साडेतीन लाख रुपयांचे दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१७ ऑक्टोबर-**

बार्शी बसस्थानकावर बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेत चोरट्याने महिलेच्या पर्समधून जवळपास साडेतीन तोळ्याचे सोन्याचे दागिने चोरुन नेल्याची घटना घडली. याप्रकरणी सुलताना शहाजहान मोगल (वय-५०, रा.कात्रज, पुणे) यांनी बार्शी शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

सुलताना मोगल या पती शहाजहान आणि नातू आराफ यांच्यासह नातेवाइकांना भेटण्यासाठी कुर्डुवाडी येथे जाण्याकरिता गुरुवारी सायंकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास बार्शी बसस्थानकावर आल्या होत्या. यावेळी यावल ते पंढरपूर जाणारी बस आल्यानंतर त्या कुटुंबीयांसह बसमध्ये चढल्या. बसच्या आसनावर बसल्यानंतर त्यांच्या पर्सची चैन उघडी असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी पर्स तपासून पाहिले असता सोन्याचे गंठण आणि कानातील दागिने दिसून आले नाही, असे फिर्यादीत नमूद आहे.

## नगरसेविका वहिदाबानू शेख यांच्या विरोधातील याचिका न्यायालयाने फेटाळली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ ऑक्टोबर-**

सोलापूर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १४ (क) च्या नगरसेविका वहिदाबानू काशीमसाब शेख यांच्या निवडणुकीला आव्हान देणारी रिट याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचने फेटाळून लावली आहे. याप्रकरणी याचिकाकर्त्याला ‘इलेक्शन पिटीशन’ दाखल करण्याचा कायदेशीर मार्ग उपलब्ध असल्याने उच्च न्यायालयाने रिट याचिकेत हस्तक्षेप करण्यास नकार दिला.

नगरसेविका वहिदाबानू काशीमसाब शेख यांनी केलेल्या अनधिकृत बांधकामाच्या मुद्दयावरुन याकुब इसाक शेख यांनी उच्च न्यायालय, मुंबई सर्किट बेंच कोल्हापूर येथे याचिका दाखल करत नगरसेविका वहिदाबानू शेख यांच्या निवडणुकीला आणि पात्रतेला आव्हान दिले होते. मात्र, न्यायालयाच्या निदर्शनास आले की, संबंधित नोटीस ही थेट प्रतिवादींना बजावण्यात आलेली नव्हती, तर भारतीय महिला विकास मंच, सोलापूर या संस्थेला पाठवण्यात आली होती.

या प्रकरणावर सुनावणी करताना उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, कायदा व नियमांनुसार याचिकाकर्त्यांकडे निवडणूक याचिका (Election Petition) दाखल करण्याचा कायदेशीर उपाय उपलब्ध आहे. त्यामुळे या प्रकरणात रिट अधिकारक्षेत्रांतर्गत हस्तक्षेप करण्याचे कोणतेही कारण नसून, उच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली.

या प्रकरणात नगरसेविका वहिदाबानू शेख यांच्या वतीने ॲड.श्रीशैल साखरे, याचिकाकर्ते याकुब इसाक शेख यांच्यातर्फे ॲड.मोहम्मद मुल्ला तर सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने ॲड.विश्वनाथ पाटील यांनी काम पाहिले.

# रुपाभवानी मंदिरात देवीभक्तांनी गिरविले आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

## स्वयंसेवकांना देण्यात आले सीपीआर प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

आंतरराष्ट्रीय आपत्ती जोखीम निवारण दिनानिमित्त फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेच्या वतीने श्रीरुपाभवानी मंदिर परिसरात आपत्ती व्यवस्थापनाबाबत प्रबोधन व प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. नवरात्रोत्सवासाठी मोठ्या संख्येने येणाऱ्या देवीभक्तांना आपत्तीच्या प्रसंगी घ्यावयाची काळजी, गर्दीचे व्यवस्थापन आणि आपत्कालीन परिस्थितीत करावयाच्या उपाययोजनांची माहिती यावेळी देण्यात आली.

पोलिस निरीक्षक सचिन यादव यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा.डॉ.श्रीकांत येळेगावकर अध्यक्षस्थानी होते. यावेळी नगरसेवक विनायक विटकर, स्वीकृत नगरसेवक ज्ञानेश्वर म्याकल, रुपाभवानी मंदिर समितीचे ट्रस्टी तथा पुजारी मल्लिनाथ मसरे, पोलिस निरीक्षक विजय खोमणे, सहाय्यक पोलिस निरीक्षक नागेश येणपे, सागर बामणे, गणेश इंगळे, राधा जेऊघाले आदी उपस्थित होते.

पोलिस निरीक्षक खोमणे म्हणाले, रुपाभवानी मंदिरात नवरात्रोत्सवादरम्यान सोलापूर शहर व जिल्ह्यासह तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि कर्नाटक या राज्यांतून लाखो भाविक दर्शनासाठी येतात. या गर्दीचे नियंत्रण करणे पोलिसांसाठी आव्हानात्मक असते. एखादी अफवा किंवा गैरसमज मोठ्या आपत्तीला कारणीभूत ठरू शकतो. मांढरदेवी येथील चेंगराचेंगरीची घटना याचे गंभीर उदाहरण आहे. त्यामुळे भाविकांमध्येआपत्तीव्यवस्थापनाबाबतजागरूकता निर्माण करणे आणि प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे प्रशिक्षण देणे महत्त्वाचे आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाशी संबंधित आपदा मित्र रामचंद्र वाघमारे व बजरंग व्हटकर यांनी आपत्तीच्या वेळी घ्यावयाची खबरदारी, गर्दीचे व्यवस्थापन आणि बचावकार्य याबाबत मार्गदर्शन केले. मंदिर परिसरात कार्यरत असलेल्या स्वयंसेवकांना हृदयविकार किंवा अन्य आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत करता यावी, यासाठी सीपीआर (हृदय-फुफ्फुस पुनरुज्जीवन) प्रशिक्षणही देण्यात आले.

प्रा.डॉ. येळेगावकर म्हणाले, आपत्ती सांगून येत नाही. त्यामुळे अशा परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी स्वयंसेवकांनी सदैव सज्ज असणे आवश्यक आहे. आपत्ती घडल्यानंतर उपाययोजना करण्याबरोबरच ती टाळण्यासाठी योग्य पूर्वनियोजन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. या कार्यक्रमाचा हजारो भाविक व स्वयंसेवकांनी लाभ घेतला. शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आकाश गायकवाड यांनी तर आभारप्रदर्शन गीतगंगा सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष व्यंकटेश कंची यांनी केले.

कार्यक्रमास विविध सामाजिक संस्था, आरोग्य विभाग, वैद्यकीय क्षेत्र, महाविद्यालयांचे राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि स्वयंसेवी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यामध्ये गीतगंगा सोशल फाउंडेशन, सारथी यूथ फाउंडेशन, सखी वन स्टॉप सेंटर, रोटरी क्लब ऑफ सोलापूर, सोलापूर महानगरपालिका आरोग्य विभाग, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, डॉ. हेडगेवार रक्तपेढी, जिज्ञासा महानगर, नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन, निमा वुमेन्स फोरम, दयानंद कला व विज्ञान महाविद्यालयाचा एनएसएस विभाग, वालचंद महाविद्यालयाचा समाजकार्य विभाग, हिंदू एकता मंच, विश्व हिंदू महासंघ आणि अथर्व ज्ञानपीठ प्रतिष्ठान, कोल्हापूर आदी संस्थांचा सहभाग होता.

# पशुधनाची किमान संख्या असण्याची अट शिथिल

## दुष्काळग्रस्त भागातील पशुपालकांसाठी दिलासा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ ऑक्टोबर-**

सन २०२६-२७ मध्ये कमी पर्जन्यमानामुळे दुष्काळी परिस्थिती जाहीर झालेल्या राज्यातील ३०४ तालुक्यांतील पशुपालकांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने ‘मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने’च्या अटी शिथिल केल्या आहेत. चारा टंचाईवर मात करण्यासाठी या योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभार्थी, शेतकरी गटांना अतिरिक्त चारा बियाणे व ठोंबे वाटप करण्यास मान्यता देण्यात आली आहे.



या योजनेसंदर्भात दि.९ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार, वैयक्तिक लाभार्थ्याकडे स्वतःचे किमान तीन ते चार पशुधन असणे आवश्यक होते. मात्र, दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन ही किमान पशुधनाची अट चालू वर्षासाठी शिथिल करण्यात आली आहे. ही सवलत केवळ २०२६-२७ या वर्षासाठी लागू राहणार आहे, असे सांगण्यात आले.

वैयक्तिक लाभार्थ्यांना एक हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत १०० टक्के अनुदानावर चार हजार रुपये किमतीचे चारा बियाणे देण्यात येते. संबंधित लाभार्थ्याकडे चारा उत्पादनासाठी पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असल्यास आणि प्रथमच लाभ मागणाऱ्या नवीन अर्जदारांची मागणी प्रलंबित नसल्यास, एकापेक्षा अधिक वेळा लाभ देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

शेतकरी समूह किंवा गटांना पाच हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत १०० टक्के अनुदानावर २० हजार रुपये किमतीचे चारा बियाणे देण्यात येते. चारा उत्पादनासाठी पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असलेल्या गटांना, प्रथमच लाभ मागणाऱ्या अर्जदारांची मागणी पूर्ण झाल्यानंतर, उपलब्धतेनुसार एकापेक्षा अधिक वेळा बियाणे वाटप करता येणार आहे.

सध्याची दुष्काळी परिस्थिती विचारात घेऊन चारा उत्पादनासाठी आवश्यक पाणीसाठा उपलब्ध असल्याची खातरजमा केल्यानंतर अतिरिक्त लाभ देण्याची सवलत देण्यात आली आहे. यासाठी संबंधित उपायुक्त पशुसंवर्धन यांनी पाणीसाठा उपलब्ध असल्याचे प्रमाणित करणे आवश्यक आहे. प्रथमच लाभ घेऊ इच्छिणाऱ्या नवीन अर्जदारांची मागणी प्रलंबित नसल्याची खात्री करण्याचे निर्देश जिल्हा व विभागीय कार्यालयांना देण्यात आले आहेत, असे पशुसंवर्धन आयुक्त डॉ.किरण पाटील यांनी सांगितले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



दसरा, दिवाळीनिमित्त
यल्लम्मा हॅण्डलूम
20% पर्यंत सूट
विविध कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलचे एकमेव परिपूर्ण दालन
शाखा नं.१ : मार्कंडेय सहकारी रुग्णालय रोड, सोलापूर. मो.9371289887
शाखा नं.२ : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर. मो.९३७२३५१८६०

## ▶▶ आज शहर-जिल्ह्यात

### ✻ धार्मिक कार्यक्रम

उत्तर कसबा, भोगडे गल्ली येथील श्री कसबा देवी देवस्थान नवरात्र महोत्सव मंडळाच्या वतीने देवीची सरस्वती माता अवतारात पूजा, कुंकूमार्चन. सायंकाळी ५ वाजता.

### ✻ रुक्मिणी नवरात्री संगीत महोत्सव

**पंढरपूर :** श्रीविठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने सायंकाळी ४ वाजता 'नवरस नृत्यांजली', रात्री ७.३० वाजता लक्ष्मी बडवे यांच्या मार्गदर्शनाखाली 'शक्ती जागर' कार्यक्रम.

# 'हॉटेल्स'मधील अन्नपदार्थांमध्ये खाद्यरंगांच्या वापरावर निर्बंध

### दुधासाठी प्लॅस्टिक कॅनचा वापर टाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ ऑक्टोबर-**

हॉटेल, रेस्टॉरंट, चायनीज सेंटर, बिर्याणी सेंटर्समधील तयार अन्नपदार्थांमध्ये खाद्यरंगांच्या वापरावर निर्बंध घालण्यात आले आहे. ग्राहकांच्या आरोग्याचा विचार करुन विक्रेत्यांनी तयार अन्नपदार्थांमध्ये अनावश्यक खाद्यरंगांचा वापर करु नये. एखादया ठिकाणी असे आढळून आल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा अन्न औषध प्रशासनचे सहाय्यक आयुक्त साहेबराव देसाई यांनी दिला.

विशिष्ट परवानगी असलेल्या स्वीट व बेकरीज्च्या अन्नपदार्थांमध्ये मर्यादित प्रमाणातच खाद्यरंग वापरण्यास परवानगी आहे. काही खाद्यपदार्थांसाठी ही मर्यादा १०० पीपीएमपर्यंत असू शकते. मात्र, संबंधित अन्नपदार्थासाठी लागू असलेले नियम आणि मानके पाळणे आवश्यक आहे.



नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित व निर्भेळ अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत या उद्देशाने सदर नियम करण्यात आले.

दूध वाहतुकीसाठी प्लॅस्टिकच्या कॅनचा वापर केल्यामुळे प्लॅस्टिकमधील काही घटक दुधात मिसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मानवी आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो. दूध वाहतुकीदरम्यान आवश्यक तापमान राखले गेले नाही, तर दूध खराब होण्याची शक्यता असते. त्यामुळे प्लॅस्टिकच्या कॅनऐवजी स्टेनलेस स्टीलच्या कॅनचा वापर करण्यात यावा, असेही त्यांनी सांगितले.

### शाळेच्या ५० मीटर परिसरात जंक फूडची विक्री

लहान मुलांच्या आरोग्याच्या दृष्टींने शाळेच्या प्रवेशद्वारापासून ५० मीटर परिसरात साखर, मीठ आणि तेलाचे प्रमाण जास्त असलेल्या खाद्यपदार्थांच्या उत्पादन व विक्रीवर मनाई करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होऊ नये; यासाठी संबंधित व्यावसायिकांनी शाळेच्या परिसरात अशा खाद्यपदार्थांची विक्री करु नये, असे आवाहनही त्यांनी केले.

## आजचा कलर जांभळा



ईश्वरी सुकन्या गणेशराम तारे



प्रिशा पल्लवी शिवशरण नागसेन

## 'जागृती'ची ऋतुजा श्रीमंगले दुहेरी मुकुटाची मानकरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ ऑक्टोबर-**



नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर झालेल्या शालेय शहर मैदानी स्पर्धेत येथील जागृती विद्यामंदीरच्या ऋतुजा ब्रह्मदेव श्रीमंगले हिने १४ वर्षांखालील गटात २०० मीटर आणि ४०० मीटर धावण्याच्या शर्यतीत प्रथम क्रमांक पटकावित दुहेरी मुकुट संपादिला. तिला श्री विराट अकॅडमीचे सूर्याजी व भारती लंगडे तसेच जागृतीचे क्रीडा शिक्षक संतोष जाधव आणि मुख्याध्यापक विजयरत्न चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. ऋतुजाला तिचे वडील ब्रम्हदेव श्रीमंगले यांनी वयाच्या तिसऱ्या वर्षापासून नेहरूनगर शासीकय मैदानावर घेऊन सराव घेतला. ते स्वतः तिच्यासोबत धावायचे. ऋतुजाच्या या यशामुळे तिच्या शाळेच्या आणि अकॅडमीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

## अस्तित्वात नसलेल्या, दुबार नोंदींच्या मालमत्तांचा कर निर्लेखित : डॉ.ओम्बासे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ ऑक्टोबर-**

सन २०२५-२६ मध्ये केलेल्या सर्वेक्षणादरम्यान अस्तित्वात नसलेल्या, दुबार नोंद असलेल्या मालमत्तांवरील वसूल न होणारा कर नियमानुसार निर्लेखित करण्यात आली आहे. एखादी अस्तित्वात असलेली मालमत्ता अनवधानाने निर्लेखित झाल्याचे आढळल्यास संबंधित थकबाकीसह ती पुन्हा अभिलेखात समाविष्ट करण्याची तरतूद आहे, असे महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी सांगितले.

महानगरपालिकेच्या अभिलेखांमध्ये काही मालमत्ता अस्तित्वात नसतानाही



किंवा त्यांची दुबार नोंद असल्याने त्यांच्यावरील कराची थकबाकी दरवर्षी वाढत होती. प्रत्यक्षात वसूल होऊ न शकणाऱ्या या थकबाकीमुळे मालमत्ता कराची एकूण आकडेवारी फुगलेली दिसत होती. त्यामुळे अभिलेखांतील नोंदींची पडताळणी करुन अशा मालमत्तांवरील कर निर्लेखित करण्याची कार्यवाही करण्यात आली.

निर्लेखित करण्यात आलेल्या मालमत्तांच्या यादीबाबत किंवा एखाद्या मालमत्तेच्या अस्तित्वाबाबत हरकत असल्यास आवश्यक कागदपत्रे व पुराव्यांसह आयुक्त कार्यालय, उपायुक्त (मालमत्ता कर) कार्यालय किंवा smcroertytax@gmail.com आणि solaurcororation.gor.in या ई-मेलवर दि.१७ नोव्हेंबर २०२६ पर्यंत तक्रार नोंदविता येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

## समर्थ बँक निवडणुकीसाठी आज मतदान, उद्या मतमोजणी

**सोलापूर,दि.१७ ऑक्टोबर-**

समर्थ सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी रविवार, दि. १८ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ यावेळेत एकूण १२ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. यात सोलापुरातील ६ आणि पुणे, ठाणे, पंढरपूर, कोल्हापूर येथील प्रत्येकी एका मतदान केंद्राचा समावेश आहे. सोमवार, दि.१९ ऑक्टोबर २०२६ रोजी डफरीन चौक येथील सारस्वत मंगल कार्यालय येथे मतमोजणी करण्यात येणार आहे. मतदानादिवशी एक अधिकारी आणि दोन कर्मचाऱ्यांची मागणी करण्यात आली आहे. मतमोजणी केंद्रावर मतपेट्या असल्याने दोन सशस्त्र पोलिसांचा बंदोबस्त राहणार आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक मुकुंद पवार यांनी दिली आहे.

## कर्नाटकच्या मिल मालकाने सोलापूरच्या कापड व्यापाऱ्याला घातला गंडा

### ८.८० लाखांची ऑनलाईन फसवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ ऑक्टोबर-**

ठरल्याप्रमाणे माल न पाठवता सोलापुरातील एका कापड व्यापाऱ्याची तब्बल ८ लाख ८० हजार १७३ रुपयांची ऑनलाइन आर्थिक फसवणूक करण्यात आली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात कर्नाटक येथील एका मिल मालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

श्री अंजनिया कॉटन्स मिल प्रा.लि., कर्नाटकचे प्रोपरायटर प्रसाद अथणी (रा. कर्नाटक) असे त्याचे नाव आहे. याबाबत राहुल राजगोपाल चंडक (रा. नाकोडा रेसी, झंवर मळा, सोलापूर) यांनी फिर्याद दिली. यातील फिर्यादी राहुल चंडक आणि आरोपी प्रसाद अथणी यांची पूर्वीपासून व्यावसायिक ओळख होती. या ओळखीमुळे त्यांच्यात नेहमीच कपड्यांच्या मालाची खरेदी-विक्री आणि आर्थिक व्यवहार होत असत. प्रसाद अथणी याने चंडक यांना व्यावसायिक कारणासाठी मालाचा पुरवठा करण्याचे आश्वासन दिले. या व्यवहारापोटी चंडक यांनी आरोपीला ऑनलाइन माध्यमातून एकूण ८ लाख ८० हजार १७३ रुपये पाठवले. मात्र, खात्यात रक्कम जमा झाल्यानंतर आरोपीने ठरल्याप्रमाणे मालाचा पुरवठा केलाच नाही. माल का आला नाही? याची विचारणा करण्यासाठी चंडक यांनी आरोपीकडे वारंवार तगादा लावला. माल पाठवणे शक्य नसेल तर आपले पैसे तरी परत द्यावेत, अशी मागणी त्यांनी केली. मात्र, आरोपीने उडवाउडवीची उत्तरे देत पैसे परत देण्यास टाळाटाळ केली. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर, राहुल चंडक यांनी पोलिसात धाव घेऊन तक्रार दिली.

## माधवनगरात उद्या ब्रतुकम्मा महोत्सव

### श्री साईराम सेवा सांस्कृतिक मंडळाचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ ऑक्टोबर-**



तेलुगु संस्कृतीचे यथार्थ दर्शन घडविणाऱ्या आणि तेलुगुभाषिक महिलांच्या दृष्टीने आनंददायी सण म्हणून ब्रतुकम्मा सणाकडे पाहिले जाते. तेलंगणा, आंध्र प्रदेश या राज्यात हा सण भक्तीमय वातावरणात आणि मोठ्या उत्साहात साजरी करतात. सोलापूरसह परिसरातील तेलुगू भाषिक समाजाचे तेलंगणाशी सांस्कृतिक नाते आहे. ही बाब लक्षात घेऊन येथील श्री साईराम सेवा सांस्कृतिक मंडळाच्या वतीने सोमवार, दि.१९ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता माधवनगर येथील श्रीसाईबाबा मंदिर येथे ब्रतुकम्मा महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती माधवी अंदे व नंदिनी कोंडूर यांनी पत्रपरिषदेत दिली.

'ब्रतुकम्मा' या शब्दाचा अर्थ 'जिवंत राहा, फुला-फळा' असा होतो. विविध रंगांच्या फुलांची आकर्षक रचना करुन तिची पूजा करणे, पारंपरिक गीते म्हणत फेर धरुन नृत्य करणे अशी या उत्सवाची वैशिष्ट्ये आहेत. निसर्ग, फुले आणि मातृशक्तीचा सन्मान करणाऱ्या या सणातून तेलुगू संस्कृतीचे दर्शन घडते. श्री साईराम सेवा सांस्कृतिक मंडळाच्या वतीने सन २०१२ पासून या महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. यंदा सुमारे ५०० महिला सहभागी होणार आहेत. सहभागी प्रत्येक महिलेला भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात येते, असेही त्यांनी सांगितले. यावेळी अश्विनी चाटला, सविता गजरे, शालिनी जल्ला, विजयालक्ष्मी कोळा उपस्थित होते.

### विसर्जनासाठी कृत्रिम कुंड

ब्रतुकम्माचे नदी किंवा तलावात विसर्जन करण्याची परंपरा आहे. मात्र, शहरी भागात विसर्जनासाठी दूर जावे लागू नये आणि पर्यावरणाचे संरक्षण व्हावे, यासाठी मंडळाच्या वतीने कायमस्वरुपी कृत्रिम विसर्जन कुंड तयार करण्यात आले आहे, असेही त्यांनी सांगितले.

**नारी तू नारायणी**
**आरती कुसेकर**

## शिक्षण क्षेत्रातून स्त्री शक्तीचा जागर



अपर्णा कुलकर्णी

गेल्या २८ वर्षांपासून मी शिक्षण क्षेत्रात कार्यरत असून, विद्यार्थ्यांसाठी काम करायच्या आवडीमुळे या क्षेत्राची जाणीवपूर्वक निवड केली, अशा शब्दांत इंडियन मॉडेल स्कूल (सीबीएसई)च्या मुख्याध्यापिका अपर्णा संतोष कुलकर्णी यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल घडवणे आणि त्यांच्यात स्वयंशिस्त निर्माण करून त्यांचा सर्वांगीण विकास साधणे, हाच त्यांच्या आयुष्याचा ध्यास आहे. या कार्यात त्यांना संस्था सचिव अमोल जोशी, सायली जोशी आणि कुटुंबीयांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे. विविध क्षेत्रांत उत्तुंग भरारी घेताना स्त्रिया आपल्या रूढी-परंपरा मनापासून जपत आहेत आणि हा समृध्द वारसा पुढील पिढीकडे सोपवण्याची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडत आहेत, हाच खऱ्या अर्थाने स्त्रीत्वाचा जागर आहे, असा विश्वास त्या नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने व्यक्त करतात.

नवरात्रोत्सवाचे महत्त्व सांगताना अपर्णा कुलकर्णी म्हणतात, नवरात्र म्हणजे सत्याचा असत्यावर आणि चांगुलपणाचा दुष्ट प्रवृत्तींवर मिळवलेला विजय. आदिशक्तीची उपासना आपल्यातील नकारात्मक ऊर्जा दूर करून आपल्याला सकारात्मकतेकडे नेते. तिच्या कृपेने आपण आयुष्यात विविध टप्प्यांवर यश मिळवून विजयादशमी साजरी करतो. त्यांच्या मते, नवरात्र हा केवळ एक धार्मिक विधी नसून तो स्त्री शक्तीचा, तिच्यातील अगाध सामर्थ्याचा, चिकाटीचा आणि चैतन्याचा सन्मान करणारा उत्सव आहे. मातृत्वाच्या प्रेमापासून ते दुष्टांचा नाश करणाऱ्या दुर्गेपर्यंतची नऊ रूपे या आदिशक्तीमध्ये सामावलेली आहेत. मातेच्या ममतेने जिथे गरज आहे तिथे मदत केलीच पाहिजे, पण त्याच वेळी समाजातील विकृतींचा संहार करण्यासाठी काली बनून उभे ठाकले पाहिजे, हीच शिकवण आपल्याला मिळते, असे त्या ठामपणे सांगतात. आज स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात कौतुकास्पद यश मिळवत आहेत. मात्र, त्यासोबतच त्यांनी स्वसंरक्षणाचे धडे गिरवणे आणि आपल्या अंगभूत बलस्थानांची ओळख करून घेणे गरजेचे आहे. तरच त्या इतर स्त्रियांनाही सक्षम करू शकतील.

## बँकिंग क्षेत्रातील धडाडीचे नेतृत्व



शोभा मोरे

बँकिंग क्षेत्रातील आपल्या कर्तृत्वाने सोलापूरच्या अर्थकारणाला दिशा देणाऱ्या आणि महिला सक्षमीकरणाचा पाया रचणाऱ्या धडाडीच्या स्त्री नेत्या म्हणजे मनोरमा सखी मंचच्या अध्यक्षा शोभा मोरे. वडील प्राथमिक शिक्षक आणि आई व्यावसायिक असल्याने शोभाताईंना बालपणापासूनच शिक्षणाचे आणि स्वावलंबनाचे उत्तम वातावरण मिळाले. त्यांनी बीएस्सी आणि एमबीए पदवी घेतल्यानंतर बँकिंग क्षेत्रातील परीक्षा उत्तीर्ण होऊन १९८३ मध्ये बँक ऑफ महाराष्ट्र (पुणे) येथे सेवा सुरू केली.

१९८५ मध्ये विवाहानंतर त्या सोलापूरला स्थायिक झाल्या. सासरे शिक्षणाधिकारी असल्याने सासरीही शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य होते. शोभाताईंच्या मते, आजी, आई, मुलगी आणि पत्नी हीच खरी साडेतीन शक्तिपीठे आहेत आणि त्यांना आदराची वागणूक मिळायला हवी. महिलांमध्ये बचतीची सवय असावी, हा धडा त्यांनी लहानपणी आईकडून अवघ्या दोन रुपयांच्या बचतीतून शिकला.

महिलांना आर्थिक, सामाजिक आणि आरोग्यादृष्ट्या सक्षम करण्यासाठी त्यांनी १९९७ मध्ये मनोरमा सखी मंचची स्थापना केली. त्या काळात महिलांची बँकांमध्ये खातीही नसत. मनोरमा परिवाराने अर्थकारणासोबतच साहित्य, कला आणि क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. पुरुषांपेक्षा महिलांमध्ये काटकसर आणि नियोजनाचा अनुभव जास्त असतो, मात्र गुंतवणुकीच्या ज्ञानाअभावी त्यांना पुरुषांवर अवलंबून राहावे लागते. हे चित्र बदलण्यासाठी सखी मंचच्या मार्गदर्शन शिबिरांद्वारे महिलांना आर्थिक नियोजनाचे धडे दिले जातात.

बँकिंग क्षेत्रातील महत्त्वाच्या पदांवर काम करणाऱ्या शोभाताई सारख्या खंबीर स्त्री नेतृत्वामुळेच आज सोलापूरच्या अर्थकारणाचा पाया भक्कम झाला आहे. बचत गटांपासून ते बँका आणि मल्टीस्टेट संस्थांपर्यंत निर्माण झालेले हे महिला राज खऱ्या अर्थाने स्त्री-शक्तीच्या सक्षमीकरणाची नांदी ठरले आहे. महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी मनोरमा मल्टीस्टेट बँक सातत्याने प्रयत्नशील आहे. बँकेतर्फे महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी शेळीपालन, शिवणकाम आणि विविध लघुउद्योगांसाठी सुलभ कर्ज पुरवठा केला जातो. महिलांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊन स्वतःच्या पायावर उभे राहावे, असा संदेश नवरात्रोत्सवानिमित्त त्यांनी सर्व महिलांना दिला.

## सक्षमीकरण म्हणजे केवळ आर्थिक स्थैर्य नव्हे



आशा कोंढरे

नवरात्रोत्सव सण हा पूर्वी कौटुंबिक भक्ती आणि घटस्थापनेपुरता मर्यादित होता, पण आज त्याला व्यापक सामाजिक स्वरूप प्राप्त झाले आहे. रूप बदलले तरी भक्तीची मूळ भावना आणि स्त्री-शक्तीचा आदर आजही कायम आहे. याच उत्सवाचे औचित्य साधत कोंढारे ज्वेलर्सच्या माध्यमातून व्यवसायात स्वतःची ओळख निर्माण करणाऱ्या बार्शी येथील यशस्वी उद्योजिका आशा आप्पासाहेब कोंढारे यांनी महिला सक्षमीकरणावर विचार व्यक्त केले. त्यांच्या मते, सक्षमीकरण म्हणजे केवळ आर्थिक स्थैर्य नव्हे, तर स्वतःचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य, समाजात ओळख निर्माण करण्याचा आत्मविश्वास मिळणे होय. शिक्षण, कौशल्य आणि आत्मविश्वास ही या प्रवासातील मुख्य पावले आहेत.

महिलांमध्ये आद्यशक्तीचा वास असून कुटुंब सांभाळताना त्यांनी स्वतःच्या स्वप्नांचा बळी देऊ नये. एक महिला सक्षम झाली तर संपूर्ण कुटुंब आणि समाज सक्षम होईल, हाच खरा नवरात्रीचा संदेश आहे. महिलांनी आयुष्यात एक ध्येय निश्चित करून ते साध्य करण्यासाठी प्रामाणिकपणे व सातत्याने प्रयत्न करावेत, असा प्रेरणादायी संदेश त्यांनी दिला. 'कोंढारे ज्वेलर्स'च्या माध्यमातून महिलांना रोजगाराभिमुख शिक्षण आणि स्वयंरोजगाराचे धडे देण्यास आम्ही कटिबध्द आहोत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**संकलन**
**प्रभाकर क्षीरसागर**

## दुग्ध व्यवसायातून उभा केला स्वावलंबनाचा आदर्श



लक्ष्मी मोरे

स्त्रीने मनात पक्के ठरवले, तर कोणतीही परिस्थिती तिला रोखू शकत नाही, याचंच मूर्तिमंत उदाहरण म्हणजे मानेगाव (ता.बार्शी) येथील एकता महिला मंचच्या सदस्या लक्ष्मी मोरे.

एका काळी लक्ष्मी मोरे यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट होती. घरखर्च आणि मुलांच्या शिक्षणाची चिंता यामुळे अनेक रात्री त्यांनी जागून काढल्या. पण संकटांपुढे शरण न जाता, त्यांनी जिद्दीने दुग्ध व्यवसाय सुरू केला. गेल्या १५ वर्षांपासून त्या अत्यंत प्रामाणिकपणे शुध्द आणि उच्च दर्जाचे दूध व दुग्धजन्य पदार्थ ग्राहकांपर्यंत पोहोचवत आहेत.

सध्या त्यांच्याकडे दोन म्हशी, एक गीर गाय आणि चार शेळ्या आहेत. प्राण्यांचे आरोग्य, लसीकरण आणि योग्य पोषणाची विशेष काळजी घेत त्या दररोज सरासरी सात लीटर ताज्या दुधाचे उत्पादन करतात. याशिवाय, सेंद्रिय शेतीला चालना देण्यासाठी त्या उच्च दर्जाचे शेणखतही उपलब्ध करून देतात. कठीण प्रसंगात कुटुंब आणि एकता महिला मंचचे संस्थापक प्रभाकर क्षीरसागर यांचे मोठे बळ मिळाले, असे लक्ष्मीताई सांगतात. जीवनात कितीही संघर्ष आला तरी खचून न जाता जिद्दीने मार्ग काढावा, यश नक्कीच मिळते, हा त्यांचा संदेश इतर महिलांसाठी खरोखरच प्रेरणादायी आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी -१५६८

**देखा बालकाचिया धणी धाईजे।**
**कां शिष्याचेनि जाहलेपणें होईजे।।**
**हें सद्गुरुचि एकलेनि जाणिजे। का प्रसवतिया।।**

अर्जुनाला, भगवान श्रीकृष्ण अवघड पण महत्वपुर्ण असे विषय समजावून सांगत आहेत. अर्जुन एकाग्र मनाने ऐकत असल्याने त्याला हे अवघड विषय समजत आहेत. अर्जुनाला सर्व विषय समजत असल्याचे भगवंतांच्या लक्षात आल्याने भगवंतांना आनंद वाटत आहे. आपण एखादा विषय जीव तोडून समोरच्याला पुन्हा-पुन्हा सांगीतला आणि त्याला जर तो विषय ध्यान न दिल्यामुळे समजत नसेल तर आपणाला वाईट वाटते. पण आपण सांगत असलेला विषय जर समोरच्याला समजत असल्याचे आपल्या लक्षात आले तर आपणाला आनंद होतो.



हा आनंद केवळ वक्ताच समजू शकतो. श्रीकृष्णाचे अवघड विषय अर्जुनाला समजत आहेत. त्यामुळे श्रीकृष्णांना कसा आंनद वाटत आहे, हे सांगतांना माऊली म्हणतात, **देखा बालकाचिया धणी धाईजे। कां शिष्याचेनि जाहलेपणें होईजे।।हें सद्गुरुचि एकलेनि जाणिजे। का प्रसवतिया।।**

अर्थात, लहान बालकाच्या संतोषाने आईला आनंद वाटतो किंवा शिष्य कृतार्थ झाल्याने आपण किती कृतार्थ झालो याचा आनंद फक्त सद्गुरुच जाणू शकतात. प्रेमाचा, आनंदाचा, विश्वासाचा विषय समजून सांगायचा झाला की, माऊली स्त्रीचे म्हणजे आईचे उदाहरण घेत असतात. ज्ञानदेव सुध्दा ममत्वाची, प्रेमाची, मुर्ती असल्याने सर्व भक्त त्यांना स्त्रीलिंगी शब्दाने हाक मारताना माऊली असे म्हणतात.

भगवंत अर्जुनाला ज्ञानी माणसाबद्यल बोलत आहेत. ज्ञानी माणूस जीवनभर किंवा मृत्यूसमयीसुध्दा द्वैत पाळत नाही. मी आणि संपूर्ण विश्व ब्रम्ह आहे असे तो मानतो. जिवंतपणी ज्या शरीरात मी शिल्लक नाही, तेथे मृत्यू समयी शरीराचा मोह निर्माण होण्याचे कारणच नाही. मृत्यूसमयी ज्ञानी व्यक्तिला अजिबात दु:ख वाटत नाही. अथांग पाण्यात घट (मडके) बुडाला, तर तो आतून-बाहेरुन पाण्याने भरला जातो आणि योगायोगाने तो पाण्यातच फुटला तर त्यातील पाणी फुटण्याचे कारण नाही. कारण आत बाहेर फक्त पाणीच असते. अगदी ज्ञानी व्यक्ति स्वत:ला विश्वरुप समजत असल्याने त्याला आपण कोणीतरी वेगळे आहोत याची जाणच नसते. त्याच्यावजळ आप-पर हा भेदच शिल्लक नसतो. मनुष्य जागेपणी ज्या गोष्टीचे सतत चिंतन करतो, तीच गोष्ट त्याला स्वप्नात दिसते. त्या प्रमाणे ज्ञानी रांत्रदिन संपूर्ण विश्व व आपण केवळ ब्रम्हच असल्याचे पाहत असल्याने तो ब्रम्हरुपच होऊन जातो. त्याला मृत्यूचे भय राहत नाही. म्हणून अर्जुना तू ज्ञानी होऊन हे युध्दाचे निष्काम कर्म कर. हया निष्काम कर्मामुळे तुला आप-पर काही दिसणार नाही. नितिनियमाला अनुसरुन तु हे धर्मयुध्द केले तर कोण मरणार ? कोण कोणाला मारणार ? असे प्रश्न तुझ्या समोर उभे राहणार नाहीत. देहाची आसक्ती बाळगल्याने तुला आप-पर दिसत आहे, म्हणून ही आसक्ती तू सोड आणि केवळ कर्तव्य म्हणून हे धर्मयुध्द कर. मी या युध्दाचा कर्ता आहे, असे अजिबात मनात विचार आणू नकोस, असे भगवंत अर्जुनाला समजावत आहेत आजच्या ओविच्या अनुषंगाने आपणही सर्वत्र सम पाहण्याचा मन:पुर्वक प्रयत्न करु या. जय जय राम कृष्ण हरी.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : रविवार,**
**दि. १८ ऑक्टोबर २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - अश्विन**
**तिथी - शु. सप्तमी**
**ऋतु - शरद (दक्षिणायन)**
**नक्षत्र- पूर्वाषाढा (१२.४७)**
**योग - सुकर्मा (२३.५४)**
**करण - विष्टी (२१.४१)**
**राहू काल : रविवार**
**दु. ०४.३० ते ०६.००**

**दिनविशेष : १८७१: आधुनिक संगणकाचे जनक, इंग्लिश गणितज्ञ आणि शोधक चार्ल्स बॅबेज यांचे निधन.**
**१९३१: विजेचा दिवा आणि अनेक शोध लावणारे वैज्ञानिक थॉमस एडिसन यांचे निधन.**
**२००२: मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर कसोटी आणि एकदिवसीय क्रिकेटमध्ये मिळून २०,००० धावा करणारा जगातील पहिला फलंदाज ठरला.**

## विवाहितेवर अत्याचार; तरूणास सात वर्षाची शिक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

घरात घुसून शेतकऱ्याच्या पत्नीवर जबरदस्तीने बलात्कार करणाऱ्या तरूणास विशेष न्यायाधीश अजितकुमार भस्मे यांनी ७ वर्षे सक्तमजुरी व दोन हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.वैजुनाथ गुरप्पा तिरगुळे (वय २५ वर्ष, रा. घोळसगाव, ता. अक्कलकोट) असे शिक्षा झालेल्याचे नाव आहे.



**गुन्ह्याची पार्श्वभूमी**

यातील पिडीता ही पती, मुलगा, मुलगी व सासऱ्यांसोबत तिच्या शेतात राहाते. १० एप्रिल २०१६ रोजी रात्री पिडीता ही घरामध्ये झोपली असता रात्री १२ च्या सुमारास तिला कोणीतरी हात लावला असल्याचे जाणवले. त्यामुळे पिडीतेस जाग आली. त्यावेळी यातील वरील आरोपी वैजुनाथ तिरगुळे हा तिच्या अंगाशी झटापट करीत होता. आरोपीने नखाने पिडीतेच्या अंगावर ओरखडून, पिडीतेच्या तोंडात साडीचा बोळा कोंबून जबरदस्तीने बलात्कार केला. पिडीतेने आरडा ओरड केल्यानंतर घराबाहेर झोपलेला तिचा पती पळत घरात आला व त्याने आरोपीला पकडण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने पिडीतेच्या नवऱ्यास मारहाण करून तेथून पळ काढला. त्यानंतर पिडीतेने ११ एप्रिल २०१६ रोजी अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे गाठून याबाबत फिर्याद दाखल केली. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलीस उपनिरीक्षक सुर्वे यांनी आरोपी वैजुनाथ तिरगुळे यास अटक करून तपास केला व न्यायालयात दोषारोपपत्र पाठवून दिले.

याप्रकरणाची सुनावणी विशेष न्यायाधीश भस्मे यांच्यासमोर झाली. याप्रकरणी सरकार पक्षाच्यावतीने १२ साक्षीदार तपासण्यात आले. यामध्ये पिडीता, डॉक्टर, तपास अधिकारी यांची साक्ष महत्वाची ठरली. साक्षीदारांच्या साक्षी व सरकारी पक्षाचा युक्तीवाद ग्राह्य धरून न्यायाधीश भस्मे यांनी आरोपी वैजुनाथ तिरगुळे यास बलात्कारप्रकरणी ७ वर्षे सक्तमजुरी व २ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

या खटल्यात सरकार पक्षाच्यावतीने ॲड. शितल डोके यांनी तर आरोपीच्यावतीने ॲड. विक्रांत फताटे यांनी काम पाहिले.

# गाळे, जागा भाडेपट्टाधारकांना १०० टक्के दंडमाफी

## महापालिकेच्या अभय योजनेला 31 ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

सोलापूर महानगरपालिकेच्या मालकीच्या गाळे आणि जमिनींच्या भाडेपट्ट्यावरील थकबाकीदारांसाठी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे दिलासादायक निर्णय घेतला आहे. 'अभय योजना २०२६-२७' अंतर्गत भाड्यावरील दंडाच्या रकमेत १०० टक्के सवलत देण्यात येत असून, या योजनेची मुदत ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

थकबाकी भरून दंडमाफी मिळिवण्याची ही संधी असून, मुदतीत भरणा न करणाऱ्या धारकांविरुद्ध गाळे सील करण्यासह मालमत्ता ताब्यात घेण्याची कारवाई केली जाणार आहे. महानगरपालिकेच्या भूमी व मालमत्ता विभागामार्फत भाडेपट्ट्यावरील मिळकतींची थकबाकी वसूल करण्यासाठी ही योजना राबविण्यात येत आहे.

थकबाकीवरील दंडाचा आर्थिक भार कमी करून महापालिकेची देणी नियमित करण्याच्या उद्देशाने पात्र धारकांना ही सवलत देण्यात आली आहे.त्यामुळे पात्र भाडेपट्टाधारकांनी ३१ ऑक्टोबर २०२६ पूर्वी आवश्यक भाडे व थकबाकी भरून दंडमाफीचा लाभ घ्यावा. योजनेच्या अटी, पात्रता, भरणा प्रक्रिया तसेच देयकांतील त्रुटींबाबत अधिक माहितीसाठी महापालिकेच्या भूमी व मालमत्ता विभागाशी संपर्क साधावा,असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

शंभर टक्के दंडमाफी मिळिवण्यासाठी संबंधित भाडेपट्टाधारकांनी ३१ मार्च २०२६ पर्यंतची संपूर्ण थकबाकी तसेच सन २०२६-२७ मधील ३० सप्टेंबर २०२६ पर्यंतची संपूर्ण भाडेरक्कम भरणे आवश्यक आहे. विहित अटी पूर्ण करणाऱ्या पात्र धारकांनाच भाड्यावरील दंडाच्या रकमेत पूर्ण सवलत दिली जाणार आहे. केवळ दंडमाफीचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्याऐवजी आवश्यक थकबाकी आणि भाडे भरण्याची अट पूर्ण करावी लागणार आहे. अभय योजनेचा लाभ घेऊन थकबाकी नियमित करण्याचे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे. मात्र, थकीत रकमेचा भरणा न करणाऱ्या गाळेधारक किंवा जमीन भाडेपट्टाधारकांविरुद्ध वसुली पथकामार्फत कठोर पावले उचलली जाणार आहेत. संबंधित गाळे तातडीने सील करणे किंवा कायद्यातील तरतुदींनुसार गाळा अथवा जमीन ताब्यात घेण्याची कार्यवाही करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा आयुक्तांनी दिला आहे.

**नऊ मिळकतधारकांना लाभ**

महापालिकेच्या मेजर गाळे, मिनी गाळे, लँडफफी, समाजमंदिरे, अभ्यासिका, अधिकृत खोके, बीओटी मिळकती, २५६ गाळे तसेच टीपी-३/२३ गाळे यांच्या पात्र धारकांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे. संबंधित धारकांनी योजनेच्या अटींची पूर्तता करून निर्धारित मुदतीत भाडे व थकबाकीचा भरणे आवश्यक आहे.

## स्वला जाणण्याचा प्रयत्न करा




आपण इतरांना जाणण्याचा प्रयत्न करतो. संपूर्ण जगाची माहिती आपल्याकडे असते. परंतु आपण कधीही स्व ला जाणण्याचा प्रयत्न करत नाही. अगोदर स्व ला जाणण्याचा प्रयत्न करा, असे प्रतिपादन परमपूज्य अक्षयश्रीजी महाराज यांनी केले.

बलिदान चौक येथील जैन स्थानकात आयोजित अक्षय चातुर्मासात बोलताना त्या म्हणाल्या, साऱ्यांना जाणणे सोपे असते परंतु स्वतःला जाणणे अवघड असते. इतरांना जाणण्यात वेळ वाया घालवू नका. व्यक्ती दुसऱ्यांमधील दोष शोधण्याचा प्रयत्न करतो. दुसऱ्यातील दोष दिसतात परंतु स्वतःतील दोष मात्र तसेच राहून जातात. अगोदर स्वतःमधील दोष कमी करून आंतरिक मन निर्मळ बनवा. तुमच्याकडे कितीही ज्ञान असू द्या ज्ञानाचा अभिमान बाळगू नका. समर्पित भावनेने, श्रद्धेने भक्ती करा. भक्तीमध्ये व्यवहार असू नये. समर्पित भावनेने भक्ती केल्यास आत्मगुणांचा विकास होतो. अशी भक्ती गुरूंना, ईश्वराला भावते. भक्तीमध्ये छोटीशीही कसर राहू नये. भक्तीमध्ये प्रलोभन दाखवू नका.भक्तीमध्ये प्रचंड शक्ती असते म्हणून समर्पित भावनेने भक्ती करा. संकल्प दृढ हवेत.निस्वार्थ भावनेने आई बनून गोरगरिबांची सेवा करा.

**- मल्लेश पुरवंत**



## 'मराठी माणसाच्या जगण्याशी महाराष्ट्र धर्म जोडला जावा'

### सिद्धेश्वर बँकेच्या शारदोत्सव व्याख्यानमालेची सांगता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

मराठी भाषा आणि महाराष्ट्राच्या अस्मितेचा विचार करताना मराठी माणसाच्या जगण्याशी निगडित प्रश्नांना प्राधान्य दिले पाहिजे. भाषा, शिक्षण, रोजगार आणि संसाधनांवरील हक्कांसाठी व्यापक लढ्याची गरज असून त्यासाठी दुसऱ्या संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचा विचार करावा लागेल, असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठातील राज्यशास्त्राचे अभ्यासक प्रा. डॉ. दीपक पवार यांनी केले.

हुतात्मा स्मृती मंदिर येथे सिद्धेश्वर बँक सेवक सांस्कृतिक मंडळाच्यावतीने आयोजित ४४व्या शारदोत्सव व्याख्यानमालेच्या समारोपप्रसंगी 'महाराष्ट्र धर्म आणि मराठी माणूस' या विषयावर प्रा. डॉ. पवार बोलत होते. याप्रसंगी बँकेचे ज्येष्ठ संचालक शिवानंद कोनापुरे आणि तज्ज्ञ संचालक ॲड. धानय्या चिवरी यांच्या हस्ते प्रा. डॉ. पवार यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सिद्धेश्वर बँकेचे अध्यक्ष नरेंद्र गंभीरे, सेवक सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष तथा बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय घाळे उपस्थित होते. सूत्रसंचालन मल्लिनाथ पुजारी यांनी केले तर आभार बँकेचे व्याख्यानमाला प्रमुख राम शर्मा यांनी मानले.

प्रा. डॉ. पवार पुढे म्हणाले, मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे महत्त्वाचे असले, तरी त्यामुळे भाषेसमोरील सर्व प्रश्न सुटणार नाहीत. शिक्षण, उद्योग आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रांत मराठीचा वापर वाढविण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. मराठी भाषेच्या विकासाबरोबरच मराठी माणसाच्या आर्थिक आणि सामाजिक प्रगतीचाही विचार होणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील रोजगाराच्या संधी, स्थानिक संसाधनांवरील हक्क आणि विकासाचे असमान वाटप हेही महत्त्वाचे प्रश्न आहेत. मराठी माणसाच्या जगण्यातील अडचणींकडे दुर्लक्ष करून केवळ भाषिक अस्मितेच्या आधारे प्रश्नांची सोडवणूक होऊ शकत नाही.



## पुल्ली प्रशालेत नवरात्रनिमित्त कन्या पूजन कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

भू.म.पुल्ली कन्या प्रशालेत नवरात्रोत्सवानिमित्त कन्यापूजनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून सामाजिक कार्यकर्त्या सौ. विद्याताई दशरथ गोप होत्या. हारिका गड्डम यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. यानंतर प्रशालेतील निवडक विद्यार्थिनींना हळद-कुंकू लावून, पुष्पगुच्छ देऊन व औक्षण करून त्यांचे विधिवत कन्यापूजन करण्यात आले. शाळेकडून विद्यार्थिनींना वही व पेन यांसारख्या शैक्षणिक साहित्य भेटवस्तू देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांनी देखील या मुलींना विशेष भेटवस्तू देऊन त्यांचा सन्मान केला.

प्रमुख पाहुण्या विद्या गोप यांनी मनोगत व्यक्त केले. प्रमुख अतिथी हारिका श्रीनिवास गड्डम यांनी विद्यार्थिनींना ब्रतुकम्मा सणाचे महत्त्व विशद करून या सणामागील सांस्कृतिक परंपरा, निसर्गाशी असलेले नाते आणि स्त्रीशक्तीचा गौरव यांविषयी माहिती दिली. या कार्यक्रमास उपमुख्याध्यापक तुकाराम श्रीराम, पर्यवेक्षक परमेश्वर बाबळसुरे उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याध्यापिका उमा कोटा यांनी तर आभार तुकाराम श्रीराम यांनी मानले. सूत्रसंचालन संघमित्रा काकडे यांनी केले.

## १३ ट्रॅक्टर्स परस्पर विकून ४४ लाखांची फसवणूक

### दोघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ ऑक्टोबर-**

ट्रॅक्टर शोरूममधून विक्रीसाठी विश्वासाने नेलेले १३ ट्रॅक्टर्स परस्पर विकून तब्बल ४४ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दोन जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गौरव पोपट बोदरे (रा. पुरंदर, पुणे) आणि पुष्कर शंकर पाराडे (रा. उत्कर्ष नगर, सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत काशीनाथ मनोहर घुगरे (रा. भवानी पेठ, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी काशीनाथ घुगरे यांचे बाळे येथे शेतीच्या एस कंपनीचे श्री ट्रेडर्स नावाचे ट्रॅक्टर शोरूम आहे. आरोपी गौरव बोदरे आणि पुष्कर पाराडे यांनी ८ मे २०२४ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत घुगरे यांचा विश्वास संपादन केला. संगनमत करून त्यांनी शोरूममधून एकूण ८६ लाख ३२ हजार ६७२ रुपये किमतीचे तब्बल १३ ट्रॅक्टर्स गौरव बोदरे याच्या सह्याद्री ट्रॅक्टर्स अँड इक्विपमेंट येथे नेले.तिथे या ट्रॅक्टर्सची परस्पर विक्री करून आरोपींनी त्या रकमेपैकी ४२ लाख २९ हजार ९१२ रुपये फिर्यादीला दिले. मात्र, उर्वरित ४४ लाख २ हजार ७६० रुपयांची रक्कम वेळेवर न देता, वारंवार केवळ आश्वासने देऊन घुगरे यांची आर्थिक फसवणूक केली. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर काशीनाथ घुगरे यांनी पोलिसांत धाव घेत तक्रार दिली.



## दुष्काळात करायचे पाणी नियोजन

१) सर्वसामान्य जनतेला दुष्काळाचं गांभीर्य पटवून देण्यासाठी जिल्हा स्तरावर, तालुका स्तरावर, शहरातून, गांवोगावी पाणी परिषदा, अभ्यास वर्गाच, पत्रकार परिषदांच नियोजन करणे.

२) शहर स्तरावर प्रत्येक वॉर्डातल्या पाणी साठयांच (विहीरी, तलाव, आड, हातपंप) यांची नोंद करुन त्यांच सुस्थितीत, पिण्यायोग्य, वापरण्यायोग्य असं वर्गीकरण करुन ठेवणे.

३) वापरण्यायोग्य असलेल्या विहीरींचे गाळ काढून घेणे, हातपंप दुरुस्त करुन घेणे.

४) प्रत्येक टँकरची कपॅसिटी लक्षात घेऊन त्याची प्रमाण भूत किंमत ठरवून त्याचे प्रसिद्धिकरण करणे.

५) प्रसिद्ध वर्तमानपत्रातून पाणी वापराविषयी जागृती करणे, लेखमाला सुरु करणे.

६) महापौर, जिल्हाधिकारी यांनी पर्यावरण प्रश्नावर काम करणाऱ्या समाजसेवकांची बैठक बोलाऊन त्यांच्या सूचना घेणे.

७) शेतीतज्ञांशी चर्चा करून दुष्काळी पिकांचे पाणी नियोजन करणे, कमी पाण्यात येणारी पिके घेण्यासाठी आवाहन करणे.

८) या वर्षी नवीन उसाची लागवड शक्यतो होणार नाही याची काळजी घेणे.

९) पिण्याच्या पाण्याच्या नियोजनासाठी त्यातील गोंधळ थांबवण्यासाठी विभागशः पाणी सोडण्याच्या वेळा आणि कालावधी वर्तमानपत्रातून जाहीर करणे व त्या पाळणे.

१०) या सर्व बाबतीत नागरीकांच्या, व्यावसायिकांच्या, शेतकऱ्यांच्या काही तक्रारी असतील तर त्या निवारणासाठी एक स्वतंत्र कक्ष स्थापन करणे.

**- ॲड. आनंद रा. देशपांडे**

## कामे वेळेत न झाल्यास जबाबदारी निश्चित

सरकारी कार्यालयात एखादं काम घेऊन गेलं की, सर्वसामान्य माणसाला काय अनुभव येतो, हे काही वेगळं सांगायला नको. कधी फाईल सापडत नाही, कधी साहेब बैठकीत असतात, तर कधी सही बाकी असल्याचं सांगितलं जातं. एकाच कामासाठी चार-चार चकरा माराव्या लागतात. दिवस जातो, पैसा खर्च होतो, पण काम मात्र जागच्या जागीच राहतं. अशा वेळी सामान्य माणसानं दाद मागायची तरी कुणाकडे? हाच प्रश्न आता जिल्हा परिषद प्रशासनाच्या कामकाजाच्या निमित्तानं पुन्हा ऐरणीवर आला आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेत विविध विभागांच्या कामकाजाची तपासणी करताना अनेक प्रकरणं प्रलंबित असल्याचं समोर आलं. पेन्शनची कामं, सेवा पुस्तकांतील नोंदी, न्यायालयीन प्रकरणं, प्रशासकीय अहवाल आणि ग्रामपंचायतींची कर वसुली अशा अनेक विषयांवर विभागीय आयुक्तांनी नाराजी व्यक्त केली. कामात चालढकल करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना स्पष्ट शब्दांत सुनावत, काम चुकारपणामुळे उद्या माझ्यावर आरोप झाले, तर याद राखा! असा सज्जड दम देण्यात आला. यातून एक गोष्ट स्पष्ट झाली, की सरकारी कामकाजात आता केवळ फाईली पुढे ढकलून चालणार नाही. काम पूर्ण करण्याची जबाबदारी घ्यावी लागेल आणि दिलेल्या मुदतीत त्याचा निकालही लावावा लागेल.

**फाईल पुढे सरकतेय, पण कामाचं काय?**

सरकारी कार्यालयात एखादी फाईल अडकली की तिचा प्रवास सुरू होतो. एका टेबलावरून दुसऱ्या टेबलावर, तिथून पुढच्या अधिकाऱ्याकडे आणि शेवटी सहीच्या प्रतीक्षेत! मात्र, या सगळ्या प्रवासात कामासाठी आलेल्या माणसाचा वेळ किती जातो, याचा विचार कोण करणार? प्रशासनात काही कामांना वेळ लागतो, हे मान्य आहे. कागदपत्रांची तपासणी, नियमांची पूर्तता आणि आवश्यक मंजुरी या गोष्टी कराव्याच लागतात. पण त्याच नावाखाली कामं महिनेन्महिने रखडत असतील, तर त्याला काय म्हणायचं? प्रत्येक वेळी एखादी त्रुटी पुढे करून जबाबदारी झटकणं कितपत योग्य? यासाठी प्रत्येक प्रलंबित प्रकरणाचा आढावा घेणं, काम कुठं अडलंय हे शोधणं आणि संबंधित कर्मचाऱ्याला जबाबदार धरणं आवश्यक आहे. कामासाठी कालमर्यादा ठरली, तरच दिरंगाईला आळा बसेल. अन्यथा बैठका होतील, सूचना निघतील, अहवाल मागवले जातील; पण प्रत्यक्ष परिस्थिती मात्र तशीच राहील.

**निवृत्त कर्मचाऱ्याला पेन्शनसाठी हेलपाटे कशाला?**

आयुष्यभर नोकरी करून एखादा कर्मचारी निवृत्त होतो. आता उरलेलं आयुष्य शांततेत घालवावं, एवढीच त्याची अपेक्षा असते. पण निवृत्त झाल्यानंतर पेन्शनसाठीच कार्यालयात चकरा माराव्या लागल्या, तर त्याच्यासाठी यापेक्षा मोठी अडचण कोणती?

कधी सेवा पुस्तकातील नोंदी अपूर्ण असतात, कधी एखादं प्रमाणपत्र मिळत नाही, तर कधी पेन्शनचा प्रस्तावच प्रलंबित असतो. याचा त्रास मात्र निवृत्त कर्मचाऱ्याला सहन करावा लागतो. नियमित उत्पन्नाची गरज असताना स्वतःच्या हक्काच्या पैशांसाठी दुसऱ्याच्या दारात उभं राहण्याची वेळ येणं, ही काही चांगल्या प्रशासनाची खूण नाही.

म्हणूनच निवृत्तीच्या किमान सहा महिने आधी पेन्शनची प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सेवा पुस्तकातील नोंदी तपासणं, कागदपत्रं पूर्ण करणं आणि प्रलंबित प्रस्तावांचा निपटारा करणं ही कामं आधीच झाली पाहिजेत. निवृत्तीच्या दिवशीच कर्मचाऱ्याला पेन्शनचा लाभ मिळेल, असं नियोजन केलं, तर अनेक अडचणी टाळता येतील.

प्रश्न एवढाच आहे, की ही तयारी प्रत्यक्षात होणार कधी? निवृत्तीची तारीख जवळ आल्यानंतर धावपळ करण्यापेक्षा आधीच कामं पूर्ण केली, तर कर्मचारी आणि प्रशासन या दोघांचाही त्रास वाचेल.

**जिल्हा परिषदेतून**



**यशवंत गुरव**
**मो. ८८८८६५०७५५**

**कर वसुली नसेल, तर विकास कसा?**

गावात चांगले रस्ते हवेत, पिण्याचं पाणी नियमित मिळावं, गटारी स्वच्छ असाव्यात आणि इतर मूलभूत सुविधा मिळाव्यात, अशी अपेक्षा प्रत्येकाची असते. पण या सुविधा पुरवण्यासाठी ग्राम पंचायतीकडे पैसा असणंही तितकंच गरजेचं आहे. घरपट्टी आणि पाणीपट्टीची वसुलीच झाली नाही, तर विकासकामांसाठी निधी उभा करायचा कसा?

ग्रामपंचायतींच्या उत्पन्नात कर वसुलीचा मोठा वाटा असतो. त्यामुळे थकबाकी वसूल करण्यासाठी नियोजन करणं आणि नियमित पाठपुरावा करणं आवश्यक आहे. बैठकीत मार्च २०२६ या आर्थिक वर्षात घरपट्टी आणि पाणीपट्टीची ९३ टक्के वसुली झाल्याची माहिती देण्यात आली. ही वसुली चांगली असली, तरी उर्वरित रक्कमही वसूल करण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत.

प्रशासनाकडे अधिकार आहेत, यंत्रणा आहे आणि काम करण्यासाठी कर्मचारीही आहेत. मग प्रत्येक कामासाठी वरिष्ठांनी तंबी दिल्यानंतरच हालचाल का व्हावी? स्वतःहून जबाबदारी स्वीकारून काम करणारी यंत्रणा उभी राहणं गरजेचं आहे.

शेवटी, सरकारी खुर्चीवर बसणं महत्त्वाचं नाही; त्या खुर्चीवर बसून जनतेची कामं करणं महत्त्वाचं आहे. लोकांना आश्वासनं नकोत, त्यांची कामं वेळेत झाली पाहिजेत. एका महिन्याची मुदत ही केवळ कागदोपत्री पूर्तता करण्याची संधी नाही, तर प्रशासनाला आपली कार्यपद्धती सुधारून दाखवण्याची वेळ आहे. आता कारणं सांगण्यापेक्षा काम करून दाखवावं लागेल. कारण जनतेच्या कामात दिरंगाई झाली, तर त्याची किंमत शेवटी सामान्य माणसालाच मोजावी लागते!

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# आरोग्य संपन्न गावांसाठी यंत्रणा अग्रेसर



## दक्षिण सोलापुरात कृती आराखड्यावर भर

### चोख अंमलबजावणीबाबत आरोग्य अधिकारी-कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ ऑक्टोबर**

गावातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी, माता-बाल आरोग्य अधिक सक्षम व्हावे आणि आरोग्यविषयक निकषांची प्रभावी अंमलबजावणी करून ग्रामपंचायतींना पुरस्कारासाठी पात्र ठरता यावे, या उद्देशाने दक्षिण सोलापूर तालुक्यात 'माझे गाव आरोग्यसंपन्न गाव' अभियानाच्या अंमलबजावणीवर भर देण्यात येत आहे.

सेवा संकल्प अभियानांतर्गत तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय व पंचायत समिती दक्षिण सोलापूर यांच्या वतीने तालुकास्तरीय कार्यशाळा पार पडली. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यशाळेत आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांना अभियानाची उद्दिष्टे, आरोग्य सेवांचे गुणांकन, विविध निकषांची पूर्तता आणि पुरस्कारासाठी आवश्यक कार्यपद्धती याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नीलम घोगरे यांनी प्रास्ताविकातून अभियानाचे महत्त्व स्पष्ट केले.

अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नंदकिशोर घाडगे आणि जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. हर्षल जाधव यांनीही मार्गदर्शन केले.

आरोग्यसंपन्न गावासाठी आरोग्य विभाग, ग्रामपंचायत आणि गावपातळीवरील संबंधित यंत्रणांनी एकत्रितपणे काम केले पाहिजे. केवळ पुरस्कारापुरते नव्हे, तर नियमित आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवेसाठी प्रत्येक गावाने कृती आराखडा तयार करून प्रभावी अंमलबजावणी करावी, असा उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

**काम केवळ कागदावर नको!**

गावातील आरोग्यविषयक समस्या ओळखून त्यावर वेळेत उपाययोजना करणे, माता व बाल आरोग्य सेवांना प्राधान्य देणे, प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा प्रभावीपणे राबविणे आणि राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे या बाबींवर कार्यशाळेत भर देण्यात आला. आरोग्यविषयक उपक्रमांची नोंद, आवश्यक दस्तऐवजीकरण आणि निर्धारित निकषांनुसार कामांची पूर्तता यांनाही महत्त्व दिले.

# शरणप्पा फुलारी यांची राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड

### २४ ऑक्टोबर रोजी कोल्हापुरात पुरस्कार वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १७ ऑक्टोबर -**

जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळा, बोरोटी (खु.), ता. अक्कलकोट, जि. सोलापूर येथील उपशिक्षक शरणप्पा फुलारी यांची प्रतिष्ठेच्या दिपगंगा भागीरथी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार - २०२५ साठी निवड झाली आहे.

दिपगंगा भागीरथी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, महाराष्ट्र राज्य संचलित शारदा वृद्धसेवाश्रम, सांगली व कोल्हापूर तसेच दीपस्तंभ शैक्षणिक संस्था, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष हिंदरत्न डॉ. दीपक लोंढे यांच्या मार्गदर्शनाखाली पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन केले आहे.

शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याच्या उद्देशाने फुलारी कार्यरत आहेत. त्यामुळे त्यांची या पुरस्कारासाठी निवड झाली आहे. शनिवार, दि. २४ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता कोल्हापूर येथील दसरा चौकातील शाहू स्मारक भवन येथे पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे.

यशाबद्दल आमदार सचिन कल्याणशेट्टी, जिल्हा परिषद सदस्य सिद्धाराम शिवमूर्ती, शिवराज म्हेत्रे, पंचायत समिती सभापती रश्मी हिप्परगी, उपसभापती सागर कल्याणशेट्टी, पंचायत समिती सदस्य शीतल म्हेत्रे, शिवानंद पाटील, गटविकास अधिकारी शंकर कवितके, गटशिक्षणाधिकारी प्रशांत रबाळे, विस्तार अधिकारी सोमशेखर स्वामी, केंद्रप्रमुख करुणा गुरव,केंद्रीय मुख्याध्यापक श्रीमंत पुजारी,मुख्याध्यापिका राजश्री तांबे आदींनी अभिनंदन केले आहे.

## महत्वाचे...

# मोगले साडी सेंटर चोरी प्रकरणी आरोपीला तामिळनाडूतून अटक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

सोलापुरातील प्रसिध्द मोगले साडी सेंटर येथे झालेल्या १० लाख ७० हजार रुपयांच्या चोरीप्रकरणी जोडभावी पेठ पोलिसांनी आरोपीला तामिळनाडू येथून अटक केली आहे. या प्रकरणात न्यायालयाने आरोपीला पुढील तपासासाठी दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. २१ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री दुकान बंद करून गेल्यानंतर दि. २२ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी दुकान उघडले असता दुकानाच्या टेरेसवरील लोखंडी पत्र्याचे नटबोल्ट उचकटलेले दिसून आले. दुकानातील कॅश काउंटरमधील सुमारे ७० हजार रुपये तसेच तिजोरीतील १० लाख रुपये, अशी एकूण १० लाख ७० हजार रुपयांची रोकड चोरीस गेली होती. याप्रकरणी पोलिसांनी दि. १५/१०/२६ रोजी आरोपीला तामिळनाडू येथून अटक केली. गुन्ह्याचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्रीनाथ एल. महाडिक हे करीत आहेत. न्यायालयाने आरोपीस दोन दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली. सदर प्रकरणात आरोपीतर्फे अॅड. प्रणव उपाध्ये व अॅड. भागवत इंदापूरकर हे काम पाहत आहेत.

# बठाण येथे दोन ठिकाणी जुगार अड्ड्यावर छापा

### नऊ जणाविरुध्द गुन्हा

**तथा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. १७ ऑक्टोबर -**

बठाण येथे दोन ठिकाणी मन्ना नावाचा जुगार खेळणाऱ्या अड्ड्यावर छापा टाकून एकूण ७ हजार ८०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. विजय शिंदे, हणुमंत बेदरे, रावसाहेब साठे, नितीन रोंगे, खंडू मंडले, दिपक दावणे, परमेश्वर बेदरे, महेश सुतार, विकास बेदरे आदी नऊ जणाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

बोराळे बीट हद्दीत पोलीस उपनिरीक्षक नागेश बनकर, हवालदार मनोज खंडागळे, अंमलदार जाधव आदी दि.१५ रोजी पेट्रोलिंग करीत असताना बठाण येथील पाण्याच्या टाकीजवळ काही इसम गोलाकार बसून जुगार खेळत असल्याची माहिती मिळाली. सदर पोलीस पथकाने छापा टाकला असता विजय शिंदे, हणुमंत बेदरे, रावसाहेब साठे, नितीन रोंगे, खंडू मंडले आदी जुगार खेळताना दिसले. पोलीसांनी रोख ४ हजार २०० व जुगार साहित्य जप्त केले. दुसऱ्या घटनेत बठाण येथील सरकारी दवाखान्याच्या मोकळ्या जागेत लाईटच्या उजेडात दि.१५ रोजी रात्री ८.३० वाजता दिपक दावणे, परमेश्वर बेदरे, महेश सुतार,विकास बेदरे आदी जुगार खेळत असल्याचे दिसून आले. पोलीसांनी रोख ४ हजार ६०० व पत्याचे डाव जप्त केले आहेत. दोन्ही घटनेची फिर्याद अंमलदार सिध्दनाथ शिंदे यांनी दिली आहे.



# जि. प. शाळा अंत्रोळीत जागतिक हात धुवा दिन साजरा

**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

जि. प. शाळा अंत्रोळी येथे जागतिक हात धुवा दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना स्वच्छता व आरोग्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. हात नेहमी कसे स्वच्छ धुवावेत याचे प्रात्यक्षिक देण्यात आले, याप्रसंगी श्रीरंग बनसोडे, नागनाथ म्हमाणे, मीनाक्षी राठोड, सुषमा कुंभार आदी उपस्थित होते.



# कुर्डुवाडी काँग्रेस अल्पसंख्यांक विभागातर्फे अब्दुल कलाम जयंती

**कुर्डुवाडी, दि. १७ ऑक्टोबर -**

कुर्डुवाडी काँग्रेस अल्पसंख्यांक विभागाच्यावतीने भारतरत्न डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दिगंबर पांढरे, शरद पवार गटनेते दत्ताजी गवळी, काँग्रेस अल्पसंख्यक शहराध्यक्ष हमीद शिकलकर, काँग्रेस कमिटी शहराध्यक्ष फिरोज खान, प्रकाश किर्वे, रफिक सय्यद, राहुल गायकवाड, मॅनेजर किशोर हजारे, शाबीर शिकलकर सुभान सय्यद व आदी कार्यकर्ते उपस्थित होते. काँग्रेस अल्पसंख्यक शहराध्यक्ष हमीद शिकलकर यांनी आभार मानले.



# कर्मवीर सार्वजनिक ग्रंथालयात डॉ. अब्दुल कलाम जयंती साजरी

**बार्शी, दि. १७ ऑक्टोबर -**

येथील कर्मवीर सार्वजनिक ग्रंथालयात माजी राष्ट्रपतीडॉ.ए.पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली. डॉ.कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख मान्यवरांचे हस्ते केले. निरीक्षक भागवत बोबडे, वृक्षमित्र सुनिल फल्ले, नईम शेख मंत्री, अशोक गवळी, प्रेम अग्रवाल, हर्षद मोरे, प्रेम लोंढे यांचेसह सभासद व वाचक उपस्थित होते. यावेळी कलाम यांच्या प्रतिमेसमोर ग्रंथालयात उपलब्ध असणारे कलामांचे समग्र साहित्य माहितीसाठी ठेवले होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार ग्रंथपाल विनोद गायकवाड यांनी व्यक्त केले.

# अनधिकृत बॅनर लावल्यास होणार कारवाई

### मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१७ ऑक्टोबर-**

सांगोला शहरात डिजिटल बॅनर व फ्लेक्स लावण्यापूर्वी नगरपरिषदेकडून आवश्यक परवानगी घेऊन लावावेत. अन्यथा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येईल, असे मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांनी सांगितले आहे.

सांगोला शहरातील डिजिटल बॅनर व फ्लेक्स लावण्यासंदर्भात आवश्यक उपाययोजनासाठी नगराध्यक्ष आनंदा माने यांचे अध्यक्षतेखाली सर्व डिजिटल बॅनर प्रिंटिंग व्यावसायिकांची बैठक सांगोला नगरपरिषद येथे झाली. यावेळी त्यांनी ही सूचना दिली. सार्वजनिक ठिकाणी, चौकात, रस्त्यांच्या कडेला तसेच शासकीय मालमत्तेवर नगरपरिषदेची परवानगी न घेता अनधिकृत बॅनर, फ्लेक्स लावू नयेत असे आनंदा माने यांनी सांगितले.

नगरपरिषदेने सांगोला शहरात परवानगी घेऊन डिजिटल बॅनर लावण्यासाठी एकूण ११ ठिकाणे निश्चित केलेली आहेत. शहरातील डिजीटल व्यवसायिकांनी नगरपरिषदेकडून व्यवसाय ना-हरकत दाखला घेणे बंधनकारक आहे. तसेच डिजिटल बोर्ड प्रिंट करतेवेळी त्यावर नगरपरिषदेकडून देण्यात येणारा क्युआर कोड प्रिंट करणे बंधनकारक आहे. डिजिटल बॅनर साईज १०१०, १०१५ व १०२० फूट या प्रमाणात ठेवण्यात यावेत, आदी सूचना यावेळी देण्यात आल्या. बैठकीसाठी प्रशासकीय अधिकारी सचिन पाडे, प्रभारी स्वच्छता निरीक्षक महेश रजपूत आणि सर्व डिजिटल बॅनर प्रिंटिंग व्यावसायिक उपस्थित होते.

# वाशिंबेच्या वेलची केळीला शालेय अभ्यासक्रमात स्थान मिळण्याच्या दिशेने प्रयत्न

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.१७ ऑक्टोबर-**

करमाळा तालुक्यातील वाशिंबे येथील वैशिष्ट्यपूर्ण वेलची केळीला शालेय अभ्यासक्रमात स्थान मिळावे, यासाठी सुयोग झोळ यांनी पुढाकार घेतला आहे. यासंदर्भात त्यांनी पुणे येथील महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेत संपर्क साधला आहे. त्यांनी नियमानूसार कारवाईचे निर्देश दिले आहेत.

परिषदेच्या अध्यक्ष कमलादेवी आवटे, बालभारतीच्या भूगोल विभागाचे प्रमुख अरुण जाधव यांची भेट घेऊन झोळ यांनी प्रस्ताव सादर केला. वाशिंबे येथील वेलची केळीला पुणे, मुंबई आणि नाशिक यांसारख्या






मोठ्या शहरांतील बाजारपेठांमध्ये मागणी असून, या केळीची स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे. या पिकाचे वैशिष्ट्य, त्यामागील शेतकऱ्यांचे कष्ट, योगदान आणि बाजारपेठेतील महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे, या उद्देशाने सुयोग झोळ यांनी वेलची केळीचा शालेय अभ्यासक्रमात समावेश करण्याची मागणी केली.

वाशिंबेच्या वेलची केळीला शैक्षणिक स्तरावर ओळख मिळाल्यास करमाळा तालुक्याच्या कृषीवैभवाची माहिती राज्यातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे.



# मोडनिंब येथील श्री यमाई देवीला ५६ भोग अर्पण

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १७ ऑक्टोबर -**

मोडनिंब (ता. माढा) येथील श्री यमाई देवी मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. सहाव्या माळेला श्री यमाई देवीचा अन्नपूर्णा स्वरूपातील आकर्षक अवतार साकारण्यात आला. देवीला फराळाच्या पदार्थांसह ५६ प्रकारच्या खाद्यपदार्थांचा भोग अर्पण करण्यात आला.

अन्नपूर्णा देवी ही अन्न, समृद्धी आणि पोषणाचे प्रतीक मानली जाते. या भावनेतून देवीला विविध पदार्थांचा नैवेद्य अर्पण केला. विविध खाद्यपदार्थांनी सजविलेल्या भोगामुळे देवीचे रूप अधिक आकर्षक दिसत होते. देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. विविध धार्मिक उपक्रमांमुळे उत्सवाची रंगत वाढत आहे. नवरात्रोत्सवात श्री यमाई देवी मंदिरात दररोज देवीची विविध रूपे साकारत आहेत. यमाई ट्रस्टकडून नऊ दिवस महाप्रसादाचे वाटप केले जाते. वनिता पाटणे, रत्नप्रभा पवार, राणी जाधव, सुवर्णा पाटणे, शिवानी पाटणे, संपदा क्षीरसागर, रचना पवार, पद्मजा पाटणे, मनीषा सुर्वे, लता गुरव तसेच यमाई देवी महिला मंडळ यांनी परिश्रम घेतले.

# ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी अनुदान द्या

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि.१७ ऑक्टोबर**

दिवाळीचा सण आनंदात साजरा करता यावा, यासाठी जिल्ह्यातील पात्र ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना प्रत्येकी १५ हजार रुपये सानुग्रह अनुदान दिवाळीपूर्वी देण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, नगरपरिषद कामगार युनियनने केली आहे. यासंदर्भात संघटनेच्या वतीने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. प्रशासनाने या मागणीची तातडीने दखल घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या कामाचा सन्मान राखत त्यांना सण साजरा करण्यासाठी आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन संघटनेचे जिल्हाध्यक्ष दिलीप जाधव यांनी केले. यावेळी संघटनेचे सचिव बालाजी पवार, धनाजी खवळे, विजय आरबळे, दादा होडगे, संजय मगर, समाधान धोत्रे, पोपट वाघमारे, रमेश कोळी आदी उपस्थित होते.



# बार्शीत रंगला गरबा-दांडियाचा उत्सव

### मैत्रीण मंचच्या आयोजनाला महिलांचा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. १७ ऑक्टोबर -**

वीरशैव विद्या संवर्धिनी मंडळ, बार्शी संचलित महात्मा बसवेश्वर सार्वजनिक वाचनालय व मैत्रीण मंच यांच्यावतीने बार्शीत गेले चार दिवस भव्य गरबा-दांडिया स्पर्धा झाल्या. त्यात महिलांनी उत्स्फुर्त सहभाग घेतला. दांडियासह हादगा-भोंडल्यातून संस्कृतीचे जतन केले.

वीरशैव लिंगायत बोर्डिंग येथे सायंकाळी ६ ते रात्री १० या वेळेत हा उत्सव रंगला. पहिल्या दोन दिवसांत महिलांना मनसोक्त गरबा-दांडिया खेळण्याची संधी दिली. शेवटच्या दोन दिवसांत विविध गटांमध्ये स्पर्धा झाल्या.

एका दिवशी महिलांसाठी गरबा-दांडियासह पारंपरिक हादगा-भोंडला झाला. दुसऱ्या दिवशी लहान व मोठ्या गटांसाठी जोडी दांडिया आणि समूह दांडिया स्पर्धा झाल्या. तिसऱ्या दिवशी विवाहित महिलांसाठी स्पर्धा पार पडल्या.

प्रत्येक स्पर्धेत प्रथम, द्वितीय, तृतीय आणि उत्तेजनार्थ क्रमांकांसाठी आकर्षक बक्षिसे दिली. समूह दांडिया स्पर्धेतील विजेत्यांना रोख स्वरूपात बक्षीसे दिली. मैत्रीण मंचच्या अध्यक्षा अरुणा मनगिरे, शारदा पानगांवकर शिल्पा मठपती, वंदना देवणे, सदस्या अपर्णा होनराव, माधुरी शिलवंत, स्वाती धारुरकर, प्रभा बेणे, उर्मिला निंबर्गीकर, अरुणा कल्याणी, महानंदा कोरे, लीना शेटे, संगीता बरिदे, रेणुका शेटे यांनी उपक्रमासाठी पुढाकार घेतला.

# 'जागतिकसह स्थानिक अभ्यास देखील महत्वाचा'

### अकलूजमध्ये सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील वाचनालयाचे उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १७ ऑक्टोबर -**

शंकरनगर येथील सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च येथे सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील वाचनालय सुरु केले आहे. महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. वाचनालयाचे उद्घाटन स.म. शंकरराव मोहिते पाटील साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते झाले.

यावेळी ट्रस्टचे सचिव सुहास यादव, सदस्य सुभाष खटके, व्यवस्थापन समितीचे वसंत जाधव, यशवंत माने-देशमुख, वसतिगृह विकास समितीच्या मंगल वाघमोडे, अर्चना गायकवाड, हसीना शेख, समन्वयक पोपटराव भोसले-पाटील, प्राचार्य डॉ. प्रवीण ढवळे आदी उपस्थित होते.




प्रास्ताविक विकास समितीच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांनी केले.

यूपीएससी, एमपीएससी, स्टाफ सिलेक्शन कमिशन आदी परीक्षांत यशासाठी सातत्यपूर्ण अभ्यास, योग्य मार्गदर्शन आणि दर्जेदार संदर्भ साहित्याची गरज असते. मात्र, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना या सुविधा मिळत नाहीत. त्यापार्श्वभुमीवर महाविद्यालयाने मासिक १५१ रुपये व वार्षिक १५०० रुपये या नाममात्र शुल्कात वाचनालयाची सुविधा उपलब्ध करून दिल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर महाविद्यालयात प्रत्यक्ष भेट देऊन नावनोंदणी करावी, असे आवाहन त्यांनी केले. डॉ. अब्दुल कलाम यांच्या स्मृती प्रित्यर्थ वाचन प्रेरणादिन निमित्त खास याचे उदघाट्न केल्याचे सांगितले.

लातूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या वतीने आयोजित विभागीय क्रीडा स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावल्याबद्दल महाविद्यालयातील मुलींच्या हॉलिबॉल संघातील खेळाडू व त्यांच्या प्रशिक्षकांचा सत्कार याप्रसंगी करण्यात आला. कार्यक्रमाचे उदघाट्क जयसिंह मोहिते-पाटील यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचे कौतुक करताना याठिकाणी अनेक विभागातून वेगवेगळे अभ्यासक्रम शिकवले जात असून यामधील अनेक विद्यार्थी आज वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असल्याचे सांगितले. येथील ४६५ विद्यार्थी हे सध्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये उच्च पदावर कार्यरत आहेत.

मानसिक स्वास्थ्य मजबूत ठेवण्यासाठी मोबाईलमध्ये वेळ न घालवता छंदाची जोपासना करावी असा सल्ला दिला. सूत्रसंचालन मीनाक्षी राऊत यांनी तर आभार मंगल वाघमोडे यांनी मानले.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर : जनता सहकारी बँकेच्या महिला कर्मचारी.



# जेऊरच्या आरोग्य केंद्रातील कामकाज उत्तम

## सीईओ समाधानी; औषध विभागापासून ऑपरेशन थिएटरपर्यंत पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१७ ऑक्टोबर**

सेवा संकल्प अभियानांतर्गत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी अक्कलकोट तालुक्यातील जेऊर प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन तेथील कामकाजाची प्रत्यक्ष पाहणी केली. उपलब्ध आरोग्य सुविधांचा आढावा घेतल्यानंतर त्यांनी केंद्रातील कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले. तसेच आरोग्य अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कार्याचे कौतुक केले.

यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) सूर्यकांत भुजबळ, गटविकास अधिकारी शंकर कवितके, गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. अश्विन करजखेडे, आरोग्य विस्तार अधिकारी भोरे, प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. गजानन मारकड, डॉ. आयेशा शेख आणि डॉ.



बसवराज कोणदे यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

भेटीदरम्यान जैन यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रातील विविध विभागांची पाहणी केली. औषध विभागात उपलब्ध औषधसाठ्याची, ऑपरेशन थिएटरची तसेच रुग्णांसाठी उपलब्ध सुविधांची माहिती घेतली. दिल्या जाणाऱ्या सेवांचा आढावा घेत आरोग्य व्यवस्थेची सद्यस्थिती जाणून घेतली. ग्रामीण भागातील नागरिकांना किरकोळ आजारांपासून ते आवश्यक उपचारांपर्यंतच्या सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रांनी रुग्णांना वेळेत उपचार, योग्य मार्गदर्शन आणि आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर द्यावा, असे सूचित केले.

### सेवा संकल्प अभियानातून आरोग्यसेवेला बळ

सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शासकीय सेवांचा दर्जा उंचावणे आणि नागरिकांना योजनांचा लाभ प्रभावीपणे मिळवून देणे, हा प्रशासनाचा प्रयत्न आहे. जेऊर प्राथमिक आरोग्य केंद्रातील पाहणीमुळे आरोग्य व्यवस्थेतील चांगल्या कामाची दखल घेण्याबरोबरच रुग्णसेवेचा दर्जा सातत्याने उंचावण्याचा संदेशही देण्यात आला.



# विद्यार्थिनींचा फेर, पारंपरिक गाण्यांसह रंगला भोंडला

## महर्षि शंकरराव मोहिते प्रशालेत लोकसंस्कृतीचा संगम

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १७ ऑक्टोबर -**

भारतीय संस्कृतीचे जतन, संवर्धन आणि पारंपरिक लोककलेचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने महर्षि शंकरराव मोहिते प्रशाला, यशवंतनगर येथे भोंडला कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला.

मुख्याध्यापक संजय गळीतकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला. कार्यक्रमासाठी माता-पालक सदस्य अश्विनी एकतपुरे, प्रणिती सोनवले, लता एकतपुरे आणि शिरसाट यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. कार्यक्रमात विद्यार्थिनींनी फेर धरून भोंडल्याची गाणी सादर केली. 'ऐलमा पैलमा गणेश देवा', 'एक लिंबू झेलू आदी पारंपरिक लोकगीतांच्या सुरांनी वातावरण चैतन्यमय झाले. तालबद्ध टाळ्या, फेरातील एकसंध हालचाली, गीतांमधील गोडवा आणि विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे संपूर्ण परिसर आनंदाने भारावून गेला.

शिक्षिका भाग्यश्री उरवणे यांनी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासातील सांस्कृतिक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमासाठी उपमुख्याध्यापक आसिफ झारेकरी, पर्यवेक्षक उमेश बोरावके, शिक्षक प्रतिनिधी राजाराम काळे, सांस्कृतिक विभागप्रमुख नागेश सोनवणे, शिक्षकवृंद उपस्थित होते. सूत्रसंचालन सहशिक्षिका नाझिया सय्यद यांनी केले.

# श्री शंकरलिंग प्रशालेत वाचन प्रेरणा दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग १७ ऑक्टोबर -**

वळसंग ( ता. द. सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी झाली. सर्वप्रथम कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन पर्यवेक्षक शिवानंद घोडके यांच्या हस्ते झाले. पूजनानंतर विद्यार्थी, शिक्षक ,शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी पुस्तकांचे वाचन करून डॉ. कलाम यांना आदरांजली वाहिली.सांस्कृतिक विभागप्रमुख तानाजी जमादार यांनी डॉ. कलाम यांच्या कार्याविषयी माहिती दिली. सिद्धाराम भैरामडगी, श्रीमंत भोसले, संतोष शिंदे, सिद्धारूढ हिरेमठ, बसवराज दुधगी, विरेश थळंगे, गंगाधर बिराजदार, संतोष कस्तुरे, शिवराज अष्टगी, शरणय्या मसुती आदींसह बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# समान वेतनासाठी न्यायालयीन कर्मचारी आक्रमक

## बार्शीत काळ्या फिती लावून आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ ऑक्टोबर -**

उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही समान वेतनश्रेणी व भत्ते लागू करावेत, या मागणीसाठी बार्शी न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून शांततापूर्ण आंदोलन केले. शासनाने ५ नोव्हेंबरपूर्वी प्रलंबित प्रस्तावाला मंजुरी देऊन शासन निर्णय निर्गमित करावा, अन्यथा राज्यभरातील न्यायालयीन कर्मचारी ५ नोव्हेंबर रोजी सामूहिक रजेवर जातील, असा इशारा जिल्हा न्यायालय कर्मचारी संघटनेने दिला आहे.

दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीचा प्रस्ताव दोन वर्षांपासून शासनदरबारी प्रलंबित आहे. या मागणीसाठी



राज्यातील लोकप्रतिनिधींनी मुख्यमंत्र्यांकडे शिफारसपत्रे पाठवली आहेत.

मंडणगड आणि नाशिक येथील न्यायालयीन इमारतींच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रस्तावाबाबत सकारात्मक आश्वासन दिले होते, असे सोलापूर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघाचे सहकोषाध्यक्ष डी. व्ही. कांबळे यांनी सांगितले. महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या सूचनेनुसार आंदोलनाचा दुसरा टप्पा राबविण्यात आला. न्यायदानाच्या प्रक्रियेत अडथळा येऊ नये, यासाठी कर्मचाऱ्यांनी घोषणाबाजी न करता काळ्या फिती लावून नियमित कामकाज सुरू ठेवले.

यावेळी अधीक्षक पी.एम.सोनटक्के, एस.डी.कांबळे, सहअधीक्षक किस्ती, आनंद पानगावकर, खमितकर, महिला प्रतिनिधी शोभा वैद्य, तालुका प्रतिनिधी एस.एल.यादव यांच्यासह न्यायालयीन कर्मचारी सहभागी झाले. ५ नोव्हेंबरपूर्वी शासनाने निर्णय घ्यावा; अन्यथा आंदोलन तीव्र करण्याची भूमिका घ्यावी लागेल, असा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला.



अकलूज येथील तुळजाभवानी मंदिरात शेषनाग अशी आकर्षक महापुजा केली आहे. ती सर्व भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे.
(छाया:-केदार लोहकरे अकलूज.)




मोडनिंब येथील जय भवानी चौकातील श्री यमाई देवी महिला मंडळ.

# रुक्मिणी मातेस पारंपारिक महालक्ष्मी माता पोशाखासह अलंकार

## नवरात्र महोत्सव सातवी माळ; श्री विठ्ठलाचे रुपही अलंकारांनी सजले

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १७ ऑक्टोबर-**

नवरात्र महोत्सवात सातव्या दिवशी श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान केले होते. रुक्मिणी मातेस महालक्ष्मी पोशाख परिधान केल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी दिली.

श्री विठ्ठलास सोन्याची पगडी, लक्ष्मी हार, हायकोल, तुळशीची माळी एक पदरी, शाळीग्राम हार, शिरपेच लहान, नामनिळाचा, दंडपेट्या जोड, हिऱ्याचे कंगनजोड, कौस्तुभ मणी, मोत्याची कंठी एक पदरी, मोत्याची कंठी दोन पदरी, तोडेजोड, मस्त्य जोड इत्यादि अलंकार परिधान केले आहेत. रुक्मिणी मातेस मोठी नथ, कर्णफुले, मत्स्य जोड, पैंजणजोड, रुळजोड, पुतळ्यांची म



ाळ, सूर्य, सोन्या-मोत्याचे ताणवड, मण्यामोत्याच्या पाटल्या, जडावाचे बाजूबंद जोड, चंद्रहार मोठा, घुंगराचा कंठा, चंद्रहार, अष्टपैलू मण्याची कंठी, ठुशी, कलमाडी बाजूबंद, चिंचपेटी हिरवी, बाजीराव गरसोळी, खड्यांची वेणी, दशावतारी साज इत्यादि अलंकार परिधान केले आहेत.

मंदिर समितीच्या अखत्यारीत असलेल्या पंढरपूर शहर व परिसरातील लखुबाई, अंबाबाई, पद्मावती, यल्लमादेवी, यमाई-तुकाई माता आदी परिवार देवतांना देखील पारंपारिक पोषाख केल्याचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत शिंदे यांनी सांगितले.

### सत्यभामा देवीचे आकर्षक रुप

राधिका मातेस नक्षी टोप, जवेची माळ, चिंचपेटी तांबडी, जवमनी पदक, मोहरांची माळव सत्यभामा देवीला सिद्धेश्वर टोप, पुतळ्यांची माळ, हायकोल, जवेची माळ, लक्ष्मीहार, पुतळ्यांची माळ अलंकार व श्री व्यंकटेशास चांदीची काठी, छत्री इत्यादी अलंकार प्रथा परंपरेप्रमाणे परिधान करण्यात आलेले आहेत.

# कैवल्याच्या चांदण्याला भुकेला चकोर

- पंढरपुरात अभिषेकी बंधूंचा स्वराभिषेक
- विठुरायाच्या चरणी गायनसेवा; चैतन्य देशपांडे यांचे सुरेल गायन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १७ ऑक्टोबर -**

येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने आयोजित श्री रुक्मिणी नवरात्र संगीत महोत्सवातील पाचव्या स्वरमाळेत अभिषेकी बंधू व उदयोन्मुख




गायक चैतन्य देशपांडे यांनीही स्वरसाज वाढवला. कैवल्याच्या चांदण्याला भुकेला चकोरसह विविध रचनांच्या सादरीकरणाने रसिकांवर जणू स्वराभिषेक झाला.

प्रारंभी व्यवस्थापक प्रवीणकुमार घम व कलाकारांच्या हस्ते विठुरायाच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलनाने झाली. कलाकारांचा मंदिर समितीच्या वतीने सत्कार झाला. पहिल्या सत्रात चैतन्य देशपांडे यांनी राग पुरीया कल्याण सादर केला.दुसऱ्या सत्रात पद्मश्री पं. जितेंद्र अभिषेकी यांचे सुपुत्र व शिष्य पं. शौनक अभिषेकी आणि अभेद अभिषेकी यांनी शास्त्रीय संगीत, अभंग व नाट्यगीतांच्या सादरीकरणातून विठुरायाच्या चरणी गायनसेवा समर्पित केली. राग झिंझोटी सादर केला. हार्मोनियमवर उदय कुलकर्णी, पखवाजवर ज्ञानेश्वर दुधाणे, तबल्यावर संकेत जोशी आणि टाळावर माऊली पिसे यांनी सुरेल साथसंगत केली.

### दोन दिवस स्थानिक कलाकारांचे सादरीकरण

महोत्सवाच्या पुढील दोन दिवसांत स्थानिक कलाकार तसेच भरतनाट्यम वर्गातील विद्यार्थ्यांचे सादरीकरण होणार असून, रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## महत्त्वाचे...



अकलूज : अश्विन शुद्ध सप्तमीनिमित्त अकलूज ग्रामदैवत श्री अकलाई देवीची भवानी तलवार अलंकार महापूजा.



खेडभाळवणी : महिला मंचतर्फे नवरात्र महोत्सवांतर्गत आयोजित 'नवरंग' या उपक्रमात खेडभाळवणी येथील एकता महिला मंचाच्या प्रमुख पदाधिकारी भामाबाई चंदनशिवे, सुनीता साळुंखे, जोत्स्ना डावरे, राणी घालमे आदी.



दहिटणे : दहिटणे येथील उपक्रमात प्रमुख पदाधिकारी लक्ष्मी सुतार, सुरेखा कोळी, नीता सुतार, विश्रांता शेळके, रेखा काशीद आदी.



मानेगाव : येथील उपक्रमात प्रमुख पदाधिकारी अमृता वाघमारे, स्वाती वाघमारे, उषा भांगे, लक्ष्मी मोरे, मंगल डाके, अनिता डाके, लोचना डाके, इंदुमती डाके.



सोलापूर : दैनिक तरुण भारत व प्रिसिजन प्रिंट्समधील महिला कर्मचारी अंजुम मुल्ला, आरती कुसेकर, अर्चना सरडे, मयुरा तारे, मनिषा विभुते.



सोलापूर : जुळे सोलापूर येथील श्री स्वामी समर्थ महिला भजनी मंडळ.